ऑक्टोबर २०१५ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य




## घडत आहे स्वच्छ, सुंदर महाराष्ट्र...

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

# प्रतिबिंब स्वच्छ महाराष्ट्राचे

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत स्वच्छतेच्या दिशेने यशस्वी पाऊल टाकलेल्या काही शहरांची ही प्रातिनिधिक छायाचित्रे. महाराष्ट्रात स्वच्छतेच्या एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला आहे.





दापोली

१

दापोली शहराने 'उघड्यावर शौचमुक्ती'चा टप्पा गाठून इतर नगरपरिषदांपुढे आदर्श ठेवला आहे. शहरातील रस्ते स्वच्छ आणि सुंदर झाले आहेत.


महाड

२

सामाजिक सुधारणा चळवळीत महाडचे नाव मोठे आहे. महाडने आपले शहर 'उघड्यावर शौचमुक्त' करून स्वच्छता चळवळीतही आघाडी घेतली आहे.


वाई

३

निसर्गाचा वरदहस्त लाभलेली वाई आता स्वच्छतेमुळे सुंदर दिसू लागली आहे. चित्रीकरणासाठी देश-विदेशातून येथे येणाऱ्या कलाकारांना याचा अनुभव येत आहे.


ग्रामीण शौचालय

४

शौचालये बांधणे आणि त्याचा वापर करण्याबाबत ग्रामीण भागात जागृती होत असून त्यामुळे उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण खूप कमी होत आहे.


स्वच्छ कोकण, सुंदर कोकण

५

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत कोकण विभागात सर्वाधिक चांगले काम झाले आहे. अनेक नगर परिषदा आणि गावे 'उघड्यावर शौचमुक्त' झाले आहेत.


सातारा

६

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या साताऱ्यात स्वच्छतेच्या दिशेने खूप चांगले काम झाले आहे. शहर 'उघड्यावर शौचमुक्त' झाले असून कचरा व्यवस्थापनाचे काम प्रगतिपथावर आहे.


गुहागर

७

कोकण किनारपट्टीनजीकचा समुद्र हा स्वच्छ मानला जातो. स्वच्छता अभियानामुळे गुहागरचा किनाराही आता स्वच्छ बनला आहे.


उघड्यावर शौचमुक्त गावे

८

स्वच्छ महाराष्ट्र अभियानामुळे गावांचा चेहरामोहरा बदलत आहे. गावे स्वच्छ आणि सुंदर होत आहेत.

## घडत आहे स्वच्छ, सुंदर महाराष्ट्र...

वर्ष ६७ वे | अंक ४ | ऑक्टोबर २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — संतोष सुतार

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई



## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in






६

### स्वच्छता हाच स्मार्ट शहरांचा आधार

आज जवळपास निम्म्या महाराष्ट्राचे शहरीकरण झाले आहे. अस्वच्छता हा या शहरांचा मुख्य प्रश्न आहे. यावर मात करण्यासाठी राज्य शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची सुरुवात केली आहे.

### एक पाऊल स्वच्छतेकडे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष लक्ष घालून स्वच्छ भारत मिशनचे लक्ष्य २०१९ पर्यंत निर्धारित केले आहे. राज्यातही स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबवण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रापेक्षा एक वर्ष अगोदरचे लक्ष्य निर्धारित करून २०१८ पर्यंत राज्यातील संपूर्ण नागरीभाग स्वच्छ करण्याचा निर्धार केला आहे.



१०



१६

### स्वच्छ गावे... सुंदर गावे...

ग्रामीण स्वच्छतेच्या क्षेत्रात महाराष्ट्र नेहमीच राष्ट्रीय स्तरावर दिशादर्शक राज्य ठरले आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्तरावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेले अनन्यसाधारण महत्त्व आणि राज्यस्तरावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भक्कम पाठिंब्याने स्वच्छतेची चळवळ जोर धरत आहे.

### शेतकरी बांधवांनो, शासन भक्कमपणे तुमच्या पाठीशी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टंचाई परिस्थितीतील शेती आणि शेतकऱ्यांची अवस्था पाहण्यासाठी मराठवाड्याचा तीन दिवसांचा झंझावाती दौरा केला. प्रसंगी कर्ज काढू पण शेतकऱ्यांच्या समस्या प्राधान्यांने सोडवू असा आशावाद त्यांनी शेतकऱ्यांना दिला.



२४

### ऋणानुबंधाचे बहुपदरी सेतू



२०

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जपान दौऱ्यानिमित्त एमटीएचएल या सागरी सेतूच्या उभारणीला गती मिळाली, त्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या अनावरणातून सामाजिक-सांस्कृतिक सामंजस्य करार व गुंतवणूकविषयक परिसंवादांच्या माध्यमातून; आर्थिक-औद्योगिक पातळीवरील ऋणानुबंधाचे बहुपदरी सेतू जपानी भूमीशी जोडले गेले.



### विशेष मुलाखत

सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) एकनाथ शिंदे

३६

### एक दिवस मंत्र्यांसोबत

३८

शिक्षणमंत्री, सांस्कृतिक कार्यमंत्री, विनोद तावडे




## प्रेरणादायी




लोकराज्यचा सप्टेंबरचा अंक नेहमीप्रमाणेच वाचनीय आणि संग्राह्य झाला आहे. नाममात्र दरात राज्याच्या प्रगतीची, शासन निर्णयांची, पर्यटन, आरोग्य आदींची माहिती देणारे लोकराज्य हे एकमेव मासिक आहे. प्रेरणा सदर युवकांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. सप्टेंबरच्या अंकातील मुख्यमंत्र्यांचा मराठवाडा दौरा आणि व्याघ्र प्रकल्पावरील लेख मला अधिक आवडले.


**– कार्तिक वाघमारे, देऊळगावराजा, जि. बुलडाणा**

## यशस्वी वाटचाल

लोकराज्यचा सप्टेंबर २०१५ चा अंक महाराष्ट्राची महा–उद्योग–राष्ट्राच्या दिशेने सुरू असलेली यशस्वी वाटचाल अधोरेखित करणारा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अवघ्या वर्षभरात महाराष्ट्रात ६५ हजार कोटींहून अधिक परकीय गुंतवणूक आणण्यात यशस्वी झाले आहे. ही गुंतवणूक महाराष्ट्राला महा–उद्योग राष्ट्राकडे घेऊन जाणारीच म्हणाली लागेल. हा आलेख असाच उंचावत राहावा.

**– सचिन पवार, अंभोडा, जि. बुलडाणा**


## शासन व जनतेतील दुवा




भाविकांसाठी अध्यात्म आणि श्रद्धेची पर्वणी असणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची माहिती जुलै २०१५ च्या लोकराज्यमध्ये सुलभपणे दिली आहे. महाराष्ट्र शासन व राज्यातील सामान्य जनता यांच्यातील दुवा म्हणजे लोकराज्य. पुढील वाटचालीसाठी 'लोकराज्य'ला अंत:करणपूर्वक शुभेच्छा.

**– बाळासाहेब दिनकर निकम, वर्णे, ता. जि. सातारा**

## कृषीविषयक माहिती हवी





लोकराज्य ऑगस्ट २०१५ हा अंक सर्व विषयांचा मागोवा घेणारा आहे. सर्व खात्यांची, शासन निर्णयांची अत्यंत महत्त्वपूर्ण व उपयुक्त माहिती अंकातून मिळते आहे. सध्या दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. कृषी व पशुसंवर्धनविषयक माहिती सर्व वाचकांना मिळावी ही अपेक्षा. हे मासिक अत्यंत वाचनीय आहे. कृषीविषयक अधिक माहिती असावी.

**– डॉ. दिलीप कांबळे, सांगली**

## अचूक वेध

जून २०१५ चा लोकराज्य अंक मान्सूनपूर्व तयारीचा अचूक वेध घेणारा आहे. यामुळे शेतकऱ्यांना नियोजनासाठी मदत झाली. यापुढेही अंकात पशुसंवर्धनाविषयी सविस्तर माहिती देण्यात यावी, ही विनंती.

**– दिपाली कदम, ता. कराड, जि. सातारा**




## उपयुक्त व प्रेरणादायी

मी शेतकरी असल्याने लोकराज्यचा अंक नियमित वाचतो. या अंकांतून आतापर्यंत मला विविध क्षेत्रातील माहिती मिळाली जी माझ्यासाठी उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरली. 'टीम लोकराज्य'चे मनापासून अभिनंदन व धन्यवाद.

**– ईश्वर सुखदेव गवई, रा. वरुड, ता. शेगाव, जि. बुलढाणा**

## विविधांगी माहितीची हमी

लोकराज्य मासिकाचा मी नियमित वाचक आहे. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थी हा केंद्रबिंदू समोर ठेवून आपण विविधांगी माहिती अंकात देत आहात तसेच सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक आदी विषयांची सखोल माहिती प्रत्येक महिन्याला आम्हा वाचकापर्यंत पोहोचते. आपणा सर्वांना धन्यवाद.

**– धनाजी अशोक जाधव, बेगमपूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर**

## प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# घडत आहे, स्वच्छ सुंदर महाराष्ट्र

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी २ ऑक्टोबरला स्वच्छ भारत मिशनचा प्रारंभ केला. त्यांच्यासाठी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. स्वच्छतेवर आपली प्रतिमा जशी अवलंबून असते त्याचबरोबर आरोग्य आणि समृद्धीसुद्धा अवलंबून असते. त्यामुळेच स्वच्छतेला अग्रक्रम देण्याचा निर्धार पंतप्रधानांनी केला. त्या निर्धाराच्या संकल्पपूर्तीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वच्छ महाराष्ट्र मिशन राज्यात प्रभावीरीत्या कार्यान्वित केले.

महाराष्ट्र हे स्वच्छतेमध्ये प्रारंभापासून आघाडीवर राहिलेले राज्य आहे. राज्यात संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले. केंद्रीय पातळीवरील निर्मल ग्राम स्वच्छता कार्यक्रमातही अनेक पारितोषिके राज्याला मिळाली आहेत. तथापि स्वच्छतेची मोहीम सातत्याने राबवणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात स्वच्छतेचा संकल्प करून, त्याचे काटेकोर आचरण केले पाहिजे. हाच स्वच्छ, सुंदर आणि समृद्ध महाराष्ट्राचा भक्कम पाया ठरणार आहे. नागरी भागात स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत 'स्वच्छतेची सप्तपदी' या अभिनव कार्यक्रमाला मुख्यमंत्र्यांच्या प्रेरणेने चालना देण्यात आली. त्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी चार ठिकाणी स्वच्छतेची शपथ दिली. गेल्या ३-४ महिन्यात १९ शहरांनी स्वच्छतेच्या अनुषंगाने उत्कृष्ट कार्य करून, संकल्पपूर्तीच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. हे पहिले पाऊल २०१८ पर्यंत संपूर्ण राज्य स्वच्छ आणि हागणदारीमुक्त करण्यासाठी आश्वासक असे आहे.

अत्यल्प पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांनी मराठवाड्यातील ३१, सोलापूरमधील चार, आणि अहमदनगर जिल्ह्यामधील पाच अशा ४० गावांचा नुकताच केलेला दौरा वैशिष्ट्यपूर्ण ठरला. या दौऱ्यात त्यांनी ३० हजार शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. शेतावर जाऊन त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा केली. शासन भक्कमपणे त्यांच्या पाठिशी असल्याचा दिलासा दिला.

मुख्यमंत्र्यांचा जपानचा दौरा औद्योगिक व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरला. महाराष्ट्र आणि जपानचे ऋणानुबंध सुदृढ करण्यासाठी या दौऱ्याचा उपयोग होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण कोयासन विद्यापीठात केले. स्मार्टसिटी, बुलेट ट्रेन, ट्रान्सहार्बर लिंक या अनुषंगाने महत्त्वपूर्ण करार करण्यात आले. या दौऱ्यावर आधारित लेख या अंकात देण्यात आला आहे.

एक दिवस मंत्र्यांसोबत, विशेष मुलाखत, निरामय, प्रेरणा व इतर नियमित सदरांनी हा अंक माहितीपूर्ण व वाचनीय करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

महान्यूज, दिलखुलास आणि जय महाराष्ट्र या आमच्या तिन्ही माध्यमांमधून शासनाच्या विविध योजना व निर्णयांना प्रभावीरीत्या प्रसिद्धी देण्यात येते. अतिशय उपयुक्त ठरलेल्या या तिन्ही माध्यमांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे.

हा अंक आपल्याला आवडेल अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**




# स्वच्छता

महाराष्ट्र हे देशातील वेगाने नागरीकरण होणारे राज्य आहे. आजमितीस जवळपास निम्मा महाराष्ट्र शहरांमध्ये सामावलेला आहे. हे प्रमाण वाढते असून नागरीकरणाचे वेळीच नियोजन न झाल्याने आज 'नागरी' म्हणून निर्माण झालेल्या विविध समस्यांना तोंड देण्याची वेळ आपल्यासमोर येऊन ठेपली आहे. विशिष्ट पट्ट्यात एकवटलेल्या अनियोजित व अनिर्बंध नागरीकरणामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांमध्ये सर्वात महत्त्वाचा प्रश्न स्वच्छतेचा आहे याची प्राधान्याने दखल घेऊन आम्ही स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबवत आहोत.

**'स्वच्छतेची सप्तपदी'**

केंद्र शासनाने गेल्या वर्षी स्वच्छ भारत अभियानाचा देशभरात प्रारंभ केला. त्याच धर्तीवर राज्याचे अभियान आहे. मा.पंतप्रधानांच्या संकल्पनेतील स्वच्छ भारताचे


**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

स्वप्न साकारण्यासाठी या अभियानाची सप्तसूत्री असणारी 'स्वच्छतेची सप्तपदी' राज्यभरात राबवत आहोत. या सप्तपदीतील सहभागाचा ठाम निर्धार, व्यापक लोकसहभाग, १०० टक्के शौचालयाचाच वापर, कचऱ्याचे संकलन–

## स्वच्छ महाराष्ट्र कोष!

**राज्य सरकारकडून स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी तसेच आनुषंगिक कामांसाठी स्वच्छ महाराष्ट्र कोष तयार करण्यात येत आहे. हा अतिशय अभिनव असा उपक्रम असून, राष्ट्रीय पातळीवर याच धर्तीवर स्वच्छ भारत कोष निर्माण करण्याची शिफारस मी सदस्य असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या उपगटाने केली आहे. तसेच आगामी ३ वर्षात केंद्र व राज्यांच्या अर्थसंकल्पात स्वच्छतेसाठी भरीव तरतूद करण्याची शिफारस या गटाने केली आहे.**

# हाच स्मार्ट शहरांचा आधार



**स्वच्छता राखणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे आणि स्वच्छ व सुंदर भारत म्हणजे राष्ट्रभक्तीचा जागर आहे, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या २०१९ मध्ये साजऱ्या होणाऱ्या १५० व्या जयंतीनिमित्त देश स्वच्छ करून त्यांना अनोखी श्रद्धांजली अर्पण करायची आहे. लालबहादूर शास्त्री यांनी देशाला 'जय जवान, जय किसान' असा नारा दिला आणि देशातील शेतकऱ्यांनी अन्नधान्याबाबत देशाला स्वावलंबी करून धान्याची कोठारे भरली. त्याचप्रमाणे महात्मा गांधी यांनी इंग्रजांविरुद्ध 'क्विट इंडिया' (भारत छोडो) आणि 'क्लिन इंडिया' असा मंत्र दिला होता. इंग्रजांना हाकलून लावत त्यांचे एक स्वप्न पूर्ण झाले. आता स्वच्छ भारताचे त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याची गरज आहे. स्वच्छता राखणे हे फक्त सफाई कर्मचाऱ्यांचे काम नसून, देशातील १२५ कोटी जनतेचे कर्तव्य आहे.**

**- पंतप्रधान नरेंद्र मोदी**

वर्गीकरण–वाहतूक, कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया, सांडपाण्यावर प्रक्रिया आणि हरित स्वच्छ महाराष्ट्राची निर्मिती. या सात मुद्द्यांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे महाराष्ट्रात परिवर्तन घडू शकेल. ही 'स्वच्छतेची सप्तपदी' ही लोकसहभागातून घातली गेली पाहिजे. ती केवळ शासकीय यंत्रणेकडून घातली जाऊ नये. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे नेतृत्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी निर्धाराने प्रयत्न करून हे अभियान लोकांपर्यंत पोहोचवावे, तरच ते पूर्णपणे यशस्वी होऊ शकेल.

### पर्यावरणस्नेही विकास

आपण जोपर्यंत पर्यावरणपूरक बनत नाहीत तोपर्यंत आपला खऱ्या अर्थाने विकास होऊ शकणार नाही. पर्यावरणस्नेही विकास हाच सर्वंकष विकास असतो. स्वच्छता ही बहुआयामी बाब असून ती पर्यावरण जोपासणारी आहे. त्याचा थेट संबंध सामान्य माणसाच्या जीवनमानाशी आहे. शहरे स्वच्छ आणि सुंदर होत असतानाच सामान्य माणसाचे जीवनमानही उंचावणार आहे. त्या दृष्टीने नागरिकांमध्ये जाणिवा निर्माण होणे आवश्यक आहे. आपल्या काही मूलभूत सवयींमध्ये आता बदल होणे गरजेचे आहे. पायाभूत सुविधांबाबत नागरिक आणि लोकप्रतिनिधीही आग्रही असतात. मात्र, त्यासोबतच स्वच्छतेबाबतही जागरूकता गरजेची आहे. शहरे स्मार्ट होण्याआधी स्वच्छ झाली पाहिजेत.

## स्वच्छ शहरांना जास्तीचा निधी !

**चौदाव्या वित्त आयोगामार्फत राज्यातील सर्व शहरांना दिला जाणारा निधी व अनुदाने यापुढे स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीशी जोडली जाणार आहेत. स्वच्छता राखण्यासाठी केलेल्या कार्यवाहीवर संबंधित शहरांचे निधी वाटप अवलंबून राहणार आहे. स्वच्छता अभियानाची चांगली अंमलबजावणी करणाऱ्या शहरांना वाढीव निधीही दिला जाईल. तसेच उत्तम कामगिरी करणाऱ्या शहरांचा गौरवही केला जाणार आहे.**

### स्वयंस्फूर्त लोकसहभाग

राज्यात दररोज निर्माण होणाऱ्या २० हजार मेट्रीक टन कचऱ्यापैकी १६ हजार मे.टन कचरा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून संकलित होतो. या कचऱ्यापैकी केवळ १३०० मे. टन कचऱ्यावर सध्या प्रक्रिया होते. या आकडेवारीवरुन याबाबतचे आव्हान किती मोठे आहे याची जाणीव होते आणि हे आव्हान पेलण्यासाठी शासकीय यंत्रणेला नागरिकांच्या प्रयत्नांची जोड मिळायला हवी. त्यामुळेच या समस्येच्या प्रभावी निराकरणासाठी स्वयंस्फूर्त लोकसहभाग ही सर्वात महत्त्वाची गरज आहे.

### स्वच्छतादूतांचे महत्त्व

ग्रामीण भागाच्या समस्या वेगळ्या आहेत. शौचालयांची निर्मिती आणि त्याचा वापर हा महत्त्वाचा घटक आहे. स्वच्छतेची, खासकरून शौचालयाच्या वापराची सवय लागली पाहिजे. विकासाच्या मानकांमध्ये आपले आरोग्य आणि मानसिकता महत्त्वाची असते. अस्वच्छतेमुळे आरोग्यावर अनिष्ट परिणामक होतो. आपले मंगळसूत्र विकून शौचालयाची बांधणी करणारी वाशिम जिल्ह्यातील संगिता आव्हाडे किंवा आपल्या लग्नाच्या रुखवतात दागिन्यांऐवजी शौचालयाची मागणी करणारी अकोला जिल्ह्याच्या बाळापूर तालुक्यातील चैताली राठोड व कर्ज काढून शौचालय बांधणाऱ्या सुवर्णा लोखंडे या खऱ्या स्वच्छतादूत आहेत. छोट्या छोट्या प्रयत्नांमधून मोठ्या बाबी साध्य होतात. आपल्या देशातील कचऱ्याची विल्हेवाट लावताना स्थानिक परिस्थितीशी मिळतेजुळते तंत्रज्ञान वापरणे गरजेचे आहे. असे तंत्रज्ञान विकसित केले जावे, अशी सूचना स्वच्छ भारत अभियानाशी निगडित कार्यगटाला आपण केली आहे. असे शाश्वत तंत्रज्ञान उपलब्ध झाल्यावर घनकचऱ्याचे व्यवस्थापन आणि प्रक्रिया सुलभ आणि गतिमानतेने करता येईल. लोकप्रतिनिधींनी स्वच्छतेकडे अधिक जागरूकतेने लक्ष द्यायला हवे. त्यांनी २५ वर्षांचा विचार करून आपला परिसर निर्मल करण्याचे ध्येय ठरवायला हवे. संत गाडगेबाबा आणि संत तुकडोजी महाराजांनी ग्रामस्वच्छतेला महत्त्व देताना लोकसहभागावर अधिक भर दिला होता. महाराष्ट्राची जनता प्रागतिकतेची कास धरणारी आहे, त्यामुळे या अभियानात मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग मिळून स्वच्छ महाराष्ट्राचे स्वप्न निश्चितच साकारेल, असा मला विश्वास वाटतो.

# पहिले यशस्वी पाऊल

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत मिशनची मुहूर्तमेढ रोवून २०१९ पर्यंत भारत स्वच्छ करण्यासाठी जनतेला शपथ दिली. त्याच धर्तीवर राज्यानेही स्वच्छतेच्या सप्तपदीतून दमदार पावले टाकण्यास सुरुवात केली. वर्षभरातच १९ नगरपालिका व बृहन्मुंबई पालिकेतील दोन वार्ड हागणदारीमुक्त झाले. या नगरपालिकांच्या पदाधिकाऱ्यांचा २ ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंतीदिनी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वच्छ महाराष्ट्राच्या दिशेने टाकलेले हे यशस्वी दमदार पाऊल पाहता ही मोहीम २०१८ पर्यंत यशस्वी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**

**राजाराम देवकर**

स्वच्छ भारत मिशन यशस्वी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्वच्छ महाराष्ट्रासाठी स्वच्छतेच्या सप्तपदीच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला अबालवृद्धांपासून सिनेतारकांपर्यंत सर्वांनीच प्रतिसाद दिला. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आदींनी ठिकठिकाणी स्वच्छता उपक्रम राबवले. महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींनी स्वच्छ शहर, हागणदारीमुक्त शहरासाठी स्वच्छतेच्या सप्तपदीची शपथ घेतली. याचेच फलित म्हणून वर्षभरात १९ नगरपालिका व बृहन्मुंबई महानरपालिकेचे दोन वॉर्ड 'उघड्यावर शौचमुक्त' झाले आहेत. या नगरपालिकांच्या अधिकारी व नगराध्यक्षांचा २ ऑक्टोबर २०१५ रोजी स्वच्छ महाराष्ट्राच्या संकल्पपूर्तीच्या पहिल्या यशस्वी पाऊलानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यासोबतच हरित कुंभ व पंढरपूर आषाढी यात्रेतील स्वच्छतेबाबत उल्लेखनीय कामगिरीबद्दल संबंधित अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

या मोहिमेविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या संकेतस्थळाचा (swachh.maharashtra.gov.in) मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभही करण्यात आला. मुंबईस्थित सह्याद्री राज्य अतिथिगृहात पार पडलेला स्वच्छता अभियानासंदर्भातील हा सोहळा स्वच्छ आणि समृद्ध महाराष्ट्राची नांदी ठरला आहे. स्वच्छ महाराष्ट्र हे आता अभियान राहिले नसून तिला चळवळीचे रूप प्राप्त झाले आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि नागरिक उत्स्फूर्तपणे या चळवळीत सामील होत आहेत. नाशिक येथील हरितकुंभ, पंढरपूर येथील आषाढी-एकादशी हे त्याचे बोलके उदाहरण. लाखो भाविकांना मूलभूत सुविधा देऊन कमालीची




महाराष्ट्राच्या स्वच्छतादूत म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या चैताली राठोड यांचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. यावेळी मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर आणि मुंबईच्या महापौर स्नेहल आंबेकर उपस्थित होत्या.

स्वच्छता राखण्यात महाराष्ट्राला यश आले आहे. त्यामुळे आता सामान्य नागरिकही या चळवळीशी जोडले जात आहे. प्रत्येकाला स्वच्छता हवी आहे. त्याला फक्त या अभियानाच्या माध्यमातून योग्य दिशा मिळाली आहे. नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्या पुढाकाराने स्वच्छतेच्या सप्तपदीतून या मोहिमेला व्यापक रूप मिळाले. कोकण, नागपूर, पूणे व नाशिक येथे कार्यशाळा घेऊन अधिकारी-पदाधिकाऱ्यांना स्वच्छतेच्या सप्तपदीची शपथ दिली गेली. त्याचा पाठपुरावा केला गेला. त्याचीच परिणती म्हणजे वर्षभरात १९ शहरे हागणदारीमुक्त झाली.

दरम्यान १५ ऑगस्टनंतर या मोहिमेने वेग घेतल्याने डिसेंबर २०१५ पर्यंत किमान ४७ शहरे हागणदारीमुक्त होतील, असा विश्वास नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी यावेळी व्यक्त केला.

उघड्यावर शौचमुक्तीच्या दिशेने टाकलेले हे पहिले यशस्वी पाऊल आहे. हे अभियान यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी ७ टप्पे केले असून २ ऑक्टोबर २०१७ पर्यंत दर तिमाहीच्या अंतराने राज्यातील २६५ शहरे हागणदारी मुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. ही संकल्पपूर्ती स्वच्छ महाराष्ट्राचा भक्कम पाया असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### स्वच्छतेच्या निकषांवर निधी

स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणाऱ्या संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा आपल्याला विसर पडल्याने अस्वच्छता वाढली आहे.



त्यामुळे स्वच्छतेसाठी प्रत्येकजण करत असलेला छोटासा प्रयत्नदेखील, जगाचे कल्याण करणारा आहे. मोठे रस्ते, प्रकल्प म्हणजे प्रगती नव्हे तर ती राहणीमानावरून ठरत असते. त्यामुळे शहरांना १४ व्या वित्त आयोगातून निधी, स्वच्छतेच्या मानांकानुसारच दिला जाईल. घनकचरा व टाकाऊ रासायनिक पदार्थांची विल्हेवाट लावण्याचे मोठे आव्हान आहे. मात्र त्याकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. कचरा, सांडपाणी यावर प्रक्रिया केली तर त्याचा पुनर्वापर होईल. त्यासाठी केंद्राकडून राज्याला नवीन तंत्रज्ञान मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### लोकसहभाग महत्त्वाचा

नव्याने घोषित करण्यात आलेल्या तीन महिला स्वच्छतादुतांचा आदर्श देशभरात उदाहरण द्यावा असा आहे. जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांनी स्वच्छता मोहिमेचे पालकत्व स्वीकारले तर खूप मोठा बदल पाहायला मिळू शकतो. हागणदारीमुक्त मोहिमेत सर्वांनी काम करणे आवश्यक आहे. लोकसहभाग महत्त्वाचा आहे. त्यासोबतच प्रशासन व नागरिकांनी सुका व ओल्या कचऱ्याचे वर्गीकरण करावे, असे आवाहन मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी केले.




## महाराष्ट्राच्या स्वच्छतादूत

**चैताली राठोड :** यवतमाळ जिल्ह्यातील मोझर या छोट्याशा गावातील चैताली राठोड यांची गोष्ट प्रेरणादायी अशी आहे. त्यांच्या माहेरी शौचालय होते. पण देवेंद्र माकोडे यांच्याशी लग्न जुळल्यावर त्यांना कळले की, सासरी शौचालय नाही. त्यामुळे त्यांना याचा धक्का बसला. त्यांनी लग्नामध्ये आपणास रुखवतात काही गोष्टी मिळाल्या नाही तरी चालतील; मात्र शौचालय द्यावे, अशी गळ आईवडलांना घातली. ही वेगळी पण विचित्र मागणी ऐकून घरच्यांना आश्चर्य वाटले. पण लेकीच्या सुखासाठी काहीही करण्याची तयारी असलेल्या चैतालीच्या आईवडलांनी रेडिमेड शौचालय देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे चैताली आनंदली आणि तिला समाधानही मिळाले. आजच्या काळात अशी प्रागतिक मानसिकता ठेवणाऱ्या चैतालीचा आदर्श इतर तरुणींनी ठेवावा, यासाठी तिची स्वच्छतादूत म्हणून निवड करण्यात आली.

**सुवर्णा लोखंडे :** सिन्नर (जि. नाशिक) येथील सुवर्णा राजेंद्र लोखंडे यांनी शौचालयाच्या अनुषंगाने केलेला विचार इतरांसाठी प्रेरणादायी असा आहे. त्यांच्या घरचीही परिस्थिती हलाखीची आहे. परंतु स्वच्छतेविषयी त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट आणि ठाम आहे. घरी शौचालय नसल्यामुळे स्वत:च्या वाट्याला आलेली कुचंबना आपल्या मुलीच्या वाट्याला येऊ नये, उघड्यावर शौचास जाण्याची वेळ तिच्यावर येऊ नये असा त्यांनी निर्धार केला. त्यामुळे त्यांनी बचतगटाकडून शौचालयासाठी कर्ज काढले तेव्हा सर्वांना फार आश्चर्य वाटले. मात्र आजच्या काळातील ही गरज असल्याचे त्यांनी इतरांना समजावून सांगितले. तेव्हा इतरांनाही त्यांचे म्हणणे पटले. कर्ज घेऊन शौचालय उभारणाऱ्या सुवर्णा लोखंडे यांचा दृष्टिकोन व धाडस महाराष्ट्रातील महिलांसाठी नवा आदर्श घालून देणारा आहे.

**संगीता आव्हाडे :** वाशिम जिल्ह्यातील सायखेडा येथील संगीता नारायण आव्हाडे यांना शौचालय बांधण्यासाठी १३ वर्षे संघर्ष करावा लागला. लग्न झाल्यानंतर परिस्थिती हालाखीची असल्याने पती, सासुसासऱ्यांकडे अनेकवेळा विनंती करूनही शौचालय उभे राहिले नाही. घरी शेती नसल्याने रोजंदारीवरच उदरनिर्वाह. मात्र आपली होणारी कुचंबना आपल्या १२ वर्षांच्या मुलीला भोगावी लागू नये म्हणून आपले मंगळसूत्र विकून त्यांनी शौचालय बांधले.



सातारा जिल्ह्यातील वाई नगर परिषदेने राबवलेल्या स्वच्छता मोहिमेमुळे शहरातील घाटांचे सौंदर्य वाढले आहे.

# एक पाऊल स्वच्छतेकडे


**स्वच्छ पर्यावरण आणि चांगले आरोग्य हा सर्वांचा हक्क आहे, पण त्यासाठी शहरे स्वच्छ राहणे आवश्यक आहे. त्यामुळेच महात्मा गांधी यांच्या जयंतीपासून केंद्र सरकारने अस्वच्छतेपासून देशाला स्वतंत्र करण्यासाठी, 'स्वच्छ भारत मिशन' सुरू केले. पंतप्रधान नरेंद्र मोदि यांनी विशेष लक्ष घालून या मिशनचे लक्ष्य २०१९ पर्यंत निर्धारित केले आहे. केंद्र सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेला महाराष्ट्र शासनाने तातडीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून राज्यातही 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' राबवण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रापेक्षा एक वर्ष अगोदरचे लक्ष्य निर्धारित करून २०१८ पर्यंत राज्यातील संपूर्ण नागरीभाग स्वच्छ करण्याचा निर्धार केला आहे. सरकारच्या या योजनेत महापालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला असून त्यातील पहिल्या टप्प्यात सुमारे २० शहरे 'उघड्यावर शौचमुक्त' झाली आहेत.**

**प्रवीण कुलकर्णी**

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे, यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबवणे सुरू केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वच्छ, सुंदर व पर्यावरणयुक्त देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणावर हे अभियान राबवण्यास सुरुवात झाली आहे. या अभियानास वाढता प्रतिसाद मिळत आहे. घर स्वच्छ राहिले तर गाव स्वच्छ राहील, गाव स्वच्छ राहिले तर शहर स्वच्छ राहील... शहर स्वच्छ राहिले तर राज्य स्वच्छ राहील, पर्यायाने देशही स्वच्छ राहील. स्वच्छतेमुळे देशाचे आरोग्यही चांगले राहण्यास मदत होणार आहे. त्यामुळेच पंतप्रधानांनी २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत देश स्वच्छ करण्याचा संकल्प स्वच्छ भारत अभियानातून मांडला. त्यांचा हा संकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी महाराष्ट्राचा हातभार मोठ्या प्रमाणात लागत आहे. या संकल्पाला आता महाराष्ट्राने आणखी व्यापक स्वरूप देण्याचे ठरवले आहे. त्यातूनच नागरी भागात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबवण्यात येत आहे.

येत्या पाच वर्षांत भारत हा स्वच्छ देश म्हणून ओळखला जावा,





**स्वच्छता, पवित्रता आणि आत्मसन्मानाने जगण्यासाठी पैशाची आवश्यकता नसते. आरोग्यासाठी स्वच्छतेची जरुरी असते आणि स्वच्छता म्हणजे केवळ अंघोळ करणे नव्हे तर सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, मलमूत्र विसर्जित करणे आणि कचरा फेकणे यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळते, त्यामुळे ते टाळले पाहिजे.**

**- महात्मा गांधी**

यासाठी केंद्राने राबवलेली योजना महत्त्वपूर्ण आहे. ही योजना यशस्वी होण्यासाठी राज्याचा हातभार लागणे आवश्यक आहे. त्यासाठीच राज्याने नागरी भागातील स्वच्छतेवर लक्ष केंद्रित केले आहे. २०११ च्या जनगण–नेनुसार राज्याची नागरी लोकसंख्या पाच कोटी, आठ लाख, २७ हजार ५३१ (राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ४५.२३ टक्के) एवढी आहे. नागरी भागातील एकूण कुटुंबांची संख्या एक कोटी, आठ लाख, १३ हजार ९२८ एवढी आहे. त्यापैकी २९ टक्के कुटुंबांना वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या कुटुंबांपैकी ७३ टक्के कुटुंबे सार्वजनिक शौचालयांचा वापर करीत आहेत. २७ टक्के कुटुंबे उघड्यावर शौचास जात आहेत. राज्यात २६ महानगरपालिका व २३९ नगरपरिषदा अशा एकूण २६५ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधून दरदिवशी निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची आधुनिक व शास्त्रशुद्ध पद्धतीचा अवलंब करून फारच थोड्या शहरांमध्ये विल्हेवाट लावली जाते. त्यामुळे

## देखणी आणि स्वच्छ वाई

आपल्या निसर्गदत्त सौंदर्यामुळे पर्यटकांसोबतच हिंदी चित्रपटसृष्टीला भुरळ घालणाऱ्या वाईने स्वच्छतेबाबत मोठे काम केले आहे. शौचालयांची उभारणी आणि नागरिकांमध्ये शौचालय वापरण्यासाठी जनजागृती करून वाईने निसर्गदत्त सौंदर्याला स्वच्छतेची रुपेरी किनार लावली आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार, शहरातील ७५८० कुटुंबांपैकी ५१४३ कुटुंबांकडे स्वतःची शौचालये आहेत, उर्वरित २३०० कुटुंबे सामुदायिक शौचालयांवर अवलंबून असून १३५ कुटुंबे उघड्यावर शौचास जात होते. ही कुटुंबे उघड्यावर शौचास जाण्यापासून थांबविण्यासाठी वैयक्तिक शौचालय तसेच २ ते ४ कुटुंबांमध्ये एक असे गट शौचालय बांधून, त्यांचा वापर करण्यास वाई नगरपरिषदेने स्वच्छ भारत अभियान सुरू होण्यापूर्वीच नागरिकांना प्रोत्साहीत केले. नागरिकांकडून असलेली मागणी लक्षात घेता स्वतःची शौचालये बांधण्याची इच्छा असलेल्या कुटुंबांना, आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी शहरस्तरीय स्वच्छता योजना सुरू केली. वाई नगरपरिषदेने स्व–निधीतून प्रत्येक कुटुंबास रु. १०,००० एवढे अनुदान देण्यासाठी ठराव मंजूर केला, जेणेकरून एक शौचालय वापरणाऱ्या कुटुंबांच्या संख्येनुसार त्यांच्या अनुदानाची रक्कम वाढत जाईल. यासाठी वाई नगरपरिषदेने योजनेची रूपरेषा निश्चित केली, अंमलबजावणी तसेच देखरेख पद्धती विकसित केली, नगरपरिषदेच्या वार्षिक अंदाजपत्रकांचे आर्थिक मूल्यमापन करून स्वनिधी वापराची शक्यता पडताळणे आणि योजनेचा प्रसार आणि विविध जनजागृती उपक्रम यांचे आयोजन केले.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत प्रत्येक कुटुंबाला रु. १२,००० इतके अतिरिक्त अनुदान शासनातर्फे देण्यात येत आहे. या अभियानाने वाईतील चालू योजनेस पुष्टी मिळून व नगरपरिषदेने ही योजना अभियानाच्या उद्दिष्टांना अनुसरून नव्या जोमाने राबवण्यास सुरुवात केली.

शहरातील उघड्यावरील शौचविधी पद्धती संपूर्णपणे बंद करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नगरपरिषदेने ४० हून अधिक सफाई कर्मचाऱ्यांचे एक गूड मॉर्निंग पथक उभारले आहे. या पथकाद्वारे दररोज पहाटे तसेच रात्री पाहणी करून, उघड्यावर शौचास बसणाऱ्यावर दंडात्मक कारवाई केली जाते. याचा सकारात्मक परिणाम झाला आहे.

### सामाजिक संस्था व नागरिकांचा सहभाग

अभियानाचे हे ध्येय साध्य करण्यासाठी नगरपरिषदेने शहरातील कार्यरत सर्व सामाजिक संस्था व इतर इच्छुक नागरिकांच्या सहभागासाठी आवाहन केले. त्यांना या मोहिमेमध्ये सामील करून घेण्यासाठी विविध संकल्पना राबवल्या.

शहरातील सर्व वस्तीपातळीवरील व सार्वजनिक शौचालयांच्या नियमित व कार्यक्षम देखभाल दुरुस्तीसाठी खाजगी संस्था नेमली असून संस्थेने पुरवलेल्या सेवांवर नगरपरिषदेतर्फे संनियंत्रण केले जाते. यामुळे स्वतःची शौचालये नसलेल्या कुटुंबांना वापरण्यास योग्य अशी राहिली आहेत. आवश्यकतेनुसार नवीन वस्ती व सार्वजनिक शौचालये बांधण्याचे काम नगरपरिषदेने हाती घेतले आहे.



## गुहागरचा किनारा झाला स्वच्छ

ज्या दोन ग्रामपंचायतींच्या एकत्रीकरणातून गुहागर नगरपंचायतीची स्थापना झाली त्या दोन्ही ग्रामपंचायतींना २००६ साली निर्मल ग्राम पुरस्कार मिळाले होते. त्यामुळे त्याची खातरजमा करण्यासाठी सर्वप्रथम नगरपंचायतीकडून सर्वेक्षण करण्यात आले. नगरपंचायत क्षेत्रातील ९४६६ लोकसंख्येसाठी २२७१ वैयक्तिक शौचालये, १०१ सामुदायिक शौचालये उपलब्ध होती तरीही समुद्रकिनाऱ्यावर उघड्यावर शौचास जाण्याचे ३ ठिकाणे असल्याचे आढळून आले. काही प्रमाणात नादुरुस्त व अस्वच्छ शौचालये यास कारणीभूत असल्याचे आढळून आले.

शौचालय स्वच्छतेची व दुरुस्तीची कामे प्राधान्याने घेण्यात आली. तथापि बऱ्याच लोकांना शौचालय उपलब्ध असूनही त्यांना उघड्यावर जाण्याची सवय जडली होती. त्यामुळे खरे आव्हान या सवयीचे उच्चाटन करणे हे होते. यासाठी नगरपरिषदेने प्रभातफेऱ्या, निबंध स्पर्धा घेऊन वातावरण निर्मिती केली तरीही उघड्यावर जाण्याचे प्रमाण कमी झाले नाही. त्यामुळे एक अभिनव कल्पना राबवून 'गूड मॉर्निंग पथका'चे गठन करण्यात आले. हे पथक सकाळी अशा जागांना भेटी देऊन छायाचित्रे काढत असे. स्थानिक वृत्तपत्रांमध्येसुद्धा या उपक्रमांची चांगलीच वाहवा झाली आणि उघड्यावर शौचास जाणाऱ्यांना चाप बसला. शौचालयाबरोबरच घनकचरा व्यवस्थापनाच्या सुयोग्य नियोजनासाठी वॉर्ड नं. ३ हा मॉडेल म्हणून घोषित करण्यात आला. अनेक अभिनव प्रकल्प राबवण्यात आले. यात स्थानिक नागरिकांना नामनिर्देशित करून स्वच्छता कामगारांवर देखरेख ठेवली जाते. या वॉर्डमध्ये ओल्या व सुक्या कचऱ्याचे १०० टक्के वर्गीकरण केले जाते. तसेच ओल्या कचऱ्याचे कंपोस्टिंग विकेंद्रित स्वरूपात त्याच वॉर्डमध्ये केले जाते. याबरोबरच बाजारपेठ व पर्यटन स्थळांवर कचराकुंड्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

संबंधित महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रामध्ये पर्यावरणविषयक व नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, राज्यांमधील सर्व शहरांमधील उघड्यावर शौचास जात असलेल्या कुटुंबांना; शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी व शहरांमधील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्यामध्ये 'नागरी स्वच्छ महाराष्ट्र अभियान राज्यात जोमाने राबवले जात आहे. त्याचे दृश्य परिणाम आता दिसू लागले आहेत. नगरपालिका उघड्यावर शौचमुक्त होत असून घनकचऱ्याचेही व्यवस्थापन होत आहे.

स्वच्छता अभियानाचा मुख्य उद्देश उघड्यावरील शौचविधी बंद करणे, हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांना या कामातून मुक्ती, नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक व शास्त्रोक्त पद्धतीचा अवलंब, स्वच्छतेच्या चांगल्या पद्धतीच्या अनुषंगाने सवयींमध्ये बदल, स्वच्छतेविषयी जागरूकता निमार्ण करून त्याची सार्वजनिक आरोग्याशी सांगड घालणे आणि भांडवली खर्च आणि ऑपरेशन आणि देखभाल यासाठी खाजगी संस्थांच्या सहभागासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करणे हा आहे. हे उद्देश डोळ्यासमोर ठेवून नरपालिकांनी आपली वाटचाल करत संपूर्ण स्वच्छतेच्या दृष्टीने पावले टाकली आहेत.

कोणत्याही अभियानाला सरकारी पातळीवरून मदत मिळण्याबरोबच स्थानिक नागरिकांचा आणि लोकप्रतिनिधींचा सहभाग असल्याशिवाय यश मिळत नाही. ज्या नगरपालिका उघड्यावर शौचमुक्त झाल्या आहेत. त्या नगरपालिकांमध्ये लोकप्रतिनिधींनी समाजजागृतीसाठी मोठे काम केले आहे. प्रशासनानेही लोकांच्या स्वच्छतेची आणि शौचालयाच्या वापराची सवय लागावी यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. शाळा, महाविद्यालये यांनीही या चळवळीत भाग घेतला आहे. त्यामुळेच आज घडीला या नगरपालिका उघड्यावर शौचमुक्त झाल्या आहेत. आता त्यांच्यापुढे कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्याचे आव्हान आहे. काही नगरपालिकांनी यातही आपले उद्दिष्ट गाठले आहे. आगामी काळात घनकचरा व्यवस्थापनाचे मोठे आव्हान नगरपालिकांना पेलून त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढता आला पाहिजे, यासाठी राज्य शासन आपल्याकडून आवश्यक ती मदत देत आहे. नगरपालिकांचे या दृष्टीने सुरू असलेले काम लवकरच दृश्य स्वरूपात समोर येईल.

## भगूरचे समाजभान

आपल्यातील गावपण जपणाऱ्या भगूरने नाशिक जिल्ह्यातील नगरपालिकांसमोर आदर्श ठेवला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भगूरमध्ये अवघ्या २४ कुटुंबाकडे शौचालये नव्हती. पण शहर वाढत गेले. त्यामुळे शौचालये नसणाऱ्यांची संख्या वाढली. त्याचबरोबर सार्वजनिक शौचालयांचा वापर करणाऱ्या कुटुंबांना वैयक्तिक शौचालयाची निकड भासू लागली होती. वैयक्तिक शौचालयाची निर्मिती हा एक भाग आणि शौचालयांचा वापर हा दुसरा भाग आहे.

भगूर नगरपरिषदेने उद्दिष्ट निश्चित करून २४ कुटुंबांना वैयक्तिक शौचालये बांधून देण्याचा निर्धार केला. परंतु त्याहीपेक्षा सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांची निर्मिती आणि तिचा वापर यावर भर देण्यात आला आहे. नगरपरिषदेमध्ये सध्या सुमारे १५० शौचालये शहरभर कार्यरत आहेत. त्यामध्ये स्त्रियांसाठी ७० आणि पुरुषांसाठी सुमारे ८० शौचालयांचा समावेश आहे.

प्रत्यक्ष सर्वेक्षण सुरू झाल्यानंतर शहरातील विविध भागात नगराध्यक्षा, मुख्याधिकारी व नगरपरिषद कर्मचारी यांनी फिरून २०११ च्या जणगणनेतील निश्चित केलेल्या उद्दिष्टांनुसार माहिती घेतली. नागरिकांनी सांगितलेल्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी बैठका घेण्यात आल्या. त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत.

### स्वच्छतेचे महत्त्व पटले



स्वच्छ भारत अभियानाला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. आरोग्य आणि प्रगतीच्या दृष्टीने स्वच्छता व त्यासाठी स्वच्छतागृहे किती महत्त्वाची आहेत हे आम्ही नागरिकांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यात यश आले. लोकसहभागातून कोणतेही कार्य सफल करता येते.

- अवधूत अनिल तटकरे, आमदार (श्रीवर्धन)
तथा नगराध्यक्ष (रोहा)

### उत्स्फूर्त प्रतिसाद



स्वच्छ भारत अभियानाच्या जोरदार अंमलबजावणीमुळे महाड शहर स्वच्छतेच्या दृष्टीने झपाट्याने पाऊल पुढे टाकत आहे. स्वच्छतेमुळे घरांची पर्यायाने शहराची शोभा वाढत आहे. शौचालये नसलेली कुटुंबे आता या अभियानात सहभागी झाली आहेत.

- भारती सपकाळ, नगराध्यक्षा, महाड


### प्रत्येकासाठी शौचालय



शहरात सार्वजनिक शौचालये अधिक प्रमाणात उभारली आहेत. त्यामुळे उघड्यावर शौचास बसण्याचे प्रमाण कमी झाले. आम्ही घरोघरी जाऊन माहिती दिली. नागरिकांनाही उघड्यावर जाणे आवडत नाही. प्रत्येकासाठी शौचालय उपलब्ध असेल तर नक्कीच शहर स्वच्छ राहील, हा दृष्टिकोन समोर ठेवून काम केले आणि त्यात यशही मिळाले.

- सावित्री होमकळस, नगराध्यक्ष, चिपळूण

### लोकसहभागामुळे शक्य



पाचगणी हे मुळात हिलस्टेशन असल्यामुळे इथे पर्यटकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे सार्वजनिक शौचालयांचीही व्यवस्था उत्तम राखण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या शहरात १३२ कॉमन सीट्स आहेत आणि वैयक्तिक शौचालयांची संख्या अजून वाढावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहे. सर्व नागरिकांचा, नगरसेवकांचा आणि लोकप्रतिनिधींच्या उत्तम सहभागामुळे हे शक्य झाले आहे.

- लक्ष्मी कऱ्हाडकर, नगराध्यक्षा, पाचगणी

## मलकापूरची नवी ओळख

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची



मलकापूर ५३३९ उंबऱ्यांची नगरपरिषद. २०११ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार ११३० कुटुंब उघड्यावर शौचास जात होती. नगरपालिकेने यासाठी पूर्वीही प्रयत्न केले होते, पण त्या प्रयत्नांना म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नव्हता.

२ ऑक्टोबर २०१४ पासून सुरू झालेल्या स्वच्छ भारत मिशनचा मात्र चांगलाच परिणाम होऊन मलकापूर नगर परिषद ही १०० टक्के उघड्यावर शौचमुक्त नगरपरिषद झाली आहे. नगरपरिषदेने उघड्यावर शौचाविरोधात जनजागृती करण्यासाठी एकता दौड आयोजित केली. स्वच्छतेचे महत्त्व सांगणाऱ्या या दौडीमध्ये विद्यार्थी, शिक्षक, शासकीय कर्मचारी, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी सहभागी झाले.

घर व परिसराची स्वच्छता, प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर न करणे, उघड्यावर शौचास न जाणे याबाबत विविध प्रयत्नांद्वारे जनजागृती करण्यात आली. या प्रयत्नांना जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाला. आता रोज सकाळी ६.३० ते ११.३० या वेळेत शहरातील प्रत्येक रस्त्यांवरून घंटागाडी फिरते. सर्व कचरा गोळा करून ७ कचरा कंटेनर्स आणि १२ कचरा कोंडाळ्यांमध्ये टाकला जातो. याशिवाय आठवडी बाजारापूर्वी आणि बाजार संपल्यानंतर संध्याकाळी रस्ते स्वच्छ केले जातात. घरी शौचालय नसलेल्या कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे. नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये सार्वजनिक शौचालयाच्या १७ इमारती आहेत. ज्यामध्ये ७२ सिट्स उपलब्ध झाल्या आहेत. तसेच फिरत्या शौचालयाची ३ वाहने शहरात आहेत. यामुळे वैयक्तिक शौचालय नसलेली कुटुंबे आता सार्वजनिक शौचालयांचा किंवा फिरत्या शौचालयांचा उपयोग करतात. यामुळे मलकापूर शहरात उघड्यावर शौचास जाणे पूर्णपणे बंद झाले आहे. सार्वजनिक शौचालयांना पुरेसा पाणीपुरवठा केला जातो. तसेच त्यांच्या स्वच्छतेचीही काळजी घेतली जाते. या शौचालयांच्या स्वच्छतेबाबतच्या तक्रारी करण्यासाठी नगरपरिषदेने १८०० २३३ २९३८ हा टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे.

शहर उघड्यावर शौचमुक्त करण्यासोबतच मलकापूरने शहरातील रस्ते, बस स्थानक, सार्वजनिक ठिकाणे यांच्या स्वच्छतेकडेही लक्ष दिले आहे. पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरींमधून गाळ काढून त्यांचे स्रोत पुनरुज्जीवित करण्यात आले आहेत. पुरेसे पाणी, रस्ते, स्वच्छ शहर अशी मलकापूरची ओळख निर्माण होत आहे.



## सातार्‍यात दुर्गंधी हटली, बागा फुलल्या...

सातारा नगरपालिकेने आपले लक्ष्य निर्धारित करून उघड्यावरील शौचपासून मुक्ती मिळवली आहे. ज्या उघड्या जागेवर शौचविधी होत होती तेथे आता बागा फुलल्या आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार सातारा शहरातील ५४२ कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नव्हती. या कुटुंबाना शौचालयाची उपलब्धता करून देणे आवश्यक होते. तिथे ती बांधली गेली आणि जिथे वैयक्तिक शौचालये बांधणे अशक्य होते तिथे सामुदायिक आणि सार्वजनिक शौचालयांचा पर्याय उभा केला. ज्या भागामध्ये वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम करण्यासाठी जागा पुरेशी उपलब्ध नाही, अशा भागांमध्ये नगरपरिषदेमार्फत सार्वजनिक शौचालयांची उभारणी करण्यात येते. तसेच सध्या अस्तित्वातील शौचालय इमारतीची तत्काळ दुरुस्ती करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असल्याने शहरात सध्या ५८९२ कुटुंबे नगरपरिषदेच्या सार्वजनिक शौचालयांचा वापर करतात. यासाठी ११९ विविध इमारतींमध्ये ८६८ समुदाय शौचालय आसने उपलब्ध आहेत.

## पाचगणीच्या सौंदर्यात भर

आपल्या अद्भूत सौंदर्याने देशविदेशातील पर्यटकांना भूल पाडणार्‍या पाचगणीने 'उघड्यावर शौचमुक्त' होण्याचा मान मिळवला आहे. सार्वजनिक आणि वैयक्तिक शौचालयांची निर्मिती करून पाचगणीने हे यश मिळवले.

२०११ च्या जनगणनेनुसार पाचगणीमध्ये १०४ कुटुंबांकडे शौचालये नव्हती. त्यामुळे या कुटुंबांत शौचालयासंदर्भात जागृती निर्माण करणे आवश्यक होते. लोकांनी शौचालये बांधावीत आणि त्याचा वापर करावा यासाठी लोकप्रतिनिधी आणि कर्मचार्‍यांनी जनजागृती कार्यक्रम राबवला. त्याचे फळ म्हणजे लोक शौचालये बांधण्यास तयार झाले.



सार्वजनिक शौचालय वापराबाबत महत्त्वाचा अडसर म्हणजे शौचालयाची अस्वच्छता. यावर नगरपरिषदेने जास्तीत जास्त लक्ष केंद्रित केले. शौचालयाच्या स्वच्छतेचा ठेका देण्यात आला आहे. ठेकेदारामार्फत सर्व सार्वजनिक शौचालय व मुतार्‍या दिवसातून दोन वेळा धुतल्या जातात. औषध फवारणी केली जाते. ठेकेदाराच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी नगरपरिषदेने कायम आस्थापनेवरील कर्मचार्‍यांची नेमणूक करून, स्वच्छतेचे काम व्यवस्थित होईल याकडे लक्ष दिले आहे. तसेच सर्व शौचालयांमध्ये पाण्याची व्यवस्था केली आहे. नगरपरिषदेच्या चांगल्या सुविधा असल्यामुळे अधिकाधिक नागरिक सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात. याशिवाय नगरपरिषदेने ओपन डेफिकेशन ॲक्टनुसार दंडात्मक कारवाई करण्यासाठी दोन कर्मचार्‍यांचे पथक नियुक्त केले आहे. या पथकांमार्फत सकाळी ६ ते ८ या वेळेमध्ये पाहणी करून नागरिकांचे प्रबोधन केले जाते. जरी वैयक्तिक शौचालय नसतील तरी उघड्यावर शौचास नागरिक जाणार नाहीत, याकडे लक्ष दिले जाते.

## स्वच्छ माथेरान

माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेने सार्वजनिक शौचालयांची केलेली व्यवस्था तसेच वैयक्तिक शौचालयांचे असेलेले प्रमाण व या शौचालयांचा वापर करण्याची जागरूकता यामुळे शहरातील सर्व नागरिकांसाठी शौचालयांची १०० टक्के उपलब्धता केली आहे. माथेरान शहरात वाहन वापरण्यास मनाई असल्याने फिरत्या शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली नाही; परंतु तातडीची उपाययोजना म्हणून माणसाने ओढण्याच्या एफआरपीच्या दोन सीटच्या शौचालयाची सुविधा नगरपरिषदेने केली आहे. या शौचालयाचा वापर केल्यानंतर त्याची स्वच्छता त्वरित केली जाते. उघड्यावर शौचास बसणार्‍यावर दंडात्मक कारवाई केली जात आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीच्या आढावामध्ये माथेरान हद्दीत १८ कुटुंबे उघड्यावर शौचास बसत असल्याचे नमूद केले आहे. स्वच्छता विभागाच्या हजेरीच्या वेळेस ४ सुपरवायझरमार्फत उघड्यावर शौचास बसणार्‍यांबाबत पाहणी केली जाते, परंतु त्यांना कोणीही नागरिक उघड्यावर शौचास बसत असल्याचे दिसून आले नाही.



स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

# स्वच्छ सुंदर महाबळेश्वर

निसर्गरम्यतेने नटलेल्या महाबळेश्वरास पर्यटक वर्षभर भेट देतात. ब्रिटिश काळापासून महाबळेश्वराला लाभलेला उत्कृष्ट हिलस्टेशन हा लौकिक आजही कायम आहे. महाबळेश्वर शहराची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १३,४०५ इतकी आहे. या शहरामध्ये लोकसंख्येच्या मानाने सार्वजनिक शौचालय व वैयक्तिक शौचालय यांची संख्या जास्त आहे. हे शहर प्रमुख पर्यटन स्थळ असल्याने स्वच्छतेच्या बाबतीत अतिशय जागरूक व दक्ष असून तेथे उघड्यावर शौचास जाण्याचे प्रमाण नगण्य होते.




२०११ च्या जनगणनेनुसार महाबळेश्वर शहरातील ५० कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नव्हती. जुलै २०१५ मध्ये शासनाच्या सूचनेनुसार महाबळेश्वर नगरपालिकेमार्फत वैयक्तिक शौचालयांच्या उपलब्धतेबाबत सर्वेक्षण करण्यात आले. यानुसार ५७ वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम करणे गरजेचे असल्याचे दिसून आले. परंतु या ५७ पैकी ११ कुटुंबांनी स्वखर्चाने वैयक्तिक शौचालय बांधली असल्याचे फेरसर्वेक्षणावेळेस निदर्शनास आले. उघड्यावरील मलविसर्जनमुक्त करण्यासाठी लोकांना प्रोत्साहन देणे, जनजागृती, वैयक्तिक भेटींच्या माध्यमातून वैयक्तिक शौचालय बांधण्यास सुरुवात करण्यात आली.

## सार्वजनिक शौचालय निर्मिती

महाबळेश्वर हे प्रमुख पर्यटन स्थळ असल्याने याठिकाणी २७ सार्वजनिक शौचालये असून यामध्ये महिलांसाठी ९५ व पुरुषांसाठी १०४ सीट्स उपलब्ध आहेत. ज्या भागांमध्ये वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही, अशा भागांमध्ये नगरपरिषदेमार्फत सार्वजनिक शौचालयांची उभारणी करण्यात आली आहे. सार्वजनिक शौचालयाचा वापर करणाऱ्या कुटुंबांची संख्या ३१४ इतकी असून एकूण कुटुंबसंख्येशी तुलना करता त्याची टक्केवारी १७.१८ टक्के आहे. नगरपरिषदेमार्फत २७ शौचालये ही सेवा फाऊंडेशन, पुणे यांना देखभाल दुरुस्तीसाठी हस्तांतरित केली आहेत.

## सामुदायिक शौचालय

महाबळेश्वर हद्दीमध्ये समूह शौचालय वापरणाऱ्या कुटुंबांची संख्या ७९ इतकी असून एकूण कुटुंब संख्येशी तुलना करता त्याची टक्केवारी ४.३२ टक्के इतकी आहे. ही टक्केवारी शून्य करण्याचा नगरपरिषदेचा मानस आहे.

## लोकप्रतिनिधी आणि नागरिकांचा सहभाग

शहराचा 'उघड्यावर शौचमुक्त' दर्जा राखण्यासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि स्थानिक नगरसेवकांचे मोलाचे योगदान राहिले आहे. प्रभागातील नागरिकांना, वैयक्तिक शौचालय बांधकाम तसे सार्वजनिक शौचालयांचा वापर करण्याबाबत जनजागृती करण्यात नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांना त्यांची मदत झाली. शहरात काही खुले भूखंड अनवधनाने खुल्या मलविसर्जनासाठी वापरात येत होते. हे प्रकार थांबवून, नगरसेवकांच्या पुढाकारातून शहरात अनेक ठिकाणी अशा खुल्या जागांचे रूपांतर सार्वजनिक उद्यानांमध्ये करण्यात आले आहे.

# वेंगुर्ला : संकल्पपूर्तीसाठी जनजागृती

स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची १५ मे २०१५ पासून सुरुवात करण्यात आली व त्या अनुषंगाने कोकण विभागाची कार्यशाळा २९ मे २०१५ रोजी सह्याद्री अतिथिगृह मुंबई येथे झाली. त्याच दिवशी वेंगुर्ला नगरपरिषदेने १०० टक्के शौचालयाचा वापर करण्यास नागरिकांना प्रवृत्त करण्याचा निर्धार केला. त्या अनुषंगाने वेंगुर्ले शहर हागणदारी मुक्त घोषित करण्याकरिता २ ऑक्टोबर २०१५ ही कालमर्यादा निश्चित केल्यानंतर प्रथम प्रसारमाध्यमातून या अभियानास प्रसिद्धी देण्यात आली. याद्वारे स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची स्वच्छतेची सप्तपदीबाबत नागरिकांमध्ये जागृती करण्याचा प्रयत्न केला.

वेंगुर्ले नगरपरिषदेकडे वैयक्तिक शौचालय बांधकाम करण्याकामी एकूण ३९६ अर्ज प्राप्त झाले, त्यापैकी स्थळपाहणीअंती २०४ शौचालय बांधकामाचे उद्दिष्ट निश्चित केले. २०११ च्या जनगणनेनुसार हे उद्दिष्ट २६४ होते. २०४ अर्ज स्वच्छ भारत अभियानाच्या संकेतस्थळावर तपासण्यात आले. २३ सप्टेंबर २०१५ अखेरपर्यंत ११५ शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले. ८९ शौचालयांचे काम चालू स्थितीत आहे.

## गुड मार्निंग पथक

उघड्यावर शौचास जाऊ नये म्हणून १८ सप्टेंबर २०१५ पासून वेंगुर्ले नगरपरिषदेने 'गुड मॉर्निंग पथक' सुरू केले. पहाटेपासून अशी ठिकाणे निश्चित करून त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांमार्फत गस्त घालण्यात येते. एखादी व्यक्ती उघड्यावर शौचासाठी जात असल्याचे आढळून आल्यास संबंधितास नोटीस देऊन समज देण्यात येते. यामुळे नागरिकांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून आला आहे.





**ग्रामीण स्वच्छतेच्या क्षेत्रात महाराष्ट्र नेहमीच राष्ट्रीय स्तरावर दिशादर्शक राज्य ठरले आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाने लोकसहभागाचा आदर्श देशाला दाखवून दिला. केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त सहभागीदारीने यापूर्वी संपूर्ण स्वच्छता अभियान आणि निर्मल भारत अभियान हे कार्यक्रम राबवले गेले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या कार्यक्रमाची देशभर सुरुवात केली. महाराष्ट्रातही राज्यपाल महोदयांनी मंत्रालय परिसरामध्ये स्वच्छतेची शपथ देऊन या कार्यक्रमाची सुरुवात केली. मागील दहा वर्षांचा इतिहास पाहता स्वच्छतेच्या क्षेत्रात काम करणे सर्वांना सवयीचे होते. मात्र स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्तरावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेले अनन्यसाधारण महत्त्व आणि राज्यस्तरावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भक्कम पाठिंब्याने स्वच्छतेची चळवळ जोर धरत आहे.**

# स्वच्छ गावे... सुंदर गावे...

कुमार खेडकर

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने २०१९ पर्यंत राज्य हागणदारीमुक्त करण्यासाठी कालबद्ध नियोजन केले आहे. राज्यातील सर्व जिल्हा परिषदांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कंबर कसली आहे. वास्तविक या चळवळीचा मागोवा घेताना एक बाब प्रकर्षाने लक्षात येते पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या दोन विभागामध्ये ग्रामीण स्वच्छतेचे काम जनतेने मनापासून स्वीकारले आहे, त्यामुळे सद्य:स्थितीमध्ये या दोन्ही विभागामध्ये उपलब्धी मोठी दिसत आहे. असे असले तरी मागच्या वर्षाचा विचार करता मराठवाड्याने या कामात घेतलेला वेग स्पष्टपणे दिसून येत आहे. या मिशनचे उद्दिष्ट पाहता महात्मा गांधीच्या १५० व्या जयंतीनिमित्त म्हणजेच २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत संपूर्ण देश हागणदारीमुक्त करायचा आहे. महाराष्ट्रानेही हे आव्हान स्वीकारले आहे. त्या दृष्टीने गृहपाठ पूर्ण झालेला आहे. त्याचाच परिपाक म्हणून आज घडीला महाराष्ट्रात २००० पेक्षा जास्त ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्याच्या घोषणा संबंधित जिल्ह्यांकडून होत आहेत.

या विभागाचे मंत्री श्री. बबनराव लोणीकर हे स्वत: राज्यभर स्वच्छतेच्या कार्यक्रमाचे महत्त्व सांगत आहेत. गावस्तरापासून राज्यस्तरापर्यंतच्या प्रत्येक बैठकीमध्ये किंवा भेटीमध्ये गावातल्या सामान्य माणसालाही वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध झाली पाहिजे, स्वच्छतेच्या सवयींचा अंगीकार होऊन निरोगी जीवन जगता आले पाहिजे यावर त्यांचा भर असतो. स्वच्छतेमध्ये गावांने उत्कष्ट काम केले आहे असे समजताच ते स्वत: त्या गावाला भेट देऊन तेथील ग्रामस्थांची पाठ थोपटून शाबासकी देतात.

## राज्याची सद्य:स्थिती

राज्याची ग्रामीण स्वच्छतेबाबतची स्थिती विचारात घेता ग्रामीण महाराष्ट्रामध्ये १,२५,२४,७९७ एवढी कुटुंबे वास्तव्य करीत आहेत. अनेक प्रयत्नानंतर ग्रामीण समुदयाचे मतपरिवर्तन होऊ लागलेले दिसून येत आहे. ज्या कुटुंबांकडे शौचालय उपलब्ध आहे अशा कुटुंबांची संख्या ७४,५०,८३३ एवढी आहे. म्हणजेच ग्रामीण स्वच्छतेची व्याप्ती ५९टक्के एवढी झाली आहे. अजूनही वैयक्तिक शौचालयाची सुविधा नाही अशी ५०,७३,९६४ एवढी कुटुंबे आहेत. २०१९ पर्यंत या सर्व कुटुंबांकडे शौचालयाची सुविधा असावी यासाठीचा वर्षनिहाय कृतिआराखडा तयार आहे. केंद्र सरकारकडे हा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सादर करण्यात आला आहे. त्याच आधारावर राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचा सुद्धा हागणदारीमुक्तीच्या प्रयत्नांना मोठा हातभार लागत आहेत.

## २ ऑक्टोबर २०१५ पर्यंत हागणदारीमुक्त होणारे तालुके

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर आणि जावळी, कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड, मालवण, वेंगुर्ला, सावंतवाडी व कणकवली हे तालुके हागणदारी मुक्तीचा उत्सव साजरा करणार आहेत.

## कोल्हापूर जिल्हा हागणदारीमुक्तीच्या अंतिम टप्प्यावर

कोल्हापूर जिल्हा परिषदेने निर्मल ग्राम पुरस्कारात राज्यात व देशपातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. कोल्हापूरच्या ग्रामीण भागात गेल्या १० वर्षात स्वच्छतेची चळवळ प्रत्येक घरापर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे शासनाच्या नव्या निकषांची त्वरित अंमलबजावणी करण्यात आली. २०१२ च्या पायाभूत स्वच्छता सर्वेक्षणाचा सूक्ष्म अभ्यास जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्यावतीने करण्यात आला. त्यानुसार ० उद्दिष्ट असलेल्या २५ ग्रामपंचायती तत्काळ हागणदारीमुक्त (ओडीएफ) घोषित करण्यात आल्या. तसेच १ ते १० शौचालय बांधकामाचे उद्दिष्ट असलेल्या ६४ ग्रामपंचायती ३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याच्या नियोजनात यश आले असून त्या ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत. याव्यतिरिक्त वैयक्तिक शौचालयाचे ५० पेक्षा कमी उद्दिष्ट असलेल्या २८७ ग्रामपंचायतींसह २ ऑक्टोबर २०१५ पर्यंत जिल्ह्यातील ३७६ ग्रामपंचायती हागणदारीमुक्तचे उद्दिष्ट आहे. तसेच २ ऑक्टोबर २०१५ रोजी जिल्ह्यातील गगनबावडा तालुका हागणदारीमुक्त तालुका घोषित करून हागणदारीमुक्ती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे डिसेंबर २०१५ अखेर ५ तालुके हागणदारीमुक्त करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील वैयक्तिक शौचालय बांधकामाचे ५० पेक्षा जास्त व १०० पेक्षा कमी उद्दिष्ट असलेल्या २६९ ग्रामपंचायती ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याचे जिल्ह्याचे ध्येय आहे. उर्वरित २२५ ग्रामपंचायती या १०० पेक्षा जास्त उद्दिष्टाच्या ग्रामपंचायती ३१ मार्च २०१६ अखेर हागणदारीमुक्त करण्याचे नियोजन कोल्हापूर जिल्हा परिषदेने केले आहे. जिल्ह्यात स्वच्छतेची लोकचळवळ बनावी व लोकसहभाग वाढवण्याच्या हेतूने प्रभावीपणे राजर्षी शाहू ग्राम स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे.




## सिंधूदुर्ग जिल्हा हागणदारीमुक्तीच्या दिशेने

सुंदर समुद्रकिनाऱ्याचा जिल्हा, पर्वतांनी आणि प्राकृतिक सौंदर्याने सजलेला जिल्हा, तसेच उष्ण कटिबंधीय फळे देणारा जिल्हा उदा. जगप्रसिद्ध हापूस आंबा, काजू, व जांभूळ इत्यादीसाठी जगप्रसिद्ध असलेला जिल्हा आता लवकरच हागणदारीमुक्त जिल्हा म्हणून जगाला परिचित होणार आहे. २२ सप्टेंबर २०१५ रोजी देवगड तालुक्याने हागणदारी मुक्तीचा उत्सव साजरा केला आहे. लगोलग २ ऑक्टोबर २०१५ पर्यंत मालवण, वेंगुर्ला, सावंतवाडी व कणकवली या तालुक्यांमध्येही हागणदारीमुक्तीचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या जिल्ह्यामध्ये एकूण ४३१ पैकी ४१७ ग्रामपंचायतींना अस्वच्छतेपासून कायमची मुक्ती मिळणार आहे. या जिल्ह्याच्या ग्रामीण क्षेत्रांमध्ये ५००० पेक्षाही कमी कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. येणाऱ्या काही दिवसांमध्येच या सर्व कुटुंबांकडे ही सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा परिषदेची सर्व यंत्रणा, पंचायत समितीची सर्व यंत्रणा मनापासून कामाला लागली आहे. येणाऱ्या काळात हागणदारीमुक्त जिल्हा म्हणून हा जिल्हा नावलौकिक मिळवणार आहे.

## सातारा जिल्ह्यामध्ये स्व-राज्य (स्वच्छतेचे राज्य)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी म्हणजे सातारा जिल्हा. स्वअस्तित्वाचा विचार याच भूमितून पुढे आला. महाराजांचे स्वराज्याचे स्वप्न पूर्ण होतानाही हाच परिसर साक्षीला होता. इतिहासाच्या सर्व टप्प्यांवर येथील वीरपुरुषांनी आपल्या पाऊलखुणा सोडलेल्या आहेत. स्वच्छतेच्या क्षेत्रातही हा जिल्हा आता इतिहास घडवू पाहतोय. २ ऑक्टोबर २०१५ पर्यंत ४७५ ग्रामपंचायती आणि महाबळेश्वर व जावळी हे दोन तालुके हागणदारीमुक्तीचा उत्सव साजरा करीत आहेत. एकूणच स्वच्छतेच्या चळवळीमध्ये जिल्ह्याने सुरुवातीपासूनच मार्गदर्शकाची भूमिका पार पाडलेली आहे. म्हणूनच आता आपण म्हणू शकतो सातारा जिल्ह्यामध्ये स्व-राज्य (स्वच्छतेचे राज्य) येत आहे.

## पुणे ते पंढरपूर स्वच्छता दिंडीचा प्रवास

संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यानिमित्त पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग गेली दहा वर्षे अखंड स्वच्छता दिंडीचे आयोजन करत आहे. स्वच्छतेचे महत्त्व ग्रामीण जनतेला समजण्यासाठी, विविध मनोरंजनाच्या माध्यमातून स्वच्छता दिंडीमध्ये पालखीमार्गावर शासनाकडून कार्यक्रम घेतले जात आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून स्वच्छतेचे संदेश रंगविलेले चित्ररथ व त्याबरोबर अनुभवी कलापथके, सलग पूर्ण वारीमध्ये जनजागृतीचे काम करत असतात. कार्यक्रमाची सांगता पंढरपूर येथे मुख्यमंत्री यांच्या

उपस्थितीत दरवर्षी पार पाडते. कार्यक्रमात स्वच्छता दिंडीतील सहभागी अधिकारी, कर्मचारी व कलाकार यांचा प्रशस्तिपत्रक देऊन सन्मान करतात.

आळंदी व देहू येथून दोन्ही पालख्यांचे प्रस्थान झाल्यानंतर पुणे येथून स्वच्छता रथ पालखीमध्ये सहभागी होतो. याही वर्षी १२ जुलै रोजी पुणे येथील विधान भवनात शुभारंभ कार्यक्रम पार पाडला. विभागीय आयुक्त यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. स्वच्छता दिंडीमध्ये यावेळी अकोला, अमरावती, पुणे, परभणी, वाशिम, बीड, उस्मानाबाद, अहमदनगर, सांगली, लातूर, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, नांदेड, हिंगोली, जालना, ठाणे, रायगड व औरंगाबाद येथून चित्ररथ व कलापथके सहभागी झाली होती. पालखीबरोबर, पालखीच्या विसावा व मुक्काम ठिकाणी या कलापथकांनी उपस्थितांना स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. शाहिरी,



एकपात्री कला, गाणी, श्लोक, भजन, भारुड, बतावणी अशा विविध माध्यमातून स्वच्छतेचे महत्त्व पोहोचवण्यात आले. स्वच्छता दिंडीत दोन्ही पालखीमार्गावर १२ जुलै २०१५ दरम्यान २०० हून अधिक कलाकार, २५ अधिकारी व कर्मचारी, १२ चित्ररथ असा ताफा कार्यरत होता. महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यातून पंढरपूर वारीला निघालेल्या वारकऱ्यांना व मार्गावरील भाविकांना स्वच्छता दिंडीतून शौचालयाचे महत्त्व, शुद्ध पाणी, कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन तसेच पर्यावरण व ग्रामसभेचे महत्त्व पटवून देण्यात आले.पंढरपूर येथे दरवर्षीप्रमाणे मुख्यमंत्री यांनी स्वच्छता दिंडी कार्यक्रमाची सांगता केली. यावेळी सर्व कलाकारांचे कौतुक मुख्यमंत्र्यांनी केले. शासनाकडून अशा उपक्रमांची गरज आहे, आणि यातून स्वच्छतेची चळवळ उभी राहील, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. यावेळी महसूल मंत्री एकनाथ खडसे उपस्थित होते. विकास संवादाच्या प्रक्रियेमध्ये स्वच्छता दिंडीचा उपक्रम राष्ट्रीय स्तरावरही नावाजला जात आहे. वारकऱ्यांचा मूळ स्वभावच विचारांचा प्रसार करणे असतो, स्वच्छता हा एक विचार आहे आणि तो विचार राज्याच्या प्रत्येक गावापर्यंत पोहोचावा या उद्देशाने या स्वच्छता दिंडीमध्ये प्रबोधन केले जाते.

## हागणदारीमुक्त गाव कृतिआराखडा

स्वच्छतेचा कार्यक्रम गावात राबवताना लोकसहभागाची नितांत गरज आहे. त्याचबरोबर निश्चित आकलन आणि नियोजन होणे आवश्यक असते. महाराष्ट्र राज्याने नेहमीच नावीन्याचे स्वागत केले आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) कार्यक्रमामध्येही काही सामाजिक संस्था आणि युनिसेफ यांच्या मदतीने, शासनाच्या वतीने स्वच्छतेसाठी काम करणारी यंत्रणा पाणी व स्वच्छता साहाय्य संस्थेने एक अभिनव पद्धती विकसित केली आहे. समुदाय संचलित हागणदारीमुक्त गाव कृतिआराखडा (ODEP) असे नाव या पद्धतीला देण्यात आले. गावाची निवड झाल्यावर या प्रक्रियेचा अवलंब गावात केला जातो. यामध्ये लोकजागृती होते. लोकसहभागातून स्वच्छतेचा कृती कार्यक्रम तयार होतो. त्या कृती कार्यक्रमाच्या आधारे वर्षभर गावामध्ये काम करता येते. या पद्धतीचा केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये समावेश करण्यात आला आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने एका परिपत्रकाद्वारे ही प्रक्रिया अनिवार्य केली आहे. विभागाचे प्रधान सचिव राजेश कुमार यांच्या पुढाकाराने सध्या राज्यातील अनेक गावात ही प्रक्रिया राबवली जात आहे आणि या प्रक्रियेद्वारे अनेक गावे हागणदारीमुक्त होत आहेत.

## डासमुक्तीचा नांदेड जिल्ह्यातील टेंभुर्णी पॅटर्न

नांदेड जिल्ह्यातील टेंभुर्णी या गावातील अभियंता असलेल्या सरपंच प्रल्हाद पाटील यांनी आपल्या गावातील सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी काम सुरू केले. त्यांच्या प्रयत्नाला यशही मिळाले. पारंपरिक शोष खड्ड्यांमध्ये काही तांत्रिक बदल करून, पाण्याच्या साठ्याच्या ठिकाणी आणि गटाराऐवजी प्रत्येक कुटुंबाकडे शोषखड्डे तयार केले. यामुळे गावात कुठेही सांडपाणी दिसून येत नाही. हा प्रयोग यशस्वी होत आहे असे लक्षात आल्यानंतर नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिमन्यू काळे यांनी काही अभियंत्यांच्या मदतीने काही सुधारणा करून या टेंभुर्णी पॅटर्नची पुनरावृत्ती जिल्हाभर करण्याचे ठरविले. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), मनरेगा या योजनांच्या मदतीने ४०० पेक्षा जास्त गावांमध्ये या पद्धतीने काम सुरू आहे. काम सुरू केलेल्या गावांपैकी १०० गावांमध्ये काम पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील बहुतांश गावांमध्ये याच पद्धतीने डासमुक्ती आणि गटारमुक्ती करण्याचा मानस जिल्हा परिषदेचा आहे. नांदेड जिल्ह्याची प्रेरणा घेऊन इतर जिल्ह्यात हा उपक्रम राबवण्यास सुरुवात झाली आहे. या पॅटर्नची पुनरावृत्ती राज्यभर व्हावी यासाठी विभागाचे प्रधान सचिव राजेश कुमार यांनी चाचपणी सुरू केली आहे.

**(लेखक हे पाणी व स्वच्छता साहाय्य संस्थेत माहिती, शिक्षण व संवाद सल्लागार आहेत.)**
**संपर्क : ०८९७६०८८८८५**

# स्वच्छतेसाठी आपण काय कराल?


स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत विविध उपक्रम राज्यात सुरू आहेत. यामुळे शहरे स्वच्छ होत आहेत. शौचालयांची निर्मिती होत आहे. सरकारी पातळीबरोबरच सामाजिक संस्था, व्यक्ती स्वच्छ महाराष्ट्रासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांच्या प्रयत्नांचे दृश्य परिणाम आता दिसत असले तरी या उपक्रमास सर्वांचाच हातभार लागणे आवश्यक आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या यशस्वितेसाठी आपण खालील प्रतिज्ञा करून मोलाचा हातभार लावू शकतो.

## प्रतिज्ञा

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत महाराष्ट्राला स्वच्छ करण्याची मी प्रतिज्ञा करतो / करते. त्या अनुषंगाने स्वच्छतेच्या सप्तपदीला माझ्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग करेन.

- **मी अस्वच्छता करणार नाही याचा मी निर्धार करतो/करते.**
- **मी ओला आणि सुका कचरा वेगवेगळा करून मगच तो कचरा वाहतूकदाराकडे देईन.**
- **सार्वजनिक ठिकाणी मी स्वच्छता राखेन आणि ही ठिकाणे कोणी अस्वच्छ करत असेल तर त्यांना त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करेन.**
- **मी वैयक्तिक आणि सार्वजनिक शौचालयांचा वापर करेन आणि त्यांच्या वापरासाठी इतरांनाही प्रवृत्त करेन.**
- **मी सार्वजनिक ठिकाणी थुंकणार नाही.**
- **स्वच्छतेच्या मोहिमेत मी माझ्या वैयक्तिक पातळीवर जनजागृती करण्याचा निर्धार करतो/करते.**
- **स्वच्छ महाराष्ट्र हरित करण्याची मी प्रतिज्ञा घेतो.**

## अभियंते बांधणार ६५ शौचालये



समाजाचे आपणही देणे लागतो या भावनेपोटी नाशिक येथील एक अभियंत्यांचा गट काम करत आहे. विवेक पेंडसे, प्रवीण जोशी, सुनील सावंत, विजय जाधव, राजेश लोथे, राहूल वावीकर यांचा यामध्ये समावेश आहे. जलयुक्त शिवार योजनेच्या कामाबरोबरच त्यांनी पेठ तालुक्यातील झरी येथे ६५ शौचालये बांधून देण्याचे निश्चित केले आहे. त्यातील १५ शौचालये बांधून पूर्ण झाली आहेत. सरकारी योजनेला समाजातून असे पाठबळ मिळाले तर स्वच्छ महाराष्ट्राचे स्वप्न साकार व्हायला वेळ लागणार नाही.

## 'लोकराज्य'चे आवाहन

स्वच्छ महाराष्ट्रासाठी अनेक व्यक्ती आणि सामाजिक संस्था खारीचा वाटा उचलत आहेत. नाशिक जिल्ह्यातील या अभियंत्यांच्या गटाने स्वच्छतेप्रती केलेल्या कामाची दखल लोकराज्यने घेतली आहे. आपणही अशाच प्रकारचे कार्य स्वच्छ महाराष्ट्रासाठी करत असाल तर आपल्या कामाबद्दलची माहिती आणि छायाचित्रे लोकराज्यच्या पत्त्यावर पाठवावी. अशा प्रेरणादायी कामांना लोकराज्यमध्ये व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२**
Email : lokrajya2011@gmail.com



# ऋणानुबंधाचे बहुपदरी सेतू

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्राच्या शिष्टमंडळाचा जपान दौरा हा बहुधा नियतीचाच एक अनोखा संकेत असावा ! या दौऱ्याच्या निमित्ताने महत्त्वाकांक्षी एमटीएचएल या सागरी सेतूच्या उभारणीला गती तर मिळालीच पण त्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या अनावरणातून सामाजिक-सांस्कृतिक सामंजस्य करार व गुंतवणूकविषयक परिसंवादांच्या माध्यमातून आर्थिक-औद्योगिक पातळीवरील ऋणानुबंधाचे बहुपदरी सेतू जपानी भूमीशी जोडले गेले. या साऱ्यांमुळे हा केवळ शासकीय पातळीवरचा दौरा न ठरता दोन संस्कृतींमधील ऋणानुबंध दृढ करणारी एक भावपूर्ण भेट ठरली. कधीकाळी 'मेड इन जपान' या उच्च गुणवत्तेचा पासवर्ड मानला जाणाऱ्या शब्दांचे मराठी मनाला मोठे आकर्षण होते. आज 'मेड इन' या भूतकाळवाचक शब्दांऐवजी 'मेक इन महाराष्ट्र' ही वर्तमानदर्शक मोहीम नव्या परिवर्तनशील महाराष्ट्राची ओळख बनू पाहत आहे. तिचा गौरवास्पद परिचय जपानला करून देण्यातही या दौऱ्यामुळे मोठे यश लाभले आहे !**

भारत आणि जपान या दोन्ही देशांमध्ये एक वैशिष्ट्यपूर्ण ऋणानुबंध असून त्याला थोडी-थोडकी नव्हे तर तब्बल दीड हजार वर्षांची दीर्घ परंपरा आहे. भारतातून गेलेला बौद्ध संस्कृतीचा प्रवाह जपानमध्ये केवळ रुजलाच नव्हे तर चांगलाच बहरला आहे. आधुनिक काळातही जपानी संस्कृतीचे इथल्या मनाला असलेले आकर्षण कायम आहे. जपानी उत्पादने, जपानी कार्यसंस्कृती अशा अनेक बाबींबद्दल भारतीयांच्या मनात आगळेवेगळे स्थान आहे. त्याला मराठी मन कसे अपवाद असणार? महाराष्ट्राचाही जपानशी एक स्वतंत्र भावबंध आहे. बौद्ध संस्कृतीचे

प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्रातील अनेक पर्यटनस्थळांचे जपानी पर्यटकांना मोठे आकर्षण आहे. हे संबंध वृद्धिंगत करण्यासाठी दोन्ही बाजूंनी सातत्याने प्रयत्न होत असतो.

सांस्कृतिक पायावर उभी असलेली या दोन संस्कृतींमधील ऋणानुबंधाची ही इमारत अलीकडच्या वाढत्या आर्थिक-औद्योगिक सहकार्यामुळे मजबूत होत आहे. या संबंधांना नवे अनोखे परिमाण नुकतेच लाभले आहे, ते आहे सामाजिक समतेचे. जपानमधील कोयासन विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी मराठी आणि जपानी संस्कृतीमधील साहचर्य एका वेगळ्याच उंचीवर पोहोचले आहे. याला निमित्त ठरले राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्याच्या शिष्टमंडळाचा नुकताच पार पडलेला जपान दौरा. या शिष्टमंडळात उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश होता.

या दौऱ्याचे प्रमुख निमित्त आणि आकर्षण होते कोयासन विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाचे. कोयासन आपल्या स्थापनेचे १२००वे वर्ष साजरे करीत असून भारतासह जगभरात बाबासाहेबांचे १२५वे जयंती वर्ष साजरे होत आहे. या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाच्या निमित्ताने एक ऐतिहासिक महत्त्वाचे औचित्य जुळून आले. महाराष्ट्र संस्कृतीचे प्रतीक म्हणून उपस्थित पाहुण्यांसह जपानी नेत्यांनीही उत्साहात भगवे फेटे बांधले. तुतारी वाजवून सर्वांचे स्वागत करण्यात आले. या सोहळ्यास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शानदार आणि भावपूर्ण सोहळ्यात मुख्यमंत्री म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा येथील पुतळा महाराष्ट्र आणि भारताच्या जनतेकडून कोयासन आणि जपानच्या नागरिकांना दिलेली एक अमूल्य भेट आहे. वाकायामाचे गव्हर्नर योशिनोबू निसाका, राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई, खासदार रामदास आठवले व इतर मान्यवर या वेळी उपस्थित होते.

याच कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस आणि वाकायामाचे गव्हर्नर योशिनोबू निसाका यांच्या उपस्थितीत औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि कोसायन विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या दोन्ही विद्यापीठांमधील संबंध अधिक वृद्धिंगत करण्यावर या करारात भर देण्यात आला आहे.

## वैश्विक मानवंदना!

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे यंदा १२५वे जयंती वर्ष सर्वत्र साजरे करण्यात येत असतानाच, जपानच्या कोयासन विद्यापीठात अपूर्व उत्साहात झालेल्या अनोख्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. बाबासाहेबांचे वास्तव्य असलेल्या लंडनमधील वास्तू खरेदीची प्रक्रिया गेल्याच महिन्यात मार्गी लागली आहे. तसेच इंदू मिलच्या जागेवरील भव्य स्मारकाच्या उभारणीचीही प्राथमिक तयारी पूर्ण झाली आहे. यासोबतच जपानमधील पुतळ्याच्या अनावरणातून राज्यघटनेच्या थोर शिल्पकाराच्या गौरवाचे एक चक्र जणू राज्य शासनाने पूर्ण केले असून, शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षात बाबासाहेबांना महाराष्ट्र शासनातर्फे जणू वैश्विक मानवंदना देण्यात आली आहे.**

**हेमराज बागूल**

### राज्यात जपान कक्षाची निर्मिती

जेट्रो या अग्रगण्य जपानी आर्थिक संस्थेच्या मदतीने महाराष्ट्रात सुपा येथे जपानी औद्योगिक पार्कची निर्मिती करण्यात येत आहे. या औद्योगिक वसाहतीतील गुंतवणूकविषयक उपक्रमांना तसेच महाराष्ट्र शासनाकडून राबवण्यात येणाऱ्या उपाययोजनांना जेट्रोकडून आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अनुशंगाने जपानच्या गुंतवणूकदार कंपन्यांच्या सोयीसाठी आणि त्यांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी राज्यात एक स्वतंत्र जपान कक्ष निर्माण करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी टोकियोत केली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि जेट्रोतर्फे महाराष्ट्रातील

### जपानी पर्यटकांना मुख्यमंत्र्यांचे आवतन !

**'व्हिजिट महाराष्ट्र बुद्धिस्ट टुरिस्ट सर्किट' परिसंवादामध्येही मुख्यमंत्र्यांनी सहभाग घेतला. या परिसंवादात त्यांनी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीच्या मदतीने (जायका) अजिंठा आणि वेरूळ येथे विकसित करण्यात आलेल्या टुरिस्ट सेंटरची माहिती दिली. या ठिकाणी पहिल्या टप्प्यातील विविध कामे पूर्ण केल्यानंतर राज्यात समतोल पायाभूत सुविधा आणि अन्य विकासाबाबत जायकाकडून सहकार्य वाढविण्यात येत आहे. जपानी पर्यटकांनी राज्याला मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.**



गुंतवणुकीसंदर्भात आयोजित केलेल्या परिसंवादात मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय जाहीर केला.

### वित्त, व्यापार मंत्र्यांचे आश्वासन

मुख्यमंत्र्यांची जपानचे वित्त, व्यापार आणि उद्योग मंत्री योईची मियाझावा यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली. मुंबई ट्रान्सहार्बर लिंक (एमटीएचएल) या प्रकल्पाबाबत जलद गतीने कारवाई करण्याबाबत श्री. मियाझावा यांनी या चर्चेदरम्यान सहमती दर्शविली. यावेळी जपानच्या अर्थ, व्यापार आणि उद्योग विभागाशी महाराष्ट्र शासनाकडून सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार खासगी व सार्वजनिक भागीदारीतून राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासाबाबत जलदगतीने कार्यवाही करण्यात येणार आहे. जपानी उद्योजकांसाठी सुपा येथील औद्योगिक वसाहतीबाबतच्या निर्णयाचे जपानच्या उद्योगमंत्र्यांनी स्वागत केले. मुंबई, नागपूर आणि पुणे येथील मेट्रोच्या उभारणीसाठीही सहकार्य करण्याबाबत दोन्ही पक्षात एकमत झाले. तसेच नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्रात स्मार्ट सिटी विकसित करण्याबाबतही यावेळी सकारात्मक चर्चा झाली.

### नायडेकला महाराष्ट्रात रस

**नायडेक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री नागामोरी यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. इलेक्ट्रिक मोटर्सचे उत्पादन करणारी ही कंपनी असून, त्यांची उत्पादने संगणकातील हार्डडिस्क ड्राईव्ह, इलेक्ट्रॉनिक उत्पादने आणि ऑटोमोबाईल क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. जागा आणि इतर बाबींची पाहणी करण्यासाठी या कंपनीने, आपले एक पथक आपण लवकरच महाराष्ट्रात पाठवू, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांना दिले.**

### महाराष्ट्र 'फॅक्टरी ऑफ ग्लोब' !

जपान दौऱ्याच्या पहिल्या दिवशी ओसाका येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि जपानमधील जेट्रो उद्योगसमूह यांच्या वतीने, महाराष्ट्र राज्य गुंतवणूक प्रोत्साहन चर्चासत्र झाले. समृद्ध लोकशाही आणि त्यासोबतच भविष्यात मोठ्या संख्येने उपलब्ध होणारी तंत्रकुशल तरुणाई यामुळे भारतासोबतच महाराष्ट्रही 'फॅक्टरी ऑफ ग्लोब' होण्याच्या दिशेने आगेकूच करीत आहे, असा आत्मविश्वास मुख्यमंत्र्यांनी या चर्चासत्रात व्यक्त केला.

ओसाका येथील कन्साई आर्थिक परिषद आणि ओसाका चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या प्रतिनिधींसोबतही मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. यात ओसाका चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या आंतरराष्ट्रीय व्यवसाय समितीचे अध्यक्ष आणि मारूबेनी कार्पोरेशनचे (ओसाका) महाव्यवस्थापक मसाशी हासिमोटो तसेच कन्साई आर्थिक परिषदेच्या आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिषदेचे उपाध्यक्ष योशिमासा ओहाशी यांनी सहभाग घेतला. ओसाका हे कन्साई प्रांतातील मध्यवर्ती शहर असून जपानमधील प्रमुख उत्पादन केंद्र आहे. या प्रांताची अर्थव्यवस्था सुमारे ८०० अब्ज डॉलर्सची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जपान भेटीनंतर या प्रांताशी असलेले संबंध वृद्धिंगत करण्यासह जागतिक भागिदारीसाठी या फोरमच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार आहे. भारत पुरवठादार साखळी परिषदेचे (इंडिया सप्लाय चेन कॉन्फरन्स) मुख्यमंत्र्यांनी उद्घाटन केले. तसेच ओसाका पोर्ट प्रमोशन असोशिएशनतर्फे आयोजित चर्चासत्रातही उद्योजकांना

## 'मेक इन महाराष्ट्रा'ला मोठा प्रतिसाद




मेक इन महाराष्ट्रच्या आवाहनाला प्रतिसाद देत; जपानमधील तीन कंपन्यांनी आपला व्यवसाय महाराष्ट्रात सुरू करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांना सहमतीपत्र दिले. त्यात इलेक्ट्राईक कंपनीचे मुख्य कार्यकारी संचालक नोबोरू मत्सुनामी यांनी ईट्राईक या ऑटोरिक्षाचे उत्पादन महाराष्ट्रात करण्याची तयारी दर्शविली आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था संपूर्णपणे पर्यावरणपूरक असावी, या हेतूने या ऑटोचे उत्पादन केले जाते. ए टू केअर या औषधनिर्मात्या कंपनीच्या वतीने कंपनीचे अध्यक्ष हिरोशी ओकामोटो यांनी सहमती पत्र दिले. ही कंपनी नदी आणि धरणांमधून शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी पाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या उत्पादनांची निर्मिती करतात. तिसरी कंपनी एएस ब्रेन यांनी हॉस्पिटॅलिटी, पायाभूत सुविधा आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्रात व्यवसाय सुरू करण्याची तयारी दर्शविली. या कंपनीतर्फे मुख्य कार्यकारी संचालक ताकेशी वाशितानी यांनी मुख्यमंत्र्यांना सहमती पत्र सोपविले.

हे तिन्ही करार करण्यात फ्रेंडस ऑफ जपान असोसिएशनने अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका वठविली आहे. असोसिएशनतर्फे, मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्याच्या निमित्ताने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रात अधिकाधिक गुंतवणूक यावी, या हेतूने समन्वयकाच्या भूमिकेतून काम करण्याची तयारी या असोसिएशनने दर्शवली आहे आणि तशा आशयाचे पत्रही एमआयडीसीला दिले.

सॉफ्टबँक समूहाचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मासायोशी सोन यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. सॉफ्ट बँक ही जगातील ६२ व्या क्रमांकाची मोठी संस्था असून ब्रॉडबँड, ई-कॉमर्स, इंटरनेट, संबंधित तांत्रिक सेवा, वित्त पुरवठा, माध्यमे आणि विपणन आदी क्षेत्रातील जपानची आघाडीची बहुराष्ट्रीय संस्था आहे.

मार्गदर्शन केले.

जपानमधील पुरवठादार साखळी व्यवस्थापनविषयक समूहांसाठी महाराष्ट्रात नव्या संधी उपलब्ध असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. राज्यात सार्वजनिक-खासगी क्षेत्रासह रेल्वेच्या सहकार्याने नवीन बंदरांच्या विकासासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची मुख्यमंत्र्यांनी बंदर विकासाबाबतच्या चर्चासत्रात माहिती दिली.

## जपानचे बुलेट ट्रेनसाठी सहकार्य

जपानचे भूमी, पायाभूत सुविधा, परिवहन आणि पर्यटनमंत्री अकिहिरो ओटा यांच्याशीही मुख्यमंत्र्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. मुंबई-अहमदाबाद दरम्यानच्या बुलेट ट्रेनच्या प्रकल्पासाठी शिनकानसेन या संस्थेचे सहकार्य मिळविण्याविषयी श्री. अकिहिरो यांना मुख्यमंत्र्यांनी विनंती केली. शिनकानसेन हे जपानमधील अतिवेगवान रेल्वेमार्गाचे जाळे असून चार प्रमुख जपानी रेल्वे समुहांकडून त्यांचे व्यवस्थापन पाहिले जाते. मुंबई ट्रान्सहार्बर लिंक प्रकल्पासाठी सहकार्य करण्याचेही श्री. अकिहिरो यांनी मान्य केले.

## पोराइट कॉर्पोरेशन २०० कोटी गुंतविणार




**पोराइट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष मासानोरी किकूची यांनी मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेत राज्यातील तळेगाव येथील औद्योगिक वसाहतीतील २०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावानुसार पोराइट कॉर्पोरेशन तळेगाव औद्योगिक वसाहतीत पावडर मेटॅलर्जी प्रकल्प उभारणार आहे. पहिल्या टप्प्यात १०० कोटी तर दुसऱ्या टप्प्यात आणखी १०० कोटींची अशी एकूण २०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे.**

## ‘मिझुहो’ सोबतचा करार

जपान दौऱ्याच्या अखेरच्या दिवशी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत एमआयडीसी आणि मिझुहो बँक यांच्यात राज्यातील गुंतवणूक प्रक्रियेला गती देण्याच्या दृष्टीने एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या करारामुळे जपानी कंपन्यांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने मोठी चालना मिळणार आहे. मिझुहो ही जागतिक पातळीवरील आघाडीची वित्तीय संस्था असून असंख्य जपानी गुंतवणूकदार त्यांचे ग्राहक आहेत. जपानमध्ये नोंदणीकृत असलेल्या किमान ७० टक्के कंपन्या या मिझुहो बँकेशी जोडल्या गेल्या आहेत. ‘फॉर्च्युन १०००’ मधील सुमारे २५० वर कंपन्यांशी या बँकेचे व्यावसायिक सहकार्य आहे. चार दिवसांच्या या दौऱ्यात मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखालील शिष्टमंडळाने अतिशय उत्साहाने अनेकविध उपक्रमांत सहभाग दिला. एकूणच आर्थिक-औद्योगिक-सांस्कृतिक अशा विविधांगाने हा दौरा विलक्षण यशस्वी ठरला. हे समाधान मनी बाळगूनच राज्याच्या शिष्टमंडळाने जपानला सायोनारा केला !

## ट्रान्सहार्बर लिंकसाठी ‘जायका’चे अर्थसाहाय्य

जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (जायका) या प्रसिद्ध जपानी वित्तीय संस्थेचे वरिष्ठ उपाध्यक्ष हिदाईकी डोमोची, दक्षिण आशियाचे विकासविषयक विभागाचे महासंचालक श्री. अरेई, भारतातील प्रमुख प्रतिनिधी साकामोटो यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी उत्साहपूर्ण वातावरणात सकारात्मक चर्चा केली. या चर्चेचे फलित म्हणून मुंबई महानगरातील परिवहन क्षेत्रात महत्त्वपूर्ण क्रांती घडवू शकणाऱ्या शिवडी ते न्हावाशेवा दरम्यानच्या मुंबई ट्रान्सहार्बर लिंक उभारणीसाठी जलदगतीने अर्थसाहाय्य करण्याची घोषणा जायकाने केली. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे डिसेंबर २०१५ पासून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेस सुरुवात होणार आहे. तब्बल २२ किलोमीटर अंतराचा सहापदरी असणारा हा सेतू मुंबई शहराशी रायगड जिल्हा आणि




नवी मुंबई परिसर जोडण्यात क्रांतिकारी भूमिका बजावणार आहे. त्यातील साडेसोळा किलोमीटर अंतराचा खाडीपूल असून उर्वरित साडेपाच किलोमीटर अंतराचे पुलाच्या स्वरूपातील जोडरस्ते असतील. प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशीही या प्रकल्पामुळे गतिमान संपर्क होणार आहे. मुंबई शहराच्या परिवहनावरचा ताण कमी करण्यास हा प्रकल्प मोठ्या प्रमाणावर साहाय्यभूत ठरणार आहे. जायकाने याबाबत भरीव सहकार्य करण्याचे मान्य केल्याने हा प्रकल्प लवकरच साकारणार आहे. मुंबईच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांच्या जपान दौऱ्याची ही सर्वाधिक महत्त्वाची फलश्रुती आहे.

**(लेखक हे मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९२२६२९७२०३**

## टंचाईग्रस्तांना दिलासा

**मराठवाडा विभागात सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस झाल्याने प्रचंड पाणीटंचाई निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी पेरण्या झालेल्या नाहीत तर जिथे पेरण्या झाल्या तिथे पावसाने ओढ दिल्याने पिके वाळून गेली आहेत. गेल्या पाच वर्षांपासून मराठवाडा दुष्काळात अडकून पडला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागासाठी तातडीने मदत करण्याचे जाहीर केलेच, त्याचबरोबर दुष्काळी परिस्थितीतील शेती आणि शेतकऱ्यांची अवस्था पाहण्यासाठी मराठवाड्याचा तीन दिवसांचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला. प्रसंगी आणखी कर्ज काढू पण शेतकऱ्यांच्या समस्या प्राधान्यांने सोडवू असा आशावाद त्यांनी दिला. टंचाईग्रस्त भागात पाण्याचे टँकर आणि चारा छावण्या उभारण्याचे आश्वासन नुसते दिले नाही तर त्यावर कार्यवाही केली. मुख्यमंत्र्यांनी आपल्या तीन दिवसांच्या दौऱ्यात शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले, टंचाई परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना शुल्कमाफी, अन्नसुरक्षेच्या कक्षेत शेतकऱ्यांना आणणे अशा उपाययोजनांची माहिती दिली.**

# शेतकरी बांधवांनो, शासन भक्कमपणे तुमच्या पाठीशी



मराठवाडा विभागात २०११ पासून अपुरा, अनियमित आणि अवेळी पाऊस पडत आहे. २०११ च्या पावसाळ्यात वार्षिक सरासरीच्या ८४ टक्के, २०१२ मध्ये ६९ टक्के, २०१३ मध्ये १०९ टक्के तर गेल्या वर्षी म्हणजे २०१४ मध्ये अवघा ५३ टक्के पाऊस झाला होता. या पार्श्वभूमीवर यंदा जून महिन्यात पावसाला तशी चांगली सुरुवात झाली. सुरुवातीच्या पावसामुळे यंदा मृग नक्षत्रातच निदान काही भागात पेरण्या होतील अशी आशा वाटू लागली. प्रारंभीच्या पावसावर विश्वास ठेवून पेरण्या झाल्याही. मात्र जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यात पावसाने जबरदस्त ओढ दिली. त्याचा परिणाम असा झाला की, ऐन पावसाळ्यात विभागात पाणी पुरवठ्यासाठी जवळपास बाराशेवर टँकर तैनात करावे लागले. विभागात जेथे तुलनेने अधिक पशुधन आहे, अशा बीड, उस्मानाबाद आणि लातूर या तीन जिल्ह्यात ऑगस्ट अखेरीस चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला. गेल्या वर्षी परतीचा पाऊस फारसा आला नव्हता. या पार्श्वभूमीवर खरीप पिकाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या अशा जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यातील पावसाचा प्रदीर्घ खंड, यंदा तीव्र दुष्काळाचे सावट घेऊन आला. या विभागाला अवर्षण नवे नसले तरी ऐन पावसाळ्यातच त्याचा सामना करण्याची वेळ आली आणि सामान्य शेतकरी धास्तावून गेला. घरात पाणी नाही, रानात चारा नाही अशी अवस्था झाली. या अवस्थेत त्याचे गाऱ्हाणे ऐकूण घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या विभागात आले. दिवसरात्र एक करत त्यांनी लातूर, उस्मानाबाद, बीड, परभणी व नांदेड असा तीन दिवसांचा दौरा केला. प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी, उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा आढावा, शेतकऱ्यांचे आणि लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकणे व लगोलग निर्णय घेणे असे या दौऱ्याचे स्वरूप होते. हा दौरा म्हणजे निर्णय प्रक्रियेतील साखळीचा एक भाग होता.

**राधाकृष्ण मुळी**



### मुक्त संवाद

पीक परिस्थितीची पाहणी, शेतकऱ्यांशी संवाद, उपाययोजनांसंदर्भात शेतकऱ्यांचे आणि आढावा बैठकीत




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठवाड्याच्या पाणीटंचाई पाहणी दौऱ्यावर असताना बीड येथील एका कार्यक्रमात पावसाने हजेरी लावली. टंचाईने होरपळलेल्या या भागात पावसामुळे लोकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. मुख्यमंत्र्यांनीही भर पावसात आपले भाषण सुरू ठेवले.

जिल्हास्तरीय यंत्रणा व लोकप्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकणे असे या दौऱ्याचे स्वरूप होते. १ सप्टेंबरला दुपारी दोन वाजता म्हणजे अगदी नियोजित वेळी मुख्यमंत्र्यांचे लातूर विमानतळावर आगमन झाले.

तेथून पुढे मोटारीने त्यांनी लातूर, उस्मानाबाद, बीड, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यांचा दौरा केला. तीन दिवसात सुमारे ३० ठिकाणी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. या दौऱ्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सुरुवात अगदी वेळेवर झाली. पुढील दोन दिवस हा शिरस्ता कायम राहिला. दौऱ्याच्या दिवशीचा शेवटचा कार्यक्रम मात्र, नियोजित वेळी संपू शकला नाही. याचे कारण म्हणजे शेती आणि त्यातील परिस्थिती, सरकारने योजलेले उपाय आणि त्यात अपेक्षित असलेली सुधारणा या बाबतीत कोणीही बोलू लागले की, त्याचे म्हणणे मुख्यमंत्र्यांकडून अगदी शांतपणे आणि

## मुख्यमंत्र्यांचा झंझावात

- १ ते ४ सप्टेंबर या ४ दिवसात ६ जिल्ह्यात दौरा (मराठवाड्यातील लातूर, बीड, उस्मानाबाद, परभणी, नांदेड हे पाच जिल्हे आणि अहमदनगर सहावा जिल्हा) (मराठवाड्यातील ३१ आणि अहमदनगरमधील ५ अशी ३६ गावे, सोलापूरमधील ४ गावे)
- जाणीवपूर्वक रस्त्याने प्रवास. ७५० कि.मी. चा प्रवास, ३० हजार शेतकऱ्यांशी संवाद
- बांधावर, गावात जाऊन शेतकरी बांधवांशी चर्चा. शेतातील पीक परिस्थिती, चारा छावणी, जलयुक्त शिवारच्या कामांना भेटी
- यापूर्वी एखाद-दुसऱ्या गावात भेट देऊन आढावा बैठक घेतली जायची. त्याला छेद देत मुख्य सचिव सोबत असल्याने शासन-प्रशासन एकत्रितपणे लोकांसमोर गेले.

पुरेसा वेळ देत ऐकले जात होते. आपण पाहायला आणि ऐकायला आलो आहोत, पाहणीनंतर आणि म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आहे त्या उपाययोजनेत सुधारणा आणि त्याचबरोबर काही नव्या उपाययोजना करणे हाच मुळी आपल्या दौऱ्याचा हेतू आहे; याची त्यांनी ग्रामस्थांना आणि यंत्रणेला जाणीव करून दिली. दौऱ्याचा कालावधी आणि त्यात सामावलेले भौगोलिक अंतर या दृष्टीनेही दौरा अपवादात्मक होता. ज्यांच्यासाठी निर्णय घेतले जाणार आहेत, त्यांची परिस्थिती काय आहे, निर्णय किती परिणामकारक ठरत आहेत आणि त्यात वस्तुस्थिती लक्षात घेऊन कोणते बदल करावे लागणार आहेत, हे खुद्द मुख्यमंत्र्यांनीच पाहणीअंती ठरविणे हा अनुभव सगळ्यांसाठी नवीन होता. यापूर्वी या विभागात अशा पद्धतीने सलग तीन दिवस मुख्यमंत्र्यांचा मोटारीने दौरा होणे आणि त्यात जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेचे प्रमुख म्हणजे मुख्य सचिव यांचा सहभाग असणे ही बाब अनुभवली गेली नव्हती. अपवाद असलाच तर तो १९९३ च्या भूकंपाचा असू शकेल.

### शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित

आपल्या पदासोबत येणारा बडेजाव बाजूला ठेवून मुख्यमंत्र्यांनी रानातील पीक परिस्थिती पाहिली. आपल्या शिवारातील आणि परिसरातील चित्र साक्षात मुख्यमंत्री पाहतो आहे, त्यामुळे आपल्या प्रश्नांवर काही तरी कायमस्वरूपी उपाय योजला जाईल, याची शेतकऱ्यांना आशा वाटू लागली.

याशिवाय विकेंद्रित पाणी साठ्याचा हेतू डोळ्यांसमोर ठेवून राबवण्यात आलेल्या जलयुक्त शिवार योजनेतील काही कामेही त्यांनी पाहिली. लातूर जिल्ह्यात सायंकाळच्या वेळी एक शेततळे त्यांनी पाहिले. अपुऱ्या पावसातही हे शेततळे शेतमालकाच्या जीवनाचा आधार ठरले आहे, हे त्यांनी मग सर्वांना दाखवून दिले. पुढील प्रत्येक भाषणात आणि संवादात या शेततळ्याचा आवर्जून उल्लेख झाला. बीडला तर त्यांनी मागेल त्याला शेततळे देण्याची भूमिका मांडली. रोजगार निर्मिती आणि भविष्यात पाणी साठवण्यासाठी, मर्यादित खर्चात आणि मर्यादित कालावधीत काही व्यवस्था करणे ही उद्दिष्टे त्यामुळे साध्य होतील; असे त्यांनी सांगितले.

राज्यातील अपुऱ्या पावसाचा आणि ऊसतोडीसाठी मोठ्या प्रमाणावर जेथून हंगामी स्थलांतर होते, अशा जिल्ह्यात शेत तेथे शेततळे ही योजना विलक्षण परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता ठेवते. साक्षात मुख्यमंत्र्यांनीच या योजनेच्या अंमलबजावणीची ग्वाही दिल्याने या जिल्ह्यासाठी आणि तसा विचार केला तर

## महत्त्वाच्या घोषणा

- **शेत तेथे शेततळी, संरक्षित सिंचन आणि रोजगार (मागेल त्याला काम, जॉब कार्ड)**
- **मनरेगाच्या माध्यमातून रोजगाराचे नियोजन (बीड : २ लाख, उस्मानाबाद : ३ लाख, लातूर : २.७० लाख, नांदेड : १.७० लाख, परभणी : १.७५ लाख)**
- **जिल्हा/तालुका/गाव पातळीपर्यंत पाण्याचे नियोजन**
- **१० टक्के अतिरिक्त पाणी जनावरांसाठी**
- **रेल्वे वाघिणीच्या माध्यमातून पाणीपुरवठा**
- **कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मराठवाड्याला देणार**
- **वीजदेयके, कर्जवसुलीच्या स्थगितीचा लवकरच निर्णय**
- **चारा छावण्यांच्या नियमांमध्ये शिथिलता, २५० पशुधनासाठी सुद्धा चारा छावणी**
- **आवश्यकता पडल्यास बाहेरच्या राज्यातून चारा आणणार**
- **जनावरांच्या चाऱ्यासाठी ५० कोटींचा वैरण विकास कार्यक्रम**
- **हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाद्वारे चाऱ्याची निर्मिती**
- **शेतकऱ्यांना नव्या कर्जासाठी पात्र ठरविण्यासाठी हालचाली**
- **सोलापूर शहराला उजनीचे पाणी आणि शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते एनटीपीसीला विकणार. जलशुद्धीकरण प्रकल्पासाठी केंद्र सरकार पैसे देणार**



विभागासाठीही या दौऱ्याची ही मोठी फलनिष्पत्ती ठरते. हा दौरा निर्णय प्रक्रियेतील साखळीचा एक भाग होता, हे म्हटले आहे ते याचसाठी. या दृष्टीने आणखी एक उदाहरण देता येईल. दौऱ्याची सुरुवात लातूरला दुपारी झाली आणि त्याच दिवशी रात्री उशिरा उस्मानाबाद येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जेव्हा उस्मानाबाद आणि लातूर या दोन जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला, तेव्हा लातूर शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न त्याच्या तीव्रतेसह समोर आला. मुख्यमंत्र्यांनी विविध पर्यायांची व्यवहार्यता तपासण्याचे आदेश दिले. दौरा संपताच विभागीय आयुक्त कार्यालयात या अनुशंगाने लगेच एक बैठक झाली. पाणी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांनीही तातडीने लातूरचा दौरा केला. प्रश्न मार्गी लागण्यासाठी पुढच्या हालचाली लगोलग झाल्या.

राज्याचा प्रमुख कोणत्या योजनेला महत्त्व देतो ही बाब यंत्रणा गतिमान होण्यासाठी आवश्यक ठरते. गेल्या उन्हाळ्यात तसेच पावसाळा सुरू होताना मुख्यमंत्र्यांनी विभागातील जलयुक्त शिवार योजनेच्या कामांची पाहणी करून; या योजनेचे महत्त्व जनता आणि यंत्रणा यांच्या मनावर बिंबवले होते. जेथे काम झाले तेथे कौतुकही जाहीरपणे केले होते. टंचाई दौऱ्यात मुख्यमंत्र्यांनी उपाययोजनांचा आढावा आणि फिडबॅक घेताना नेमके हेच साध्य केले.



### शेतकऱ्यांपर्यंत अन्नसुरक्षा

शासनाने विद्यमान परिस्थिती लक्षात घेऊन, शेतकऱ्यांना माफक दरात अन्नधान्य पुरवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. मराठवाड्यात त्याची अंमलबजावणी १५ ऑगस्टला सुरू झाली. मुख्यमंत्र्यांनी दौऱ्यातील पहिल्याच गावात म्हणजे लातूर जिल्ह्यातील शिरुर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथे या योजनेच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. योजना राबवणाऱ्या रेशन दुकानाला भेट दिली. लोकांचे व यंत्रणेचे म्हणणे ऐकले. पुढे दौऱ्यात प्रत्येक ठिकाणी शेतकऱ्यांसमोर बोलताना त्यांच्यासाठी राबवल्या जाणाऱ्या अन्नसुरक्षा योजनेचा मुख्यमंत्र्यांकडून उल्लेख झाला की त्याला शेतकऱ्यांकडून थेट दाद मिळत होती. लातूर जिल्ह्यातील येरोळ या गावापासून नांदेड जिल्ह्यातील अंबेसावंगी या गावापर्यंत हेच चित्र कायम होते. सबंध देशात शेतकऱ्यांसाठी विनाअट अन्नसुरक्षा योजना राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या योजनेचे महत्त्व आणि योजनेला मिळणारा प्रतिसाद या दौऱ्यात अधोरेखीत झाला. दौऱ्यातील हा संदेश यंत्रणेच्या निश्चितच लक्षात आला आणि मुख्य म्हणजे अशी योजना राबवली जात आहे, ही माहिती गावोगावी पोहोचवण्याची आवश्यकताही स्पष्ट झाली. या दौऱ्यातील मुख्यमंत्र्यांचा शेतकऱ्यांशी झालेला संवाद या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण आणि लक्षात घेण्यासारखा होता. सरकार परिस्थिती पाहून निर्णय घेत आहे आणि निर्णयात शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक ते बदलही करत आहे, हे त्यांनी वेळोवेळी सांगितले. ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस चारा छावण्या सुरू करण्याचा अपवादात्मक निर्णय सरकारने घेतला आणि त्याचबरोबर या निर्णयात सुरुवातीला नमूद करण्यात आलेल्या अनामत रक्कमेच्या तसेच जनावरांच्या किमान संख्येच्या अटी शिथील करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लातूर, उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यातील चारा छावण्यांना त्यांनी भेटी दिल्या. शेतकरी संकटात असल्याखेरीज त्याची जनावरे दुसऱ्याच्या दारात बांधणार नाही, यावर आपला विश्वास आहे, हे सांगतानाच त्यांनी छावणी चालवणाऱ्या संस्थांची जबाबदारी स्पष्ट केली. या संस्थांना जिल्हा प्रशासन सहकार्य करेल हे सांगितले. शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू केलेल्या छावण्या टीकेचे लक्ष्य ठरणार नाहीत अशा पद्धतीने काम केले जावे हेही बजावले. छावणीतील सुविधांची त्यांनी जाणीवपूर्वक पाहणी केली. जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यक्षेत्रातील छावण्यांची नियमित पाहणी करावी असेही निर्देश दिले.

### गंभीर परिस्थितीचे संधीत रूपांतर

अशा अभूतपूर्व परिस्थितीत जिल्हा प्रशासनाला नियोजनपूर्वक काम करावे लागणार आहे, असे सांगून जेथे अशा पद्धतीने काम सुरू आहे, तेथे अशा कामांचा जाहीरपणे गौरव केला. ही वेळ संघर्षाची, राजकारणाची किंवा गटबाजीची नाही, हे त्यांनी सांगितले. चारा, पाणी आणि रोजगारासाठी कोठेही पैसा कमी पडणार नाही किंवा जाचक अटी आड येणार नाहीत, याची त्यांनी ग्वाही दिली. प्रश्न काय आहे, प्रश्नांची तीव्रता किती आहे आणि या प्रश्नांवरील तातडीचे तसेच दीर्घकालीन उपाय कोणते आहेत, या उपायांची अंमलबजावणी कशी होते आहे, स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन उपाययोजनेत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, या सर्व बाबींच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा आणि उदाहरण घालून देणारा ठरला. अवर्षण आणि त्यासोबत येणारी पाणी टंचाई मराठवाड्याला नवीन नाही. यंदाचे वर्ष तीव्रतेच्या दृष्टीने अपवादात्मक आहे. मात्र या परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकार सज्ज आहे, हा दिलासा मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याने दिला.

**(लेखक हे मराठवाडा विभागीय (प्र.) संचालक (माहिती) आहेत.)**
**संपर्क : ०९४२२६४८९२५**

# धीर मिळाला

मराठवाड्यातील ५ जिल्ह्यांची टंचाई पाहणी करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ४ सप्टेंबर रोजी अहमदनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील टंचाई परिस्थितीची पाहणी तर केलीच पण शेतकरी-शेतमजूर, महिला यांच्याशी संवादही साधला. त्यांच्या भावना जाणून घेतल्या. एकूणच त्यांचा पाहणी दौरा जिल्हावासीयांना आश्वासक



दिलासा देणारा ठरला.

मराठवाड्याला लागून असलेल्या अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यातील परिस्थिती मराठवाड्यासारखीच आहे. त्याचमुळे मराठवाड्यातील उस्मानाबाद, बीड, लातूर, नांदेड आणि परभणी या पाच जिल्ह्यांचा दौरा झाल्यावर त्यांनी ४ सप्टेंबर रोजी अहमदनगर जिल्ह्यात दौरा केला. पारनेर तालुक्यातील पिंपरी पठार, पाथर्डी तालुक्यातील ढवळेवाडी आणि सातवड आणि जामखेड तालुक्यातील काटेवाडी व राजुरी या गावांची त्यांनी प्रातिनिधिक पाहणी केली. त्यानंतर जामखेड येथे जिल्हास्तरीय टंचाई आढावा बैठकही घेतली. मराठवाड्यातील टंचाईग्रस्तांना मदत देताना जे निकष लावण्यात येतील तेच निकष अहमदनगर जिल्ह्यालाही लागू होतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांचे ४ सप्टेंबरला सकाळी साडेनऊच्या सुमारास पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार येथे हेलिकॉप्टरने आगमन झाले. टंचाईची पाहणी करण्यासाठी आलेलो असल्याचे सांगत त्यांनी पुष्पगुच्छ स्वीकारण्यास विनम्रपणे नकार दिला. यावेळी सरपंच संगीता सोनावळे आणि इतर भगिनींनी त्यांचे औक्षण केले. त्यानंतर पालकमंत्री प्रा. राम शिंदे, आमदार विजयराव औटी, माजी मंत्री बबनराव पाचपुते, जिल्हा परिषद सदस्य आझाद ठुबे, जिल्हाधिकारी अनिल कवडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश नवाल यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्री पिंपरी पठारकडे रवाना झाले. तेथे त्यांनी गावाला वर्षानुवर्षे पिण्याचे पाणी पुरविणारी मात्र कोरडी पडलेली बारव पाहिली. एकेकाळी गावाला पाणीपुरवठा करणारा पण सध्या कोरडा पडलेला तलाव पाहिला. पावसाअभावी पिकांची झालेली दुरवस्था त्यांनी अनुभवली. गावात जमलेल्या महिला, शेतकरी, शेतमजूरांशी संवाद साधण्यापूर्वी त्यांच्या मनातील तगमग त्यांनी जाणून घेतली. हरुबाई शिंदे या वयोवृद्ध महिलेने मुख्यमंत्र्यांना, 'तुम्ही माझ्या लेकाप्रमाणे असल्याची' साद देऊन पाणीप्रश्न सोडवण्याचे साकडे घातले. या संवाद कार्यक्रमाला जनता दरबाराचेच स्वरूप आले होते. ग्रामस्थांच्या विविध प्रकारच्या मागण्यांना मुख्यमंत्र्यांनी तत्काळ प्रतिसाद देऊन प्रश्न मार्गी लावले. कुकडी धरणातून एक टीएमसी पाणी देण्याच्या प्रश्नाबाबत मात्र संपूर्ण माहिती घेऊन योग्य तो निर्णय घेण्याचे त्यांनी जाहीर केले. लोकप्रिय अथवा तात्पुरता दिलासा देणाऱ्या घोषणा न करता अभ्यासपूर्ण आणि योग्य निर्णय घेण्यासाठी या प्रश्नी बैठक घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. पिण्याचे पाणी, हाताला काम, जनावरांना चारा या गोष्टींना सरकारचे प्राधान्य असून त्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, असा दिलासा त्यांनी दिला.

मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक ठिकाणी शेतकरी, शेतमजूर, महिला यांच्या व्यथा जाणून घेतल्या. टंचाईमुळे मेटाकुटीला आलेल्यांना धीर दिला. टंचाईच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी शासन सज्ज असून सर्वांच्या सहकार्याने त्यावर मात करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. टंचाईग्रस्तांना धीर देतानाच जलयुक्त शिवार अभियानाचे, पाणी बचतीचे महत्त्व सांगून त्यांनी उपस्थितांचे प्रबोधन केले. जलयुक्तशिवार योजनेखाली गेल्या सहा महिन्यात राज्यात १ लाख कामे पूर्ण झाली असून हा एक जागतिक विक्रम असल्याचे गौरवोद्गार जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह यांनी काढले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले. टंचाईचे इष्टापत्तीत रूपांतर करण्यासाठी शेतकऱ्यांनी नरेगांतर्गत स्वत:च्या शेतात शेततळे घेण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. जामखेड येथील जिल्हास्तरीय टंचाई आढावा बैठकीस पालकमंत्री प्रा.राम शिंदे यांच्यासह, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा मंजुशा गुंड, आ. शिवाजीराव कर्डिले, आ. बाळासाहेब मुरकुटे, आ. मोनिका राजळे, ॲड. अभय आगरकर आदी उपस्थित होते. संपूर्ण दिवसभर अहमदनगर जिल्ह्यातील टंचाई परिस्थितीची पाहणी करून त्यावर मात करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्याचे आदेश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. जिल्ह्यातील पारनेर, पाथर्डी, जामखेड तालुक्यातील जनतेला मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यामुळे निश्चितच धीर मिळाला.

**राजेंद्र सरग**

**(लेखक हे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०८२७५४२५९६६**

# दिलासा आणि आधार

गेल्या तीन वर्षांपासून राज्यातील काही जिल्ह्यांत नैसर्गिक आपत्तीमुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. त्यात या वर्षी काही जिल्ह्यांत सरासरीपेक्षा ५० टक्क्यांहूनही कमी पाऊस पडल्याने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्याची अवर्षणाची परिस्थिती आणि पिके, गुरे-ढोरे, माणसे यांची स्थिती प्रत्यक्ष जाणून त्यावर उपाययोजना करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक जिल्ह्यांचा दौरा करून अलीकडेच त्यांनी सोलापूरचा दौरा केला. जिल्ह्याची नेमकी परिस्थिती जाणून घेतली.

मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, अहमदनगर, सातारा जिल्ह्यातील काही भागात पिण्याच्या पाण्याची समस्या, चारा टंचाई आणि शेतकऱ्यांच्या हाताला काम देण्याची मागणी वाढताना दिसताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्ष संबंधित जिल्ह्यात जाऊन शेतकऱ्यांशी, शेतमजुरांशी संवाद साधून आणि अधिकारी, लोकप्रतिनिधींच्या बैठका घेऊन; शासन टंचाईग्रस्त जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास निर्माण केला.

### व्यापक आढावा

मुख्यमंत्र्यांनी गेल्या ६ सप्टेंबर २०१५ रोजी सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना भेटी देऊन परिस्थितीची पाहणी केली. या दौऱ्यात त्यांनी प्रथम अक्कलकोट शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या कुरनूर येथील धरणाची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी अक्कलकोट शहराच्या पाणी टंचाईच्या उपाययोजनाबाबत पालकमंत्री विजय देशमुख, जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे, नगरपालिकेचे पदाधिकारी, मुख्याधिकारी यांच्याशी चर्चा केली. अक्कलकोट शहराचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या प्रश्नात जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

मुख्यमंत्र्यांनी या दौऱ्यात दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळ्ळी येथील पाणी पुरवठा, विहिरी, रामपूर तलावातील गाळ काढण्याच्या कामाच्या पाहणीसह महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामास भेट देऊन तेथे मजुरांशी संवाद साधला.

### जनतेशी सुसंवाद

कर्देहळ्ळी येथे झालेल्या शेतकरी संवाद कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या. पाण्याच्या स्रोतांची व चाऱ्यांची पाहणी केली.

तीन वर्षांपासून राज्यातील शेतकऱ्यांवर गारपीट, अवर्षण तर कधी अवकाळी पावसाचे संकट येत आहे. या वर्षी पाऊस नसल्याने पाणी आणि चारा टंचाई निर्माण झाली आहे; परंतु शेतकऱ्यांनी घाबरू नये, राज्य शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे ठाकले आहे. टंचाई निवारणासाठी सूक्ष्म नियोजन केले आहे. टंचाईच्या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला आहे. आणखी पैसा लागला तर राज्य शासन राज्याची तिजोरी रिकामी करेल, प्रसंगी कर्ज काढेल पण राज्यातील टंचाईग्रस्त जनतेला मदत करेल, असा विश्वासही या वेळी मुख्यमंत्र्यांनी दिला.

मराठवाड्यातील तीन जिल्ह्यात अपवाद म्हणून चारा छावण्या सुरू करण्यास परवानगी दिली आहे. सोलापूर जिल्ह्यातही चारा छावण्या सुरू करण्याची परवानगी देण्यात येईल. राज्यातील चारा संपल्यास सोलापूर जिल्ह्यात प्रसंगी शेजारच्या राज्यातून चारा उपलब्ध करून दिला जाईल. चारा लागवडीसाठी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. वैरण विकासासाठी बियाणे आणि पैसा दिला जाईल. 'हाजोला' पद्धतीने कमी पाण्यात शेवाळ निर्माण करण्याच्या पद्धतीचा वापर करण्यात येत आहे. हे पोषक वैरण म्हणून वापरता येते. त्याचबरोबर हायड्रोफोनिक पद्धतीने एक किलो मक्क्यात दहा किलो हिरवा चारा निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



याशिवाय दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मुलांचे शुल्क माफ करण्यात येईल, व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांच्या शुल्काची सोय करण्यात येईल, शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे देण्याबरोबरच थेट मदतीचाही विचार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी या दौऱ्यात मोहोळ तालुक्यातील मलिकपेठ येथे भेट देऊन पीक परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. मुख्यमंत्र्यांच्या या सोलापूर दौऱ्यामुळे शेतकरी, नागरिकांबरोबरच लोकप्रतिनिधींनाही टंचाई निवारण्यास गती मिळाल्याचा विश्वास लाभला आहे.

यशवंत भंडारे

(लेखक हे पुणे विभागीय उपसंचालक (माहिती) आहेत.)
संपर्क : ०९८६०६१२३२८

# जलक्रांतीच्या दिशेने

**पाणी आणि चारा टंचाईच्या परिस्थितीला नेहमी तोंड देणाऱ्या बीड जिल्ह्याला या वर्षीही पावसाने फारशी साथ दिली नाही, मात्र आतापर्यंत झालेल्या पावसामुळे आणि जलयुक्त शिवार अभियानाच्या कामातून निर्माण झालेल्या जलसंचयामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. नजीकच्या काळात हे अभियान बीड जिल्ह्यात जलसमृद्धी आणण्यासाठी यशस्वी ठरणार आहे.**

सप्टेंबर महिन्यात जिल्ह्यात ४२६ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात होता. त्यानंतर झालेल्या समाधानकारक पावसामुळे त्यामध्ये घट होऊन आता फक्त २८५ टँकर सुरू आहेत. म्हणजे १४१ टँकर बंद करावे लागले. ह्या सकारात्मक बदलामागील श्रेय उशिराने बरसलेल्या पावसाबरोबरच राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून झालेल्या उल्लेखनीय कामांनादेखील द्यावे लागेल.

नेहमीच्या दुष्काळसदृश्य परिस्थितीशी सामना करणाऱ्या बीड जिल्ह्यातील जनतेला जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने दिलासा मिळत आहे.





**अनिल आलुरकर**

पावसाच्या लहरीपणामुळे नेहमी टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतीसाठी व पिण्यासाठी पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते. पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याने व शेतीसाठी पुरेसे पाणी न मिळाल्याने पिकांच्या उत्पादकतेत घट होऊन शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती खालावली जात आहे. या सर्व विपरीत परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने सुरू केलेले जलयुक्त शिवार अभियान उपयुक्त आणि दिलासादायक ठरत आहे. या अभियानाची फलश्रुती सामान्य माणसाला कमालीची आशादायी ठरत आहे.

या वर्षी जिल्ह्यातील २७१ गावात जलयुक्त शिवार अभियान राबवण्यात येत असून ४३९६ कामे पूर्ण करण्यात आली तर २३७ कामे प्रगतिपथावर आहेत. या अभियानामुळे व अलीकडे झालेल्या पावसामुळे जिल्ह्यात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या अभियानामुळे आत्तापर्यंत जिल्ह्यात जवळपास २८ हजार ९४४ टीसीएम पाणीसाठा निर्माण होऊन जलक्रांतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. सुमारे १० हजार विहिरी व विंधन विहिरींच्या पाणी पातळीत दोन ते तीन मीटरने वाढ अनुभवायला मिळाली आहे. सुमारे १०० कोटी रुपये किमतीच्या उपलब्ध झालेल्या विकेंद्रित पाणीसाठ्यामुळे येत्या रब्बी हंगामात ५० हजार हेक्टर क्षेत्र वाढण्याचे आशादायक चित्र निर्माण झाले आहे. यंदाच्या अपुऱ्या पावसामुळे वाया गेलेल्या खरीप हंगामानंतर, शेतकऱ्यांना जलयुक्त शिवार अभियानामुळे रब्बीसाठी मिळालेली ही सुवर्णसंधी म्हणजे; एक प्रकारे संकटमोचक वरदानच म्हणावे लागेल.

पाण्याचे महत्त्व सर्वांनीच ओळखले असून अभियानामध्ये लोकसहभागही मोठ्या प्रमाणात मिळत आहे. सुमारे १३ कोटी रुपयांची जलसंधारणाची कामे जिल्ह्यात लोकसहभागातून करण्यात आली आहेत. नदी-नाले व तलावामधून सुमारे २२ लाख घनमीटर गाळ लोकसहभागातून काढण्यात आला. याशिवाय २८ बंधाऱ्यांच्या खोलीकरणाची कामेसुद्धा लोकसहभागातून करण्यात आली. लोकसहभागातून केलेल्या कामांची फलश्रुती लोकांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देत आहे. अशा लोकसहभागाची दखल इतर गावकरी घेत असून हे अभियान आता लोकचळवळीचे रूप घेत आहे. अनेक ग्रामस्थ आता संघटितपणे जलयुक्त शिवार अभियानासाठी पुढे सरसावत आहेत. सामूहिक प्रयत्न वाढत असल्याने दुष्काळमुक्तीच्या प्रयत्नांना आता अधिक बळ मिळताना दिसत आहे.

पावसाच्या आगमनामुळे जलसंधारणाच्या बदललेल्या परिस्थितीचा, राज्याच्या ग्रामविकास, जलसंधारण व रोजगार हमी योजना मंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी; प्रत्यक्ष भेटी देऊन आढावा घेऊन शेतकऱ्यांशी मुक्त संवाद साधला. जिल्ह्यातील ठिकठिकाणच्या बंधाऱ्यांमध्ये व शेततळ्यांमध्ये साठलेल्या पावसाच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद श्रीमती मुंडे यांनी टिपला. या पाहणी दौऱ्यात गावोगावी मंत्रिमहोदयांच्या वाहनाला थांबवून ग्रामस्थ जलयुक्त शिवारच्या कामांची स्तुती करीत होते. सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करीत होते. या अभियानामुळे आपल्या शिवारात हिरवी क्रांती होत असल्याचा अनुभव शेतकरी बोलून दाखवत होते. उजणी ता. अंबाजोगाई या गावचे शेतकरी अनिल गायकवाड यांनी तर बंधाऱ्यामधील पाणीसाठ्यामुळे परिसरातील सर्व बंद पडलेल्या विंधन विहिरींना पाणी आल्याचा जादूई वाटावा असा अनुभव मंत्रिमहोदयांना प्रत्यक्ष भेटीत बोलताना सांगितला. शेजारच्या विहिरींच्या पाणी पातळीत झालेली वाढ आणि शेतातल्या उभ्या पिकांना मिळालेले जीवदान अशा नानाविध अनुभवांची शिदोरी ग्रामस्थ मंत्रिमहोदयांपुढे व्यक्त करीत होते. पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे, जिल्हाधिकारी नवल किशोर राम आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नामदेव नन्नावरे यांच्या कार्यकुशलतेमुळे हे अभियान जिल्ह्यात यशस्वी होत असल्याने; उजणी गावच्या ग्रामस्थांनी मंत्रिमहोदयांसमवेत संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांचा, उत्स्फूर्तपणे सत्कार केला व जाहीर आभारही मानले. पंचक्रोशीतील १५ गावांच्या जागरूक ग्रामस्थांची या समारंभातील उपस्थिती म्हणजे त्यांची पाण्याबद्दलची आपुलकी, जागरूकता आणि प्रशासकीय यंत्रणेवरील विश्वास दृढ करणारी होती. नजीकच्या काळात पावसाचे प्रमाण अजून चांगले राहिल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याचे विकेंद्रित साठे निर्माण होऊन राज्याला दुष्काळमुक्त करण्याच्या शासनाच्या संकल्पाला अधिक बळ मिळेल अशी आशा मंत्रिमहोदयांनी व्यक्त केली.

**(लेखक हे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४२३०७३४३०**

# अन्नदात्याची अन्नसुरक्षा

राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत धान्यवाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. औरंगाबाद विभागातील सर्व आठ, अमरावती विभागातील सर्व पाच आणि नागपूर विभागातील वर्धा अशा एकूण १४ जिल्ह्यात, स्वातंत्र्यदिनापासून ही महत्त्वाकांक्षी योजना राबवण्यास सुरुवात झाली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी तसेच दुष्काळग्रस्त आर्थिक अडचणीतील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात याबाबत घोषणा केली होती. त्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या दारिद्र्यरेषेवरील एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर तीन रुपये प्रतिकिलो दराने तांदूळ, तर दोन रुपये प्रतिकिलो दराने गहू वाटप करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला.

मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर स्वातंत्र्यदिनी या सर्व १४ जिल्ह्यांच्या मुख्यालयात संबंधित पालकमंत्र्यांच्या हस्ते या योजनेंतर्गत अन्नधान्य वाटपाच्या योजनेला सुरुवात करण्यात आली. तर तालुकास्तरावर संबंधित आमदारांच्या हस्ते अन्नधान्य वाटपास प्रारंभ करण्यात आला. शेतकरी लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा योजनेतील प्राधान्य कुटुंबांतील लाभार्थ्याप्रमाणे प्रतिमाह, प्रतिव्यक्ती पाच किलो याप्रमाणे धान्य वाटप करण्यात येत आहे. यामुळे औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या १४ जिल्ह्यातील १४० तालुक्यांमधील ६८ लाख शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा मिळाली आहे. एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी मंत्रिमंडळाची परवानगी घेण्यात आली. प्राथमिक आकडेवारीनुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या या १४ जिल्ह्यातील एपीएलमधील शेतकऱ्यांची संख्या सुमारे २२ लाख असल्याचे निदर्शनास आले होते. या लाभार्थ्यांसाठी आवश्यक असलेले ११,००० मे. टन अन्नधान्य (६६०० मे. टन गहू व ४४०० मे. टन तांदूळ) रास्त भावाने केंद्रशासनाने उपलब्ध करून दिले.

**सर्व शेतीची मशागत करून, पेरणी झाल्यावर पावसाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना निसर्गाने साथ न दिल्याने शेत पीक घेता आले नाही. जगाला अन्नधान्य पुरवणारा अन्नदाताच उपाशी राहण्याची वेळ येऊ नये म्हणून राज्यातील १४ जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिका धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना; अन्नसुरक्षेचा लाभ मिळवून देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे.**

**अर्चना शंभरकर**

योजना कार्यान्वित होण्याअगोदर प्रत्येक शिधावाटप दुकानाचे सर्वेक्षण करताना असे निदर्शनास आले की, लाभार्थी शेतकऱ्याची संख्या २२ लाख ऐवजी ६८ लाख आहे. कारण २०११ नंतर बरेच शेतकरी लाभार्थी एपीएल यादीमध्ये आले आहेत. ही बाब मंत्रिमंडळाच्या निदर्शनास आणून देऊन त्याआधारे उर्वरित ४६ लाख लाभार्थ्यांकरिता अतिरिक्त २३००० मे. टन

## बोगस शिधापत्रिकांना आळा

**राज्यात आधारकार्ड नोंदणीचे काम मोठ्या प्रमाणात झाले आहे. जवळपास ८७% आधारकार्ड नोंदणी झाली आहे. या आधार कार्डांची सांगड शिधापत्रिकेबरोबर घातल्यास बोगस शिधापत्रिकेला आळा बसू शकेल. शिधापत्रिकेतील प्रत्येक व्यक्तीच्या नावासमोर आधारकार्ड नंबर, बँक अकाऊंट नंबर आणि शिधापत्रिकाधारकांपैकी एकाचा मोबाइल नंबर याची नोंद करण्यात येत आहे. राज्यातील बोगस शिधापत्रिकाधारकांची संख्या कमी होईल आणि पर्यायाने लाखो किलो अन्नधान्य जे चुकीच्या मार्गाने वाया जात होते ते योग्य व्यक्तीला मिळण्यास मदत होईल.**



**-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



अन्नधान्य (१३८०० मे.टन गहू व ९२०० मे. टन तांदूळ) रास्त भावाने उपलब्ध करून देण्यात आले. नियमित या १४ जिल्ह्यांच्या ६८ लाख एपीएल शेतकऱ्यांना ३४००० मे.टन धान्याचे वाटप सुरुळीत सुरू आहे.

या अभियानाच्या यशस्वितेसाठी स्वत: मुख्यमंत्र्यांनी जातीने लक्ष घातले. परभणी, लातूर, बीड येथे काही अधिकृत शिधावाटप दुकानांना प्रत्यक्ष भेट दिली. शिधावाटप दुकानदारांकडे असलेली यादी बघितली. शेतकऱ्यांशी संवाद साधला, अन्नधान्याची गुणवत्ता पडताळून पाहिली. अधिकृत शिधावाटप दुकानात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणारे ते राज्याचे पहिलेच मुख्यमंत्री आहेत.

### बायोमेट्रिक ओळख आणि आधार सिडींग

केंद्र शासनातर्फे राज्यात दरवर्षी सुमारे १३ ते १४ हजार कोटी रुपयाचे धान्य पुरवले जाते. राज्यात साधारणपणे २.३४ कोटी शिधापत्रिका आहेत. एका कार्डवर सरासरी ४:५ इतक्या लोकाची नोंदणी आहे म्हणजे जवळपास नऊ कोटी लाभधारक हे या योजनेचा लाभ घेतात. यातील काही शिधापत्रिका या बोगस असतात. काही तालुक्यात रास्तभाव दुकानात प्रायोगिक तत्त्वावर बायोमेट्रिक प्रणाली लावून अन्नधान्य वितरण केले असता १५ ते २२ टक्के शिधापत्रिका बोगस असल्याचे आढळून आले. संपूर्ण राज्यात सुमारे १० ते १२ टक्के शिधापत्रिका बोगस असण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचे नियंत्रण करणे ही बाब कायम अडचणीची ठरत आली आहे. कारण यासाठीची कोणतीही संगणकीय प्रणाली आतापर्यंत कार्यान्वित नव्हती. म्हणूनच सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण करून, राज्यातील रास्तभाव दुकानस्तरावर लाभार्थींची बायोमेट्रिक ओळख पटवून; शिधावस्तूंचे वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय ११ मार्च २०१५ रोजी शासनाने घेतला.




**योग्य व्यक्तींला लाभ मिळावा यासाठी :-**

**योजनेचा लाभ १४ दुष्काळग्रस्त जिल्ह्यांच्या सर्व शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी विशेष काळजी घेण्यात आली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शिधापत्रिकाधारकांच्या शेताचा सातबारा असणे अनिवार्य करण्यात आले. या ६८ लाख शेतकऱ्यांच्या शिधापत्रिकांवर शेतकरी असा ठप्पा मारण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शिधापत्रिका लगेच ओळखता येऊ लागल्या. प्रत्येक तहसील आणि तलाठी कार्यालयात ही यादी दर्शनी भागावर लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या योजनेचा लाभ योग्य व्यक्तींलाच मिळावा, याची पुरेपूर काळजी घेण्यात येत असून ६८ लाख शेतकऱ्यांना सप्टेंबरपासून ३४००० मे. टन एवढे धान्याचे वाटप सुरू आहे.**

**- दीपक कपूर, सचिव अन्न व नागरी पुरवठा**


या निर्णयानुसार रास्तभाव दुकानातून शिधाजिन्नसांचे वितरण आधार क्रमांकाद्वारे बायोमेट्रिक ओळख पटवून करण्यात येणार आहे. संगणकीकृत शिधापत्रिका कुटुंबातील वरिष्ठ महिला सदस्याच्या नावे देण्यात येईल. बायोमेट्रिक ओळख पटविण्यासाठी मोबाइल टर्मिनल टेक्नॉलॉजीचा वापर करण्यात येणार आहे.

### आधार कार्ड सिडींग

महाराष्ट्रात रास्तभाव दुकानांची संख्या खूप मोठी आहे. महाराष्ट्रात ५६२३५ एवढी दुकाने आहेत. या सगळ्यांसाठी संगणकीकृत शिधापत्रिका आधार क्रमांकासह देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने आधार क्रमांक संकलित करणे, त्याचे सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या डाटाबेसमध्ये सिडींग करणे यासाठी आवश्यक तो निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आधार कार्डाचे सिडींग शिधापत्रिकेमध्ये करण्याची कार्यवाही सुरू असून आतापर्यंत २.७२ कोटी आधार क्रमाकांची सिडींग पूर्ण करण्यात आली आहे. ही कार्यवाही लवकरच पूर्ण होणार आहे.

१६ जून २०१५ पासून सुरू झालेल्या या योजनेसाठी तलाठी आणि आशा वर्कर्स यांची मदत घेण्यात आली. प्रत्येक शिधापत्रिकाधारकाकडून माहिती भरून घेऊन तहसील कार्यालयात जमा करण्यात आली. प्रत्येक जिल्हाधिकारी त्यांच्या जिल्ह्यासाठी निविदा मागवून ऑनलाइन डाटा एन्ट्रीसाठी एजन्सी नियुक्त करून हे डाटा भरण्याचे काम पूर्ण करीत आहेत. रोज साधारणपणे साडेचार लाख सिडींग नोंदणी होते आहे. नोव्हेंबर – डिसेंबर २०१५ पर्यंत शंभर टक्के आधार सिडींग पूर्ण होणार आहे. त्यामुळे बोगस शिधापत्रिका धारकांना आळा बसून खऱ्या लाभार्थ्यांना फायदा होणार आहे. काळाबाजार बंद होऊन पर्यायाने शासनाचे हजारो कोटी रुपये वाचणार आहेत.

**(लेखिका या मुख्यमंत्र्यांच्या जनसंपर्क अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९९८७०३७१०३**



# अभिनव संकल्पना, अभिनव पुस्तिका

वनमंत्री सुधीर मुंनगंटीवार यांच्या कल्पनेतून तयार झालेली 'पर्यावरण दिनविशेष' ही पुस्तिका वैशिष्ट्यपूर्ण आणि आगळीवेगळी झाली आहे. संपूर्ण वर्षभर पर्यावरणाशी निगडित जे दिवस संपूर्ण जगात साजरे केले जातात त्याची माहिती या पुस्तिकेत समाविष्ट करण्यात आली आहे.हे दिनविशेष महिनानिहाय देण्यात आले आहेत. उदा. २ फेब्रुवारी रोजी जागतिक पाणथळ प्रदेश दिवस, ३ मार्च रोजी जागतिक वन्यजीव दिवस, २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिवस, २१ मार्च रोजी जागतिक वन दिवस, २२ एप्रिल रोजी जागतिक वसुंधरा दिवस, ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिवस, २ डिसेंबर रोजी राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन इत्यादी. यापैकी काही दिनविशेष आपल्याला ठाऊक असतात. पण बहुतेकांना या दिनविशेषांची पार्श्वभूमी ठाऊक नसते. मात्र या पुस्तिकेत प्रत्येक दिनविशेषाची मूळ संकल्पना व सुरुवात आणि पार्श्वभूमी देण्यात आली आहे. त्यामुळे हे दिनविशेष नेमके कशासाठी साजरे केले जातात, त्याचे मुख्य उद्दिष्ट काय याचे आकलन होते. सर्वांनाच आणि विशेषत: विद्यार्थ्यांना पर्यावरणाशी संबंधित बाबींचे ज्ञान मिळावे व त्यांच्या मनात पर्यावरण संरक्षणाविषयी ममत्व निर्माण व्हावे, हा या पुस्तिकेचा मुख्य हेतू आहे. उदा.सातत्याने चिमणी नष्ट होत असल्याने तिचे अस्तित्व टिकवणे कसे गरजेचे आहे व त्यासाठी नेमके काय करायला हवे याचा धडा जागतिक चिमणी दिवसाच्या निमित्ते विद्यार्थ्यांना मिळावा,यासाठी या पुस्तिकेतील संबंधित माहिती उपयुक्त ठरणारी आहे. प्रत्येक दिनविशेष वाचल्यानंतर पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रेरणा मिळते. प्रत्येक दिनविशेषाला अतिशय समर्पक आणि काव्यात्मक अशी शीर्षके देण्यात आली आहेत. त्यामुळे पुस्तकाची रंजकता वाढली आहे. उदा–जागतिक वन दिवसासाठीचे शीर्षक आहे– 'तुटता एक झाड–आपलेच आयुष्य उजाड,' जागतिक वसुंधरा दिवसाचे शीर्षक आहे, 'अविचारी विकास करतोय पृथ्वी भकास,' आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिवसाचे शीर्षक–'जगी या सर्व जिवांचा मेळा,' वाळंवटीकरण आणि दुष्काळविरोधी दिवसाचे शीर्षक 'जागे व्हा, कामेजते आहे धरणी माय, दुष्काळी क्षेत्र पसरवत आहे आपले पाय,' जागतिक प्राणी दिवस– 'नका मारू त्यांना, सारे मुके प्राणी, त्यांची गोड गाणी समजू या,' जागतिक अधिवास दिवसाचे शीर्षक–'लोकसंख्या गेली उजाडत बागा, विश्रांतीला जागा नाही येथे.' इत्यादी.




या काव्यमय आणि रंजक शीर्षकांमुळे वाचक प्रभावित होऊन त्याची उत्सुकता वाढते. विद्यार्थ्यांना वनसंवर्धन आणि पर्यावरण सवंर्धनाची महती कळावी यासाठी या पुस्तकाचे मोफत वितरण करण्याचा संकल्प वनमंत्र्यांनी केला आहे. या पुस्तिकेच्या दोन लाखाहून प्रती गावोगावच्या शाळांमध्ये वाटल्या जाणार आहेत. अतिशय सुंदर, सुबक रंगीत मांडणी, उत्कृष्ट कागद आणि उपयुक्त माहिती यामुळे या पुस्तिकेचे संदर्भमूल्य खूप वाढले आहे. अनेक प्रकारचे दिनविशेष मुलांना सांगितले जातात. वृत्तपत्रांमधून या दिनविशेषांची माहिती प्रसंगपरत्वे दिली जाते. मात्र पर्यावरणाशी संबंधित सर्व दिनविशेषांना असे बहुधा पहिल्यांदाच एकत्रित आणण्यात आले असावे. या कल्पकतेस आणि उपक्रमशीलतेसाठी वनमंत्र्यांना दाद द्यावी तेव्हढी थोडीच आहे. वनमंत्र्यांसोबत कार्यरत असणारे श्री. अजय धवने यांनी श्री. मुनगंटीवार यांच्या कल्पनेतील या पुस्तकास मूर्त रूप दिले. त्यांना पुणेस्थित अमेय इन्सायपरिंग बुक्सने सहकार्य केले.अभिनव अशा या पुस्तिकेचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये जाणीवजागृती व्हावी असा असला तरी मोठ्यांना पर्यावरण रक्षणाची दिशा आणि मार्ग दाखविण्यासाठी ही पुस्तिका महत्त्वाची दस्तऐवज ठरू शकते.

**– सुरेश वांदिले**

# परिवर्तनाची नांदी

**१२ ऑक्टोबर २०१५ रोजी आपल्या देशात केंद्र शासनाने 'माहितीचा अधिकार अधिनियम' लागू केला, यंदा त्याची दशकपूर्ती आहे.**

१२ ऑक्टोबर – २००५ रोजी त्या दिवशी विजयादशमी अर्थात दसरा सण होता. माहिती अधिकार कायदा आपल्या देशात त्या दिवसापासून लागू झाला. शासकीय कामकाजात पारदर्शकतेचे आणि नागरिकांप्रती उत्तरदायित्वाचे नवे युग सुरू करणारा हा माहिती अधिकाराचा कायदा म्हणजे सर्वसामान्य नागरिकांनी केलेले सीमोल्लंघनच असल्याचे वर्णन तेव्हा करण्यात आले. हा संदर्भ तत्कालीन विजयादशमी अर्थात दसरा सणाला अनुलक्षून होता.

### नांदी परिवर्तनाची

हा विश्वास राज्यातील जनतेने आजही जपला आहे. अपवादात्मक उदाहरणे वगळली तर माहितीच्या अधिकारांतर्गत माहिती जाणून घेण्याची एक मोठी परिवर्तनाची नांदी सुरू झाली आहे. सध्या सगळीकडे 'आर.टी.आय.' या लघु इंग्रजी शब्दसमूहाने माहितीचा अधिकार कायदा ओळखला जातो. Right to information हे या कायद्याचे पूर्ण इंग्रजी रूप. या कायद्यामुळे जनतेला, राज्यकारभार करताना जनतेने करांच्या रूपाने दिलेल्या निधीचा जनतेसाठी कसा विनियोग होत आहे, याची माहिती मिळवण्याचे मार्ग सहजसाध्य झाले आहेत. गोपनीयता कायद्यांतर्गत माहिती लपवण्याचे, न देण्याचे किंवा दडवण्याचे कारण किंवा प्रयोजनच उरले नाही. ह्यामुळे अंमलबजावणी करणाऱ्या लोकप्रतिनिधींकडून तसेच शासकीय अधिकारी–कर्मचारी यांच्याकडून गैरव्यवहाराला, भ्रष्टाचाराला आपोआप आळा बसू लागला. माहितीच्या अधिकारात कुणीही प्रश्न विचारेल? कुणीही माहितीच्या अधिकारात रेकॉर्ड मागेल? ही धास्ती वाटू लागली. त्यामुळे देखील शासकीय कार्ययंत्रणा पारदर्शक झाली.

माहितीच्या अधिकाराचा कायदा हा जनतेच्या फायद्याचा कायदा ठरू लागला. या माहिती अधिकार अधिनियमामुळे सामान्य जनतेला पारदर्शकतेचा नवा आयाम कळू लागला.




**चंद्रकांत क्षीरसागर**

### प्रभावी साधन

माहितीचा अधिकार, हे जनतेच्या मूलभूत अधिकारांच्या तसेच हक्कांच्या पूर्ततेसाठी, अंमलबजावणी यंत्रणेकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध दाद मागून, न्यायाच्या परिपूर्तीसाठी, लोकशाही शासन प्रणालीसाठी उपयुक्त असे प्रभावी साधन ठरू लागले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध बाबींची तसेच विविध विकास कार्यांची अंमलबजावणी करणारे यंत्रणेचे अधिकारी व कर्मचारी, हे माहितीच्या अधिकाराला आता आपल्या मार्गातील धोंड किंवा अडचण मानीत नाहीत. हा सकारात्मक बदल गेल्या दहा वर्षांच्या वाटचालीत मोठ्या प्रमाणात आढळून येऊ लागला आहे.

### गैरप्रकार–व्यवहारांना आळा

शासकीय अनुदानावर चालणाऱ्या कुठल्याही संस्थेतील गैरप्रकार–व्यवहार यांना या कायद्यामुळे आपोआप आळा बसला आहे. यामुळे सगळ्या बाबतीत, मग ती नोकर–भरती असो, वा अन्नधान्य पुरवठा असो, किंवा त्यांचे वितरण असो, यासारख्या अनेक क्षेत्रात सगळीकडे योग्य त्या सजगतेने आणि नियमाधीन राहून कामे पार पाडली जाऊ लागली आहेत.

गेल्या दशकभराच्या कालावधीत माहिती अधिकार अधिनियमामुळे शासकीय स्तरापासून ते निमशासकीय स्तरापर्यंतच्या सर्व संबंधित कार्यालयाच्या कामकाजात कमालीची पारदर्शकता आणि जागरूकता आली आहे. राजपत्रित अधिकारी महासंघानेही त्यावेळेस या कायद्याचे स्वागत करून हा कायदा 'जनताभिमुख' असल्याचे प्रतिपादन केले होते. त्या वेळी राजपत्रित अधिकारी–कर्मचारी महासंघाचे तत्कालीन सरचिटणीस ग. दि. कुलथे यांनी राज्यातील जवळपास लाख–सव्वा लाखापर्यंत असलेल्या आपल्या महासंघाच्या अधिकारी सदस्यांना उद्देशून म्हटले होते की, 'या कायद्यामुळे अधिकारी व कर्मचारी हे जनतेचे सेवक असून मालक नाहीत हे समजून घेण्याची संधी मिळत आहे. उत्तम लोकसेवक म्हणून प्रतिमा उभी करण्याची नवीन संधी म्हणून या कायद्याकडे पाहावे. तरच हा कायदा यशस्वी होऊ शकेल.' सध्या माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत केवळ राष्ट्रीय सुरक्षा, व्यक्तीचे खाजगी आयुष्य आणि त्याच्या व्यावसायिक हिताचे रक्षण हे ३ मुद्दे वगळण्यात आले आहे. तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने माहिती अधिकारांतर्गतच्या एका खटल्यात महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे, त्यानुसार माहितीच्या अधिकारांतर्गत अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल किंवा व्यक्तिगत माहिती मागता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. याचीही माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी नोंद घ्यावी असे सुचवावेसे वाटते.

**(लेखक हे माहिती अधिकार क्षेत्रातील कार्यकर्ते आहेत.)**
**संपर्क : ०९४२२१२९८३९**

### माहिती अधिकाराचा फायदा

- **या कायद्यामुळे राज्यकारभार करताना जनतेने करांच्या रूपाने दिलेल्या निधीचा जनतेसाठी कसा विनियोग होत आहे, याची माहिती मिळवण्याचे मार्ग सहजसाध्य**
- **गोपनीयता कायद्यांतर्गत माहिती लपवण्याचे, न देण्याचे किंवा दडवण्याचे कारण किंवा प्रयोजन संपुष्टात**
- **अंमलबजावणी करणाऱ्या लोकप्रतिनिधींकडून तसेच शासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून गैरव्यवहाराला, भ्रष्टाचाराला आपोआप आळा**



**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेत विशेष स्थान आहे. मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग असेल, मुंबईतील ५५ उड्डाणपुल असतील किंवा वांद्रे-वरळी सी लिंक. ‘एमएसआरडीसी’ने राज्याच्या विकासाला चालना देणारे अनेक मैलाचे दगड स्थापित केले आहेत. आता सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महामंडळाने पुन्हा राज्यात दर्जेदार रस्त्यांचे जाळे उभारण्याची महत्त्वाकांक्षी योजना आखली आहे. त्यासंदर्भात श्री. एकनाथ शिंदे यांच्याशी केलेली ही बातचीत**

# स्मार्ट रस्ते, गतिमान वाहतूक

पद्मभूषण देशपांडे

**मधल्या काही काळात थंडावलेल्या महामंडळाच्या कारभाराला पुन्हा गती आल्याचे चित्र आहे. त्याविषयी काय सांगाल?**

‘एमएसआरडीसी’ हे राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे महामंडळ आहे. राज्यातील शेतीचा विकास असेल किंवा उद्योगधंद्यांची वाढ असेल, रस्त्यांचे मजबूत जाळे असले तरच या गोष्टी साध्य होतील. भारताला विकासदर १० टक्क्यांच्या वर न्यायचा असेल तर शेतीचा विकासही चार टक्क्यांवर जाण्याची गरज आहे. युरोपीय देश किंवा अमेरिकेची अर्थव्यवस्था भक्कम आहे, त्यामुळे तिथे चांगले रस्ते आहेत, हा समज चुकीचा आहे. उलट, या देशांनी रस्त्यांमध्ये गुंतवणूक केल्यामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई देशोदेशीच्या उद्योजकांची भेट घेऊन महाराष्ट्रात उद्योग आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या उद्योगांना लागणारे प्रमुख घटक म्हणजे वीज, पाणी आणि रस्ते. विजेच्या बाबतीत आज आपण बऱ्यापैकी स्वयंपूर्ण आहोत. सततच्या दुष्काळामुळे सध्या पाण्याची स्थिती नाजूक असली तरी उद्योगांना महाराष्ट्रात पाणी टंचाई भेडसावत नाही. राहिला रस्त्यांचा प्रश्न. त्यासाठी महामंडळाच्या कारभाराला गती देण्यासाठी आम्ही कंबर कसली आहे. मुख्यमंत्र्यांनीही महामंडळाची स्थिती सुधारण्यासाठी समर्थन दिले आहे.

**तुम्ही खात्याचा कारभार हाती घेतलात तेव्हा ‘एमएसआरडीसी’ मरणासन्न अवस्थेत होते. आज नेमकी काय परिस्थिती आहे?**

राज्याच्या विकासाचे जे चित्र आमच्या डोक्यात आहे, त्यासाठी ‘एमएसआरडीसी’ हे महत्त्वाचे ग्रोथ इंजिन ठरू शकते. दुर्दैवाने गेल्या १५ वर्षांत क्षुद्र राजकारणामुळे ‘एमएसआरडीसी’सारख्या महत्त्वाच्या महामंडळाचे खच्चीकरण करण्यात आले. पण आता परिस्थिती बदलली आहे. अनेक महत्त्वाकांक्षी योजना आम्ही आखतो आहोत. मुख्यमंत्र्यांनीही सकारात्मक भूमिका घेत महामंडळाच्या पाठिशी उभे राहण्याचा शब्द दिला आहे. इतकेच नव्हे, तर नितीन गडकरी यांनीही केंद्र शासनाच्या वतीने महामंडळाला अनेक कामे देऊ केली आहेत. लवकरच नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय) आणि ‘एमएसआरडीसी’ यांच्यात एक सामंजस्य करारदेखील होणार आहे.

**महामंडळाची स्थिती सुधारण्यासाठी नेमकी काय योजना आहे?**

काम, काम आणि भरपूर काम... महामंडळाने आपली गुणवत्ता, क्षमता

आणि उपयुक्तता यापूर्वीच सिद्ध केली आहे. महामंडळाने मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग विक्रमी वेळेत पूर्ण केला होता. आजही हा महामार्ग उत्तम स्थितीत आहे. त्यामुळेच महामंडळाला राज्यातील रस्त्यांच्या मोठ्या प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याची संधी मिळावी, अशी आमची मागणी आहे. शिवाय, यापूर्वी जे टोल मुदतीपूर्वी बंद करण्यात आले आहेत किंवा कामे करूनही ज्यांचे पैसे अदा झालेले नाहीत, ती थकबाकी राज्य शासनाकडे आहे. महामंडळाने विविध वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जांची परतफेड करण्यासाठी राज्य शासनाने पुढील पाच वर्ष दरवर्षी ४०० कोटी रुपये महामंडळाला द्यावेत, अशी आमची मागणी मुख्यमंत्र्यांनी मान्य केली आहे.

**तुम्ही ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रीही आहात. जिल्ह्याच्या विकासाविषयी तुमच्या काय योजना आहेत?**

एका सामान्य कार्यकर्त्यापासून आज मंत्रिपदापर्यंत माझा जो प्रवास झाला तो ठाणे जिल्ह्यात. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने आणि आनंद दिघे यांच्या सहवासात शिवसैनिक म्हणून मी घडलो. बाळासाहेबांचे ठाण्यावर विशेष प्रेम होते. आज शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने केवळ ठाण्यातच नव्हे, तर जिल्ह्यात विकासाचे विविध प्रकल्प राबवले जात आहेत. पूर्वी विरोधी पक्षात असताना ज्या प्रकल्पांसाठी आम्ही सरकारशी भांडत होतो, ते प्रकल्प पालकमंत्री या नात्याने मार्गी लावण्याची संधी मला प्राप्त झाली आहे. जिल्ह्यातील

**महामंडळ सध्या कुठल्या प्रकल्पांवर काम करत आहे?**

मुंबई-नागपूर कम्युनिकेशन एक्स्प्रेस वे, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेचा क्षमताविस्तार, ठाण्याहून बोरिवलीला अवघ्या १० मिनिटांत जाण्यासाठी भुयारी मार्ग, पुणे रिंग रोड अशा काही महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर महामंडळ सध्या काम करत आहे. शिवाय, काही प्रमुख शहरांसाठी एकत्रित रस्ते विकास योजना राबवण्याचेही प्रस्तावित आहे. संपूर्ण राज्यात रस्त्यांचे जाळे तयार करण्यावर भर देण्यात येणार आहे. केवळ महामार्गच नव्हे, तर अंतर्गत रस्ते व महामार्ग आणि या अंतर्गत रस्त्यांना जोडणारे रस्ते अशा प्रकारे रस्त्यांचे ग्रिड तयार करण्याची 'एमएसआरडीसी'ची योजना आहे.

याखेरीज सेल्स टॅक्स विभागासाठी माझगाव आणि येरवडा येथे आयकॉनिक इमारती बांधण्याची योजना प्रगतिपथावर आहे. नव्याने अस्तित्वात आलेल्या पालघर जिल्ह्यासाठी प्रशासकीय इमारती बांधण्याचा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागासोबत संयुक्तरीत्या राबवण्याचा प्रस्तावही आम्ही मुख्यमंत्र्यांसमोर ठेवलेला आहे.



**या सगळ्या प्रकल्पांसाठी निधी कुठून उभा करणार?**

निधीची अडचण येणार नाही. आज अनेक वित्तसंस्था अल्प व्याजदरात पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना अर्थपुरवठा करण्यासाठी उत्सुक आहेत. 'जायका'सारखी जपानी अर्थसंस्था महाराष्ट्रातील प्रकल्पांना अर्थपुरवठा करण्यासाठी पुढे आली आहे. कर्जरोख्यांच्या माध्यमातून निधी उभारता येईल का, याचीही चाचपणी आम्ही करत आहोत. याखेरीज 'एमएसआरडीसी'ला स्पेशल प्लॅनिंग ऑथॉरिटीचा दर्जा द्यावा, ही आमची मागणीही मुख्यमंत्र्यांनी मान्य केली आहे. त्यामुळे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गालगत महामंडळाच्या ज्या जमिनी आहेत, तिथे स्मार्ट सिटीजची निर्मिती करून त्याद्वारेही निधी उभारण्याची योजना आहे. नागपूर-मुंबई कम्युनिकेशन हायवेसाठीही असेच मॉडेल राबवण्याच्याही पर्यायाचा विचार होऊ शकतो. याखेरीज अन्य राज्यांमध्ये पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे. कोकण रेल्वे ज्या पद्धतीने जम्मू-काश्मीरमध्ये रेल्वे प्रकल्प उभारत आहे, त्याच धर्तीवर 'एमएसआरडीसी'ही अन्य राज्यात रस्त्यांची कामे करण्यासाठी सक्षम आहे.

**टोलच्या बाबतीत सरकारचे धोरण काय आहे?**

कुठल्याही प्रकारे अन्याय्य टोल लादला जाणार नाही. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापूरच्या जनतेला टोलमुक्तीचा शब्द दिला होता. तो आम्ही वर्षाच्या आतच पूर्ण केला आहे. याखेरीज राज्यातील १२ टोल कायमस्वरूपी तर ५३ टोल अंशत: बंद केले आहेत. त्यामुळे जनतेला मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळालेला आहे.

महापालिकांसाठी हक्काचे धरण, धरणांच्या परिसरातील ग्रामस्थांचा पाणीटंचाईचा प्रश्न, क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून धोकादायक इमारतींचा पुनर्विकास, अंतर्गत रस्त्यांचे बळकटीकरण, इको टुरिझम या बाबतीत ठाणे जिल्ह्यात विकासाला बराच वाव आहे. शासनाच्या अनेक योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबवण्याचे निर्देश मी दिले आहेत. गावागावांतील जलस्रोतांचा विकास करण्याचे निर्देश मी दिले आहेत. शेतकऱ्यांना वर्षातून दोन वेळा पिके घेता यावीत, असा माझा प्रयत्न आहे. कल्याणच्या ग्रामीण भागातील वाकळण तलावाचे उदाहरण सांगतो. तब्बल ८३ एकरचा हा विस्तीर्ण तलाव गाळाने भरला होता. मी जेसीबी आणि पोकलेन मशिन लावून गाळ काढून त्याचे क्षेत्र विस्तारले. आज पावसाळ्यात त्या तलावातील पाणीसाठा वाढून २५ एकर क्षेत्रावर पिके घेतली आहेत. इको टुरिझमच्या विकासासाठी जागा हेरण्याचे सूचनाही मी वनविभागाला केल्या आहेत. जिल्ह्यात इको टुरिझमचा विकास केला तर मुंबई आणि परिसरात राहणाऱ्या लोकांसाठी दोन घटका विरंगुळ्याची ठिकाणे उपलब्ध होतील. शिवाय, स्थानिकांना रोजगार मिळेल आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला आणखी चालना मिळेल. जिल्ह्यात जलवाहतुकीलाही बराच वाव असून कल्याण-ठाणे-मुंबई जलवाहतुकीचे काम लवकरच मार्गी लागेल. वडाळा ते ठाणे मेट्रोचे कामही वर्षाअखेर सुरू होत असून कल्याण-भिवंडी-ठाणे मेट्रोचा प्रकल्प आराखडा तयार करण्याचे कामही प्रगतीपथावर आहे.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**
**संपर्क : ०९८२१५०३०४२**

# सुसंवाद आणि समन्वय

**आपल्यापैकी अनेक जण मंत्र्यांना कामानिमित्त भेटत असतात. आपली ती भेट तेवढ्यापुरती असते. पण मंत्र्याची दिनचर्या कशी असते. त्यांचा दिवस कसा जातो, ते काम कसे करतात याबाबत प्रत्येकालाच उत्सुकता असते. एक दिवस मंत्र्यांसोबत या सदरातून यावेळी शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. विनोद तावडे यांची दिनचर्या जाणून घेत आहोत.**

**वर्षा फडके**

एक दिवस मंत्र्यांसोबत या सदरासाठी सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांच्यासोबत एक दिवस व्यतीत करण्यासाठी मी त्यांच्या विलेपार्ले येथील निवासस्थानी सकाळी साडे नऊ वाजता पोहोचले. त्यांच्या घरी पोहोचताच त्यांनी माझे स्वागत केले. मी त्यांना त्यांच्या दिवसाच्या सुरुवातीविषयी विचारले. तर ते म्हणाले, माझी सकाळची सुरुवात खरे तर लवकरच होते. सकाळी उठल्याबरोबर नियमित योगा, वृत्तपत्रे वाचन याला मी फार महत्त्व देतो. कार्यकर्ता होण्यासाठी आणि लोकांचे प्रश्न नीट मांडण्यासाठी आपल्या आजूबाजूला नेमके काय चालले आहे, याचे भान हवे. ते भान असेल तरच आपण सामाजिकरीत्या लोकांशी जोडलेलो राहतो. आम्ही बोलत असतानाच, मंत्रिमहोदयांच्या स्वीय साहाय्यकांनी दिवसभरातील कार्यक्रमांची यादी दिली. चहानंतर मंत्रिमहोदयांनी काही महत्त्वाचे टपाल तपासून त्यांच्यावर शेरा मारून ते आपल्या स्वीय साहाय्यकाला दिले. साधारण १०.३० वाजताच्या सुमारास मंत्रिमहोदय दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहाकडे निघाले. कारण दिवसभरातला पहिला कार्यक्रम तिथे होता. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी मंत्रिमहोदयांनी तेथे जमलेल्या लोकांशी, कार्यकर्त्यांशीही संवाद साधला.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील आठवीतील विद्यार्थ्यांना टॅबचे वितरण करण्याचा हा कार्यक्रम होता. खरे तर आजच्या विद्यार्थ्यांना काळाशी सुसंगत असे शिक्षण मिळणे आवश्यक आहे, अशी आपली आग्रही भूमिका असून शालेय शिक्षण मंत्री म्हणून विद्यार्थ्यांना काळाशी सुसंगत शिक्षण मिळणे किती आवश्यक आहे, हे त्यांनी या कार्यक्रमाला जाताना सांगितले. या कार्यक्रमानंतर विलेपार्ले येथून लगेचच मलबार हिल येथील सह्याद्री अतिथिगृह येथे वित्त मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासोबत वैद्यकीय शिक्षकांच्या मागण्यांसदर्भातील बैठक होती.

त्यांच्यासोबत रस्त्यात त्यांनी सांगितले की, मंत्रिमंडळातील प्रत्येक मंत्र्यांसोबत माझा चांगला संपर्क आहे. त्यामुळे कुठल्याही मंत्र्यांकडे माझ्या खात्याचे काही काम असले की, मला प्रत्येकाचे चांगले सहकार्य लाभते. वैद्यकीय शिक्षकांच्या मागण्यांसदर्भातील बैठकीसाठी मी वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची वेळ मागितली असता, त्यांनी मला तत्काळ वेळ दिली. आपल्या विभागाशी संबंधित कर्मचारी असो, अधिकारी अथवा शिक्षक असो, त्यांचे प्रश्न,



मागण्या मार्गी लावण्याची
श्री. तावडे यांची धडपड मला या बैठकीत दिसली. बैठक संपली होती. दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती. पण पुढच्या कार्यक्रमाला पोहोचण्याची घाई होती, त्यामुळे श्री. तावडे यांनी सह्याद्रीवरच डबा मागवून घेतला होता. घाईघाईत त्यांनी तिथे आपले दुपारचे जेवण आटोपून ते पुढील कार्यक्रमासाठी निघाले. पुढचा कार्यक्रम घेत नरिमन पॉइंट येथील प्रदेश कार्यालयात पक्षातील कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यांना भेटण्यासाठी आलेल्या कार्यकर्त्यांमध्ये काही वयोवृद्ध कार्यकर्त्यांचा समावेश होता. या कार्यकर्त्यांचे प्रश्न त्यांनी जाणून घेतले. त्यानंतर त्यांनी आपल्या विभागातील महत्त्वाच्या नस्त्या बघून त्यांच्या दालनात आलेल्या आमदार, खासदार आणि सामान्य लोकांनाही भेटले, त्यांची निवेदने स्वीकारली.

काही वेळातच आम्ही पुढील कार्यक्रमाला जाण्यासाठी निघालो. तो कार्यक्रम होता, ज्येष्ठ छायाचित्रकार मोहन बने यांच्या 'चॅम्पियन्स'या पुस्तकाच्या प्रकाशनाचा. विशेष म्हणजे या कार्यक्रमालादेखील शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे येणार होते. सकाळी टॅब वितरण कार्यक्रमात श्री. ठाकरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हा कार्यक्रम मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कोणत्याही कार्यक्रमाला वेळेत पोहोचणे यावर श्री. तावडे यांचा प्रमुख कटाक्ष असतो त्याच पद्धतीने ते वेळेचे नियोजन करून कार्यक्रमाला वेळेवर पोहोचतात. या कार्यक्रमालासुद्धा ते पोहोचले तेव्हा बाकीचे पाहुणे आले होते. पत्रकार संघात कार्यक्रम असल्यामुळे येथे अनेक ज्येष्ठ पत्रकार उपस्थित होते. श्री. तावडे आले आहेत असे कळताच अनेक पत्रकार त्यांना भेटावयास आले. श्री. तावडे यांनी त्यांची आपुलकीने चौकशी करत त्यांच्याशी संवाद साधला. या कार्यक्रमात बोलताना श्री. तावडे म्हणाले की, महाराष्ट्राची क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी आगामी काळात या विभागातर्फे राज्याचा क्रीडा नकाशा तयार करण्यात येणार आहे.

यानंतर कार्यक्रम होता तो शिक्षक सन्मान पुरस्काराचा. अखिल घाटकोपर गुजराती महाजन यांच्यामार्फत शिक्षकांचा सन्मान असा हा कार्यक्रम, घाटकोपर येथील झवेरबेन हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला संध्याकाळी ७ वाजता जाताना मंत्रिमहोदय तितकेच प्रसन्न दिसत होते. गाडीत बसल्यानंतर त्यांनी मंत्रालयातील खाजगी सचिव आणि विशेष कार्य अधिकारी यांच्याशी फोनवरून संपर्क साधत दिवसभराच्या कामाचा आढावा घेतला. नेहमीप्रमाणे त्यांनी जास्त भाषण न करता उपस्थित शिक्षकांशी संवाद साधणे पसंत केले. या वेळी शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या वयोवृद्ध व्यक्तींचा सत्कार करताना, श्री. तावडे व्यासपीठावरून खाली उतरत व प्रत्येकाचा जागेवर जाऊन सत्कार करत. यामुळे त्या वयोवृद्ध व्यक्तीही काही क्षण भारावून गेल्या.

विनोद तावडे हे सर्वसामान्यांमध्ये सहज मिसळणारे नेते म्हणून प्रसिद्ध आहेत. कोणत्याही कार्यक्रमाला गेल्यानंतर तेथील उपस्थितांशी, कार्यकर्त्यांशी संवाद साधणे, त्यांची चौकशी करणे ही त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये म्हणावी लागतील. मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने त्यांना अनेक स्तरातील व्यक्ती भेटत असतात व त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा वेळी पालकमंत्री म्हणून मुंबई उपनगर जिल्ह्यातील नागरी समस्या सोडवण्यावर, त्यांचा मुख्य भर असतो. दिवसभरात विविध बैठकीला उपस्थित राहताना त्यांच्यातील कर्तृत्ववान नेता, प्रशासकीय कौशल्य, उत्कृष्ट कार्यकर्ता आणि जनतेच्या हिताचे निर्णय घेणारा मंत्री अशी विविधांगी रूपे मला दिसली.

**(लेखिका या विभागीय अधिकारी आहेत.)**








शाही स्नान

# श्रद्धा, भक्ती आणि उत्कृष्ट नियोजन



नाशिकला तिसऱ्या पर्वणीच्यावेळी पहाटेपासूनच जोरदार पावसाला सुरुवात झाली होती. माध्यम व्यवस्थेसाठी मिडियालाही सेंटरच्याही बाहेर पडता येत नव्हते. मात्र अशा स्थितीतही समोरील घाटावर स्वच्छता कर्मचारी आणि पोलिसांची लगबग सुरू होती. त्यात नियोजित वेळी मिरवणूक सुरू होईल, असा निरोप आला. ठरल्याप्रमाणे शाही मिरवणूक सुरू झाली आणि तेवढ्याच उत्साहात पावसात शाही स्नान संपन्न झाले. पाऊस असूनही लाखोंच्या संख्येने भाविकांनी पवित्र स्नानाचा आनंद घेतला. शासनाने निर्माण केलेल्या सुविधा आणि प्रशासनाच्या उत्तम नियोजनाविषयी कौतुकोद्गार काढत भाविक घराकडे परतले.

**डॉ. किरण मोघे**

पर्वणीच्या वेळी लाखोंच्या संख्येने भाविक गोदाकाठी एकत्र येऊनही शांतता आणि उत्साहाचे वातावरण कायम ठेवण्यात प्रशासनाला यश आले. भाविकांची आस्थेवाईकपणे विचारपूस करून प्रसंगी त्यांना मदत करणाऱ्या पोलिसांनी वातावरण निर्मितीत चांगली भर टाकली. हरवलेल्या दोन हजारपेक्षा जास्त भाविकांची त्यांच्या कुटुंबीयांशी भेट घेडवून आणत पोलिसांनी त्यांना कुंभमेळ्यातील अनोख्या आनंदाचा अनुभव दिला. दुसऱ्या पर्वणीत लाखोंच्या संख्येने भाविक येऊनही नियोजनात कोणतीच अडचण निर्माण झाली नाही. स्वत: पालकमंत्री गिरीश महाजन आणि सहकार राज्यमंत्री दादाजी भुसे यांनी स्वयंसेवकाची

**साधू-महंतांचे शाही स्नान, भाविकांची प्रचंड गर्दी, तिसऱ्या पर्वणीच्या वेळी कोसळणाऱ्या पावसातही उत्साहाला आलेले उधाण, शाही मिरवणुकीतील आनंद आणि उत्साह. यजमानपदाची जबाबदारी ओळखून नागरिकांनी प्रशासनाला केलेले सहकार्य आणि पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने केलेले उत्तम नियोजन यामुळे नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभमेळा वैशिष्ट्यपूर्ण ठरला.**

## टीम कुंभचा सत्कार



**नाशिक-त्र्यंबकेश्वर हरित कुंभाच्या यशस्वी आयोजनाबद्दल व स्वच्छतेच्या दृष्टीने उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल 'टीम कुंभ'चा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये नाशिक विभागीय आयुक्त एकनाथ डवले, जिल्हाधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, मनपा आयुक्त प्रवीण गेडाम नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुखदेव बनकर व त्र्यंबकेश्वरचे मुख्याधिकारी निवृत्ती नागरे यांचा समावेश होता.**



उत्तम भूमिका बजावली. विभागीय आयुक्त एकनाथ डवले, जिल्हाधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह, पोलीस आयुक्त एस. जगन्नाथन, महापालिका आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस अधीक्षक संजय मोहिते, मुख्य कार्यकारी अधिकारी सुखदेव बनकर यासारखे वरिष्ठ अधिकारी स्वत: गर्दी व्यवस्थापनासाठी मेळा परिसरात होते. प्रशासनातील सर्वच विभागांनी पूर्ण क्षमतेने कार्य करीत भाविकांना समस्या येणार नाही याची विशेष काळजी घेतली. संपूर्ण मेळा परिसरात विशिष्ट अंतरावर असलेल्या स्वच्छता आणि आरोग्य सुविधांबाबत भाविकांनी समाधानाच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. भाविकमार्गावरील स्वच्छतागृहांची चांगली व्यवस्था नाशिक महानगरपालिका आणि त्र्यंबकेश्वर नगरपालिकेने ठेवली. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी कर्मचारी रात्रीदेखील राबत होते. हरितकुंभच्या प्रचारासाठी प्रशासन आणि सेवाभावी संस्थांनी कापडी पिशव्यांचे वाटप केले.

## सहभाग जनतेचा

स्थानिक जनतेने भाविकांना अन्नवाटप, पाण्याची सुविधा आदी विविध प्रकारे मदत करून या महापर्वात सहभाग घेतला. अनेक शैक्षणिक आणि स्वयंसेवी संस्थांनी प्रशासनाला नियोजनात विविध प्रकारे मदत केली. पोलीस आणि आरोग्य विभागाच्या कामगिरीमुळे कोणतीही मनुष्यहानी न होणे हे महापर्वातील मोठे यश म्हणावे लागेल. अनेक ठिकाणी भाविकांना रुग्णवाहिकांद्वारे तत्पर मदत करण्यात आली. देशभरातून येणाऱ्या साधू-महंतांनी प्रशासनाने केलेल्या तयारीविषयी समाधान व्यक्त केले. उज्जैन कुंभमेळ्यासाठी प्रस्थान करताना सुविधांचे हे 'नाशिक-त्र्यंबकेश्वर' मॉडेल इतरत्रही अनुसरले जावे, अशा प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. भाविकांनीदेखील चांगल्या मूलभूत सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले.




**कुंभमेळयाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जिल्हा पोलीस, पालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी, नाशिक आणि त्र्यंबकेश्वर नागरिकांचे आभार.. - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

व्यक्त झालेल्या या भावनांमुळे वर्षभर परिश्रम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आनंदाचे क्षण अनुभवले. व्हॉट्सॲपसारख्या वेगवान संवाद माध्यमाचा उपयोग नियोजनात खुबीने केल्याने, नाशिक आणि त्र्यंबकेश्वर दोन्ही ठिकाणी कोणत्याही क्षणी निर्माण होणाऱ्या समस्येला तातडीने यंत्रणांनी प्रतिसाद दिला. आपत्ती व्यवस्थापनाची सुनियोजित तयारी आणि सूक्ष्म पैलूंवर बैठकांमध्ये झालेले मंथन यामुळे संपूर्ण तयारीनिशी प्रशासन कुंभमेळ्याला विश्वासाने सामोरे गेले. तिन्ही पर्वण्या निर्विघ्नपणे आणि आनंदात पार पडणे ही सांघिक भावनेने केलेल्या कामाची फलश्रुती आहे, असेच म्हणावे लागेल.

**(लेखक हे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४०४६७०८८७**

## पर्यटनाच्या वाढीसाठी महाराष्ट्र सज्ज



महाराष्ट्राला जागतिक वारसा लाभला असून, महाराष्ट्राची संस्कृती जगाला हेवा वाटावी अशी आहे. या संस्कृतीचे दर्शन जगाला घडावे, असा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. त्यामुळे पर्यटन वाढीसाठी खाजगी गुंतवणुकीला चालना देण्यात येणार असून, त्यासाठी 'महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रॅव्हल मार्ट' महत्त्वपूर्ण भूमिका निभावेल. या मार्टच्या माध्यमातून महाराष्ट्र पर्यटनाच्या विकासासाठी सज्ज झाला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुंबई येथील जे. डब्ल्यू. मॅरिएट हॉटेल येथे 'महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रॅव्हल मार्ट' या महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रसार प्रकल्पानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रीय पर्यटन राज्यमंत्री डॉ. महेश शर्मा, उच्च शिक्षण मंत्री विनोद तावडे, पर्यटन राज्यमंत्री प्रा. राम शिंदे आदी उपस्थित होते. या वेळी बोलताना मुख्यमंत्री पुढे म्हणाले, राज्यातील गुंतवणुकीचे प्रमाण वाढावे, यासाठी विविध परवानग्यांची संख्या २५ वरून ६ करण्यात आली आहे. लघुपट किंवा चित्रपट निर्मिती करू इच्छिणाऱ्यांना एक दिवसात परवानगी मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाराष्ट्र हे 'इव्हेंट डेस्टिनेशन' होण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, नवीन पर्यटन धोरणात खाजगी गुंतवणुकीला चालना देण्यात येईल.

## 'अमृत' अभियानाच्या अंमलबजावणीला मंजुरी

केंद्र शासनातर्फे राबवण्यात येणाऱ्या अटल मिशन फॉर रिज्युव्हनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) या महत्त्वाकांक्षी अभियानाची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत नुकताच घेण्यात आला. या अभियानात राज्यातील ४३ शहरांचा समावेश करण्यात आला आहे.

शहरातील प्रत्येक घरासाठी प्रचलित निकषानुसार पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छतेसाठी मलनि:स्सारण, मलव्यवस्थापन व पर्जन्यजल वाहिनीची व्यवस्था करण्यासह शहरांतील मोकळ्या जागा, हरित क्षेत्रे, परिवहन व्यवस्था यांमध्ये सुधारणा करुन प्रदूषण कमी करणे, तसेच इतर सुविधांची निर्मिती या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हे अभियान राबवण्यात येत आहे. अभियानाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून या आर्थिक वर्षासाठी एक हजार तीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. अमृत अभियानांतर्गत समाविष्ट असलेल्या क आणि ड वर्ग महानगरपालिका व नगरपरिषदांचे विविध प्रकल्पांचे नियोजन, कार्यान्वयन व पर्यवेक्षणासाठी प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या नेमणुकीस मान्यता देण्यात आली.

# तारांकित

## जलपुरुषाकडून राज्याचा गौरव

आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह यांनी नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. राज्यात दुष्काळ निवारणासाठी संवेदनशीलता दाखवत राज्य शासन करीत असलेल्या उपाययोजना समाधानकारक असल्याचे गौरवोद्गार डॉ. राजेंद्रसिंह यांनी काढले.

राज्यातील जलस्थितीवर चर्चा करताना डॉ. राजेंद्रसिंह यांनी काही सूचनाही केल्या. शालेय वयापासूनच जलसाक्षरता यावी, यासाठी हा विषय शालेय अभ्यासक्रमात



समाविष्ट करण्यात यावा, तसेच या विषयावर व्यापक लोकजागृती करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीक व्यवस्थापनासाठी कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून अभियान राबवण्यात यावे, यासाठी लागणारे सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

डॉ. राजेंद्रसिंह यांनी राजस्थान येथे जलक्रांती घडवून आणली आहे. देशभर पदयात्रा काढून जलसंवर्धन, नद्या पुनर्जीवित करणे, वनसंवर्धन, वन्यजीवन संवर्धन मोहीम राबवली आहे. त्यांनी वेळोवेळी महाराष्ट्रभर जलनियोजनासंदर्भात व्याख्याने दिली आहेत. जलसंवर्धनाबाबत त्यांचे कार्य मोलाचे आहे. त्यांनी सुचवलेल्या उपाययोजना राज्यातील सिंचनविषयक समस्या सोडवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. यासंदर्भात शासनाला त्यांचे वेळोवेळी सहकार्य लाभणार आहे.

## मोटर बाइक ॲम्ब्युलन्स




अपघात व आपत्तीतील जखमींना (प्लॅटिनिअम टेन मिनिट) अवघ्या दहा मिनिटात उपचार मिळावेत यासाठी मुंबई येथे पुढील वर्षापासून मोटर बाइक ॲम्ब्युलन्स सेवा इंग्लंडच्या आरोग्यसेवा यंत्रणेमार्फत प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील आरोग्यसेवा अधिक दर्जेदार होण्यासाठी रुग्णालयांचे अद्ययावतीकरण, परिचारिका व डॉक्टरांचा प्रशिक्षणाचा कार्यक्रम ब्रिटिश सरकारच्या सहकार्याने राबवण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांनी दिली. महाराष्ट्र शासन आणि इंग्लंडच्या आरोग्यसेवा यंत्रणेमध्ये नुकताच आरोग्यविषयक सामंजस्य करार आरोग्य मंत्री डॉ. सावंत आणि इंग्लंडचे व्यापार व गुंतवणूक मंत्री लॉर्ड फ्रान्सिस मॉड यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

या करारामुळे राज्याच्या आरोग्य विभागातील पायाभूत सुविधा विस्तारण्यास मदत होणार आहे. परिचारिका, पॅरामेडिकल, डॉक्टर यांच्या प्रशिक्षणाबरोबरच राज्यातील विशेषत: ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयांचे अद्ययावतीकरण करण्यासाठी इंग्लडमधील आरोग्य यंत्रणेचे सहकार्य मिळणार आहे. राज्यात १०८ क्रमांकाद्वारे आपत्कालीन वैद्यकीय सेवेंतर्गत रुग्णवाहिकेची सुविधा देण्यात येते. मात्र मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या महानगरांमध्ये गर्दीच्या ठिकाणी एखादा अपघात अथवा दुर्घटना घडली तर या ठिकाणी रुग्णवाहिका पोहोचण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अशा प्रकारच्या दुर्घटनेतील जखमींवर 'गोल्डन अवर' पेक्षा 'प्लॅटिनअम टेन मिनिट' वेळेत उपचार झाले तर जखमींना हमखास जीवदान मिळू शकते, हे लक्षात घेऊन इंग्लडच्या सहकार्याने सर्व अत्याधुनिक यंत्रणा असलेली मोटर बाइक रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात येणार असल्याचे आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांनी सांगितले. मुंबईमध्ये १० ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर ही सेवा सुरू करण्यात येईल. मोटर बाइक रुग्णवाहिकेच्या साहाय्याने जखमींना तातडीने जवळचे रुग्णालय अथवा आपत्कालीन वैद्यकीय सुविधेच्या रुग्णवाहिकेपर्यंत पोहोचवता येणे शक्य होईल. ही सेवा मुंबईसारख्या शहराच्या ठिकाणी उपयुक्त ठरेल, असा विश्वास डॉ. सावंत यांनी यावेळी व्यक्त केला.

## उद्योग उभारणीच्या विविध परवानग्या ऑनलाइन

राज्यात उद्योग सुरू करण्यासाठी विविध विभागाच्या लागणाऱ्या परवानग्या 'इज ऑफ डुईंग बिजनेस'अंतर्गत सात दिवसांच्या आत देण्यात याव्यात. या परवानग्या देण्याची प्रक्रिया ऑनलाइन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

उद्योगांसाठी लागणाऱ्या विविध विभागांच्या परवानग्या एकाच ठिकाणी देण्यात याव्यात. काही विभागांच्या मान्यता मिळण्याची प्रक्रिया सात दिवसात पूर्ण न झाल्यास त्या प्राप्त झाल्या आहेत, असे समजण्यात यावे, यासाठीची यंत्रणा उभारण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. मंत्रालयात आयोजित विविध विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

जास्तीत जास्त उद्योगांना राज्यात आकर्षित करण्यासाठी विविध स्तरावर पोषक वातावरण कसे तयार करता येईल, याबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, कारखाने व संस्था यांचे परवाने देण्यासाठीची ऑनलाइन कार्यप्रणाली विभागाने २ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी, तसेच पर्यटन क्षेत्रातील हॉटेल व्यवसाय, आदरातिथ्य सेवा, पुरविणाऱ्या व्यावसायिकांनी पर्यटकांच्या सोई-सुविधांसह त्यांच्या सुरक्षेसंबंधीची जबाबदारी सांभाळणे आवश्यक आहे.

# तारांकित ★★★★★★

## अन्नपूर्णा

दुर्गम भागातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये 'आरोग्यदायी' वातावरणात बनवलेली डाळ, भात, चपाती, भाजी असा चौरस आणि सकस आहार विद्यार्थ्यांना मिळत आहे. आदिवासी विकास विभाग, रतन टाटा ट्रस्ट आणि अक्षयपात्र फाऊंडेशनच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यातील मुंढेगाव येथे 'अन्नपूर्णा' मध्यवर्ती स्वंयपाकगृह ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यात आली



आहे. दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांकरिता नाशिक जिल्ह्यातील मुंढेगाव येथे देशातील पहिले मध्यवर्ती स्वयंपाकगृह उभारण्यात आले आहे. या स्वयंपाकगृहाचे उद्घाटन नुकतेच राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते व आदिवासी विकास मंत्री विष्णू सावरा यांच्या उपस्थितीत झाले. पालघर जिल्ह्यातील कांबळगाव येथेही लवकरच अशा प्रकारे मध्यवर्ती स्वयंपाकगृह सुरू करण्यात येणार आहे. या मध्यवर्ती स्वयंपाकगृहाच्या माध्यमातून परिसरातील ४० कि.मी अंतरातील शासकीय आश्रमशाळा तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नाष्टा, दुपारचे-रात्रीचे जेवण व अल्पोपहार देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. तयार झालेले जेवण/नाष्टा वाहनांद्वारे संबंधित आश्रमशाळा/वसतिगृह येथे पोहोचवले जाते. या मध्यवर्ती स्वयंपाकगृहात एका दिवसाला ६०,००० थाळी इतके जेवण तयार करण्याची क्षमता आहे.

## मायक्रोसॉफ्ट क्लाऊड सर्व्हिसेस; डिजिटल महाराष्ट्राचे पुढचे पाऊल



डिजीटल महाराष्ट्राचे पुढचे पाऊल म्हणून मायक्रोसॉफ्टच्या क्लाऊड सेवेचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते नुकताच झाला. या सेवेमुळे सर्वसामान्यांना अधिक गतिशील आणि पारदर्शी सेवा देणे शासनाला शक्य होणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री म्हणाले की, डिजिटल इंडिया व डिजिटल महाराष्ट्र ही संकल्पना साकारण्यासाठी या क्लाऊड सेवेच्या माध्यमातून महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. या सेवेमुळे नागरिकांना शासनाच्या विविध सेवा, वित्तीय सेवा गतीने उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या सेवेचा शुभारंभ झाल्यामुळे देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचे जगाच्या नकाशावरील स्थान अधिक ठळक होणार आहे. या सेवेमुळे उद्योगांना चालना व रोजगार निर्मितीही होणार आहे. मायक्रोसॉफ्टच्या माध्यमातून देशातील तीन डाटा सेंटर्सपैकी दोन

- **वित्तीय सेवेसह विविध सेवांचा वापर अधिक सुरक्षित**
- **महाराष्ट्रात मुंबई व पुणे येथे डेटा सेंटर्स**
- **मेळघाटातील अडिसाल हे पहिले स्मार्ट व्हिलेज**

सेंटर्स मुंबई व पुणे येथे सुरू करण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, 'मध्यंतरी मी मायक्रोसॉफ्टच्या मुख्यालयाला भेट दिली. त्या वेळी महाराष्ट्रात स्मार्ट व्हिलेज, स्मार्ट एमआयडीसी या संकल्पना प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार मायक्रोसॉफ्टतर्फे मेळघाटातील अडिसाल या दुर्गम गावात नेटवर्कची उभारणी करण्यात आली. या परिसरातील कुपोषणासारख्या समस्येवर मात करण्यासाठी हे नेटवर्क उपयुक्त ठरेल. अडिसाल हे पहिले स्मार्ट व्हिलेज व्हावे, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.'

## स्मार्ट शहरांसाठी २० कोटी

स्मार्ट सिटी योजनेत निवड झालेल्या महाराष्ट्रातील १० शहरांना स्मार्ट सिटिचे नियोजन तयार करण्यासाठी प्रत्येकी २ कोटी असा एकूण २० कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे.

स्मार्ट सिटी योजनेत निवड झालेल्या महाराष्ट्रातील १० शहरांसह देशातील ९६ शहरांना केंद्रीय नगर विकास मंत्रालयाकडून स्मार्ट सिटीसाठी प्रस्तावित शहर नियोजनाकरिता एकूण १९४ कोटी रूपयांची मंजुरी देण्यात आली. स्मार्ट सिटी योजनेतील ९८ पैकी उर्वरित चंदिगड आणि दिल्ली या केंद्रशासित प्रदेशांच्या स्मार्ट सिटी शहर नियोजनासाठी, गृहमंत्रालयाच्या मंजुरीनंतर निधी देण्यात येणार असल्याचे या प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे. नुकत्याच मंजूर झालेल्या देशातील अन्य शहरांप्रमाणेच महाराष्ट्रातील नवी मुंबई, नाशिक, ठाणे, बृहन्मुंबई, अमरावती, सोलापूर , नागपूर, कल्याण -डोंबिवली, औरंगाबाद, पुणे या शहरांना स्मार्ट सिटी योजनेंतर्गत शहर नियोजनासाठी प्रत्येकी २ कोटी रूपये मिळणार आहेत.

# तारांकित

## मुख्यमंत्री आर्थिक सहायता कक्षाकडून तातडीची मदत

'साहेब तुमच्यामुळेच मी आज जिवंत आहे. माझ्यावर जर वेळेत शस्त्रक्रिया झाली नसती तर मी आज जिवंत नसतो. मी आपला व शासनाचा खूप खूप आभारी आहे. शासनाचा खऱ्या पारदर्शक कारभाराचा मला अनुभव आला आहे. मन:पूर्वक धन्यवाद.' मोबाइलवरून एक व्यक्ती अमरावतीहून बोलत होती. फोनवर पलीकडून संभाषण ऐकणारी व्यक्ती होती ओमप्रकाश शेट्ये. मुख्यमंत्री आर्थिक सहायता कक्षाचे मंत्रालयातील प्रमुख व आभार व्यक्त करणारे विजय कुबडे अमरावतीचे. अमरावतीपासून जवळच असलेल्या बेनोडा येथील मूळ रहिवासी विजय कुबडे यांची आर्थिक परिस्थिती



हलाखीची होती. त्यात गेल्या दोन वर्षापासून हर्नियाच्या व्याधीमुळे त्रस्त. अशा अडचणीच्या प्रसंगी त्यांनी अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील यांची भेट घेतली. मंत्रिमहोदयांनी त्यांना तातडीचे पत्र दिले. कुबडे प्रत्यक्ष मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटले. मुख्यमंत्र्यांनी तातडीने वैद्यकीय आर्थिक मदत कक्षाकडे पाठवले. तेथील अधिकाऱ्याने त्यांना लीलावती रुग्णालयात भरती होण्यास सांगितले. येथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली गेली. रुग्णालयातून सुटी मिळाल्यानंतर त्यांनी एक सप्टेंबरला अमरावतीत आल्यानंतर फोन करून शासनाचे आभार मानले.

## एक लाख हेक्टर क्षेत्रात नवी फळबाग



महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यातील एक लाख हेक्टर क्षेत्र नव्याने फळबाग लागवडी योजनेंतर्गत आणण्यासाठी कृषी विभागाने नियोजन करावे, असे निर्देश कृषिमंत्री एकनाथराव खडसे यांनी नुकतेच दिले आहेत.

कृषिमंत्री श्री. खडसे म्हणाले, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना उत्पन्नाचे शाश्वत साधन उपलब्ध व्हावे यासाठी राज्यातील एक लाख हेक्टर क्षेत्र महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून नव्याने लागवडीखाली आणले. यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळण्यास मदत होणार आहे. लागवड केलेल्या फळबागा जगविण्यासाठी केंद्र शासनाकडून अधिकचा निधी मिळवण्यासाठीदेखील प्रयत्न केला जाणार आहे. राज्यातील अनुसूचित जाती व जमातीतील शेतकऱ्यांना धडक सिंचन विहीर योजनेंतर्गत निधी दुप्पट करण्यात येणार असून तो एक लाखाऐवजी दोन लाख देण्याचे नियोजन आहे.

शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याकरिता कीटकनाशकांच्या दरांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. कृषीविषयक जे प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहेत, त्यांचा पाठपुरावा करण्यात येईल. शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत सध्या शेतकऱ्यांना एक लाख रुपयांपर्यंत भरपाई दिली जाते. त्याऐवजी आता ही भरपाई दोन लाख रुपयांपर्यंत मिळू शकेल अशा पद्धतीने या योजनेचे पुनर्नियोजन केले जाईल. तेलबिया व कडधान्य लागवडीखालील क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने नियोजन केले जाईल. फळ रोपवाटिकांचे बळकटीकरण केले जाईल.

## राज्याचा क्रीडा नकाशा

महाराष्ट्राची क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी आगामी काळात राज्याचा क्रीडा नकाशा तयार करणार असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री विनोद तावडे यांनी जाहीर केले.

मोहन बने यांच्या 'चॅम्पियन्स' या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन मुंबई मराठी पत्रकार संघ सभागृह येथे नुकतेच झाले, त्यावेळी श्री. तावडे बोलत होते. श्री. तावडे म्हणाले की, प्रत्येक मुला-मुलीने मैदानी खेळ खेळावेत, यासाठी त्यांना टीव्हीसमोरून उठवून मैदानात खेळण्यासाठी प्रोत्साहनाची गरज आहे. प्रत्येक तालुक्यातील क्रीडा संकुलांचे योग्य पद्धतीने नियोजन करण्यासाठी येत्या काळात शासनामार्फत प्रयत्न केले जातील.

'चॅम्पियन्स' या पुस्तकाच्या रूपाने खेळाचा महत्त्वाचा इतिहास जमा करण्याचा, उल्लेखनीय प्रयत्न मोहन बने यांनी केला असल्याचे गौरवोद्गार श्री. तावडे यांनी काढले.

# तारांकित

## खाऊचा पैसा शेतकऱ्यांसाठी

जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याला मदत व्हावी, या भावनेतून नागपूरच्या आठ वर्षीय रसिका जोशी या बालिकेने खाऊसाठी जमवलेले सर्व पैसे मुख्यमंत्री मदतनिधीला दिले. बळीराजाच्या मदतीसाठी या चिमुकलीने केलेली ही मदत मौलिक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिच्या वयातील मुलींमध्ये ही संवेदना असणे हीच फार मोठी सुखावह बाब आहे. तिने दिलेली रक्कम निश्चितपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल, ही रक्कम लहान असली तरी यातून समाजाला निश्चितच मोठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

खाऊच्या पैशांची रक्कम जरी छोटी असली तरी यातून तिने राज्यातील जनतेला



आभाळभर मोठी प्रेरणा दिली आहे.

दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था फारशी चांगली नाही. राज्यभरातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अडचणीच्या काळातून बाहेर काढण्यासाठी मुख्यमंत्री मदतनिधीसाठी सर्व स्तरांतून धनादेश प्राप्त होत आहेत. यासंदर्भात प्रसिद्धी माध्यमांमध्ये बातम्या पाहिल्यानंतर रसिकाने वडील मनोज जोशी यांना राज्यातील शेतकरी कसे संकटात आहेत याबाबत विचारणा केली. ज्या शेतकऱ्यांच्या कष्टांमुळे शाळेतील टिफिनमध्ये अन्न खाते, ते संकटात असल्याचे ऐकताच रसिकाच्या बालमनाला वाईट वाटले व तिने कुणालाही न सांगता साठविलेले सर्व पैसे एकत्र केले. परिचितांसोबत मुख्यमंत्र्यांकडे गेली असता, रसिकाने खाऊचे पैसे साठवून ठेवलेली 'पिगी बँक'च त्यांना सुपुर्द केली व या रकमेतून शेतकऱ्यांना मदत करा, अशी विनंती केली.

# स्वच्छ महाराष्ट्राचा संकल्प

**२०१७ पर्यंत महाराष्ट्राला 'स्वच्छ महाराष्ट्र' करण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्ली येथे निती आयोगाच्या बैठकीत बोलून दाखविला. स्वच्छ भारत अभियानांतर्गत १० राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपगटाची बैठक नुकतीच पार पडली. या उपगटाने स्वच्छ भारत अभियान राबवण्यासाठी केंद्र शासनास विविध शिफारशी केल्या आहेत.**

**दयानंद कांबळे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही महत्त्वाच्या सूचना या बैठकीत केल्या. त्यात प्रामुख्याने मुंबईतील झोपडपट्ट्यांतील स्वच्छतागृह निर्माणाबाबतचा प्रश्न त्यांनी मांडला. मुंबईत केंद्र शासनाच्या जागा व सागरी किनारपट्टी नियमन क्षेत्राच्या (सिआरझेड) जमिनीवर असलेल्या झोपडपट्ट्यांमधे स्वच्छतागृह बांधता येत नाहीत. अशा जागांवर स्वच्छतागृह उभारण्यास मंजुरी द्यावी अशी सूचना फडणवीस यांनी या बैठकीत केली.

उपगटात सहभागी सर्वच राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी अतिशय चांगले काम केले असून त्यांच्या सूचनांनंतर तयार होणाऱ्या आराखड्यातून 'स्वच्छ भारत' व 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' प्रभावीपणे राबवले जाणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीस हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर, उत्तराखंडचे मुख्यमंत्री हरिश रावत, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिध्दरमय्या, मिझोरमचे मुख्यमंत्री लाल थानवाला, निती आयोगाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सिंधुश्री खुल्लर, महाराष्ट्राच्या नगर विकासखात्याच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, मुख्यमंत्र्यांचे सचिव मिलिंद म्हैसकर यांच्यासह सिक्किम, पश्चिमबंगाल, बिहार आणि दिल्ली आदी राज्याचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत मुख्यमंत्र्यांच्या उपगटाने या अभियानाच्या अंमलबजावणी संदर्भात आर्थिक, तांत्रिक, लोकसहभाग, घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छताविषयक जनजागृती आदी विषयांवर एकत्रित अहवाल केंद्र शासनास सादर केला.

## स्वच्छताकराची सूचना

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रभावीपणे मूलभूत सेवा पुरवण्यासाठी १४ व्या वित्त आयोगांतर्गत मुबलक निधी देण्यात यावा, असे मुख्यमंत्र्यांच्या उपगटाने सुचवले. कराच्या माध्यमातून या योजनेसाठी निधी जमा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. कोळसा, ॲल्युमिनीयम, लोखंड निर्मिती तसेच जैविक कचरा, पेट्रोल व डिझेल याबरोबरच रासायनिक कंपन्या व टेलीकम्युनिकेशन कंपन्यांवर स्वच्छ भारत कर लावण्याचा विचारही बैठकीत मांडण्यात आला. करातून मिळालेला निधी राज्यांच्या स्वच्छ भारत कोषामध्ये जमा करण्याचे सुचविण्यात आले.

## राज्यस्तरीय मिशनची निर्मिती

स्वच्छ भारत अभियानासाठी केंद्र व राज्य स्तरावर मिशनची निर्मिती करण्याबाबत बैठकीत एकमत झाले. यानुसार केंद्र शासन स्तरावर पंतप्रधानांच्या तर राज्य स्तरावर मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात येणार आहे. राज्यपातळीवर तयार करण्यात येणाऱ्या मिशनसाठी प्रकल्प संचालक, अंमलबजावणी यंत्रणा, कौशल्यवृद्धी केंद्र, स्वच्छ भारत कोष व माहिती शिक्षण व संवाद यंत्रणा निर्माण करण्याची सूचना या उपगटाने केली आहे.

## शालेय अभ्यासक्रमात स्वच्छता विषय

शालेय स्तरातून स्वच्छतेविषयी जनजागृती व्हावी याबाबत सर्वच राज्यांच्या मुख्यमंत्र्याचा आग्रह आहे. म्हणूनच या बैठकीत शालेय अभ्यासक्रमात स्वच्छता विषयाचा समावेश व्हावा, अशी सूचना करण्यात आली. पदवी व पदव्युत्तर अभ्याक्रमात पर्यावरण विज्ञान, आरोग्य अभियांत्रिकी, महापालिका अभियांत्रिकी यासारखे अभ्यासक्रम सुरू करण्याचे या उपगटाने सुचवले. घनकचरा व्यवस्थापनाच्या संशोधनासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुणवत्ता केंद्र निर्माण करण्याचे व त्यासाठी परदेशातील विद्यापीठांचे सहकार्य घेण्यात यावे आदी सूचनाही मुख्यमंत्र्यांच्या या उपगटाने केल्या आहेत.



## पुणे मेट्रोसह महत्त्वाचे निर्णय

महाराष्ट्र सदन येथे पुणे मेट्रो, विमानतळ आणि रिंगरोडच्या प्रश्नांबाबत केंद्रीय मंत्री, पुण्यातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. पुणे मेट्रो प्रकल्पाच्या दोन्ही टप्प्यांचे काम लवकर सुरू करणे, पुणे विमानतळ विस्तारीकरणाचे व रिंग रोडचे कामही लवकरच हाती घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखालील या बैठकीस केंद्रीय पर्यावरण व वने राज्यमंत्री प्रकाश जावडेकर, नागरी उड्डाण राज्यमंत्री डॉ. महेश शर्मा, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट, सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे,



सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आदी उपस्थित होते. या बैठकीत पुणे मेट्रोसंदर्भात भुयारी मार्ग व उड्डाण मार्गाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. पुणे मेट्रोच्या दोन्ही टप्प्यांचे काम एकाचवेळी सुरू करण्याबरोबरच आवश्यक तिथे उड्डाणमार्ग व भुयारी मार्गाचे काम सुरू करण्यात येणार आहे. शहरातून जाणाऱ्या नदीच्या बाजूने मेट्रोचे काम हाती घेण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. लक्ष्मी रोड, कोथरूड, पुणे स्टेशन, बंडगार्डन हा मार्ग भुयारी असणार आहे त्यामुळे ६ हजार कोटी रूपयांचा खर्च वाढणार आहे. पुणे मेट्रो प्रकल्पाचा अहवाल दिल्ली मेट्रो प्राधिकरणाने तयार केला होता. या प्रकल्पास महाराष्ट्र शासनाने २०१३ साली मंजुरी दिली होती तर फेब्रुवारी २०१४ साली केंद्रशासनाने या प्रकल्पास तत्त्वत: मंजुरी दिली होती. या प्रकल्पाचा ऑगस्ट २०१४ रोजीचा खर्च हा ११ हजार ८०० कोटी रूपये गृहीत धरण्यात आला होता. प्रकल्प सुरू होण्यास विलंब झाल्यामुळे या रकमेत वाढ होऊ शकते. प्रकल्प खर्चात राज्य शासन व केंद्र शासन प्रत्येकी २० टक्के रक्कमेचा भार उचलणार आहे. तर १० टक्के निधी महानगरपालिका खर्च करणार आहे.

### लोहगाव विमानतळाचे विस्तारीकरण

पुण्याच्या लोहगाव विमानतळ विस्तारीकरणाचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. पुणे विमानतळासाठी संरक्षण मंत्रालयाकडे असलेली १० एकर जागा भाडे करारावर घेण्यात येणार असून तसा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. २५ एकर जागा विमानतळासाठी देण्याची तयारी एका खाजगी व्यावसायिकाने दर्शविली असून या संदर्भातही लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. पुणे विमानतळावरून दररोज ९५ उड्डाणे होत आहेत. हवाई वाहतुकीत ३० टक्के वाढ झाली असून आंतरराष्ट्रीय उड्डाणेही येथून होत आहेत. भविष्याचा विचार करून या विमानतळासाठी लागणारी अतिरिक्त जागा संरक्षण मंत्रालयाकडून घेण्यात येईल, या संदर्भात लवकरच संरक्षण मंत्र्यांसमवेत बैठक घेण्यात येईल, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या बैठकीत स्पष्ट केले. सध्या लोहगांव विमानतळाचा रनवे २ हजार ५३७ मीटर असून याचा विस्तार करणे तसेच उड्डाणसंख्येचा विचार करून अतिरिक्त जमीन या संपादित करण्याच्या प्रक्रियेस वेग देण्याचा निर्णय घेतला.

### पुणे रिंगरोडचे कामही सुरू होणार

पुण्यातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यास साहाय्यभूत होणाऱ्या रिंग रोडबाबतही या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पुण्यातील वाहतुकीबाबतचा तांत्रिक अहवाल देण्यात यावा, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत रिंग रोडचे काम करण्यात यावे, पुणे शहराची वाढती लोकसंख्या पाहता येत्या २५ वर्षांसाठी रिंगरोडचे नियोजन करावे अशा सूचना श्री. गडकरी यांनी केल्या. पुण्यातून हैदराबाद, औरंगाबाद, बेंगळुरू आदी शहरांसह विविध राज्यांना जोडणारे रस्ते, शहरातील दोन रिंग रोड आणि चांदणी चौकाला जोडणाऱ्या महत्त्वाच्या रस्त्यामुळे होत असलेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नांबाबत या बैठकीत चर्चा झाली. पुण्यातील चांदणी चौकाला ५ महत्त्वाचे रस्ते जोडले जातात. या चौकातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आवश्यक ठिकाणी भुयारी मार्ग व उड्डाणपूल बांधण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

**(लेखक हे दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्राचे उपसंचालक आहेत.)**
**संपर्क : ०९५८२२८२५४१**



# दुर्गांची जोडगोळी



**महाराष्ट्रात जोड किल्ल्यांच्या बांधणीला अंदाजे १३व्या शतकात सुरुवात झाली आणि साधारणतः १७व्या शतकाच्या सुरुवातीला हे काम थांबले. जोड किल्ले आणि त्यांचा वापर हा एका विशिष्ट अशा राजसत्तेने करून घेतला नाही. देवगिरीचे यादव, बहामनी, आदिलशाही, निजामशाही आणि शिवाजी महाराजांचे मराठी साम्राज्य या सर्वांनीच जोड किल्ले बांधले आणि वापरले. नैसर्गिक परिस्थितीचा वापर करून अशा पद्धतीची बांधकामे करून किल्ला बांधण्याचा प्रकार संपूर्ण भारतात मुख्यत्वे महाराष्ट्रातच पाहायला मिळतो.**

**डॉ. सचिन जोशी**

रामचंद्रपंत हे मराठी साम्राज्यात शिवाजी महाराजांचे अमात्य म्हणून काम पाहत होते. शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि त्यानंतर राजाराम महाराजांच्या काळातही त्यांनी स्वराज्यासाठी काम केले. राजाराम महाराजांच्या मुलाच्या (संभाजी दुसरा) आदेशानुसार त्यांनी 'आज्ञापत्र' नावाचा ग्रंथ लिहिला. यामध्ये 'दुर्ग आणि त्यांची व्यवस्था' नावाचे एक प्रकरण त्यांनी लिहिले आहे. मूळ ग्रंथ मोडी लिपीत असून अनेक नामवंत इतिहासतज्ज्ञांनी त्याचे भाषांतर केलेले आहे. 'दुर्ग व त्यांची व्यवस्था' या प्रकरणात रामचंद्रपंत किल्ल्याच्या जागेची निवड, तेथील गरजा, तेथील व्यवस्था, काम करणाऱ्या व्यक्तींच्या जबाबदाऱ्या याबद्दल सविस्तर माहिती सांगतात. या ग्रंथामध्ये त्यांनी नीट विचार करून किल्ल्यांच्या किंवा दुर्गांच्या जोडगळीबद्दल लिखाण केलेले आहे.


रवळ्या-जवळ्या




अंकाई-टंकाई










महाराष्ट्रात अशा प्रकारचे जोड किल्ले किंवा किल्ल्यांच्या जोडगोळ्या वेगवेगळ्या भागात पाहायला मिळतात. उदा. अंकाई – टंकाई, मांगी–तुंगी, साल्हेर – मुल्हेर, रवळ्या–जवळ्या, खांदेरी – उंदेरी, इ. हे सर्व जोडकिल्ले फक्त गिरिदुर्ग या प्रकारातील नसून यात काही जलदुर्ग आणि किनारीदुर्गदेखील आहेत. भुईकोट किल्ल्यांच्या बाबतीत असे जोडकिल्ले असल्याचे चित्र दिसत नाही. महाराष्ट्रात या प्रकारचे जोड किल्ले बांधण्याची परंपरा शिवपूर्व काळापासून चालत आलेली दिसते. अंकाई–टंकाई हे बांधकामाच्या दृष्टिकोनातून सर्वात मोठे आणि महत्त्वाचे गिरिदुर्ग, मनमाड या गावाजवळ बांधलेले आहेत. या किल्ल्यांची बांधणी कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही. अंकाई आणि टंकाई येथील बांधकामे पाहून ते किल्ले देवगिरीच्या यादवांच्या काळात पण अस्तित्वात असावेत असे वाटते. टंकाई किल्ल्यावरील मंदिर निश्चितच यादवकालीन आहे तरी त्या काळात किल्ला असल्याच्या खुणा, म्हणजे यादवकाळातील तटबंदीच्या बांधकामाचे अवशेष मात्र दिसत नाहीत. अंकाई आणि टंकाई दोन्ही किल्ल्यांच्या पोटात लेण्या खोदलेल्या आहेत. अंकाईवर यादवकालीन बांधकामाचे अनेक पुरावे आहेत. या दोन्ही किल्ल्यांच्या मधील खिंडीतदेखील तटबंदी आणि दरवाजे बांधून हे दोन्ही किल्ले एकमेकांना जोडलेले आहेत. हे दोन जोडकिल्ले असले तरी यामध्ये अंकाई हा महत्त्वाचा किल्ला सुरक्षित करण्यासाठी टंकाईचे बांधकाम केले असावे असे स्पष्टपणे दिसून येते. औरंगाबाद ते सुरत या मध्ययुगीन महामार्गावरील हे दोन किल्ले शहाजहानचा सरदार खान खनान याने ई.स. १६३५ साली जिंकले होते.

## गिरिदुर्ग

रवळ्या–जवळ्या किंवा रवळागड–जवळागड या नावाने प्रसिद्ध असलेले दोन गिरिदुर्ग सातमाळच्या रांगेवरील एका पठारावर वसलेले आहेत. या दोन किल्ल्यांवर भव्य बांधकामे नसली तरीही त्या किल्ल्यांचे स्थान अत्यंत मोक्याचे आहे. भौगोलिकदृष्ट्या हे दोन्ही किल्ले ३०० मी. उंच पठारावर विराजमान झाले आहेत. या पठारावर अंदाजे १०० मी उंचीची दोन गिरिशिखरे आहेत. त्यावर शिवपूर्वकाळात अहमदनगरच्या निजामशहाने या दुर्गांची बांधणी केली. हे दोन्ही किल्ले एकमेकांना जोडलेले नाहीत. दोन्ही किल्ल्यांना स्वतंत्र तटबंदी व दरवाजे असून दोन्ही किल्ल्यांवर जाण्याचे मार्ग देखील स्वतंत्र आहेत. अलवर्दीखान या मोगल सरदाराने रवळ्या–जवळ्या हे किल्ले निजामशहाकडून जिंकून घेतले.
इ.स. १६७० च्या सुमारास हे किल्ले शिवाजी महाराजांकडे होते.

## जोड्या सर्वत्र

महाराष्ट्रात अशा किल्ल्यांच्या जोड्या फक्त घाटावर किंवा पठारी भागातच आहेत असे नाही तर कोकणातील समुद्रकिनाऱ्यावर आणि समुद्रातील बेटांवर अशाच किल्ल्यांच्या जोड्या दिसतात. उदा. खांदेरी–उंदेरी, भरतगड–भगवंतगड, सर्जेकोट–राजकोट, जयगड–विजयगड, ई.

कोकणातील हे जोडकिल्ले प्रत्येकवेळी एकाच राजसत्तेकडे असायचेच असे नाही. खांदेरी हा किल्ला महाराजांनी मुंबईच्या समोरील बेटावर बांधला तेव्हा लगेच जवळच्या छोट्या बेटावर जंजिरेकर सिद्दीने उंदेरी नावाचा किल्ला बांधला. जयगड आणि विजयगड हे किल्ले शास्त्री नदीच्या खाडीच्या मुखावर बांधले गेले पण मुख्य किल्ला हा जयगड असून त्याच्या संरक्षणासाठी विजयगड हा नदीच्या पलीकडच्या तीरावर उभा केला. सर्जेकोट आणि राजकोट हे दोन छोटे किनारीदुर्ग, सिंधुदुर्ग या महत्त्वाच्या किल्ल्यांच्या रक्षणासाठी बांधले गेले. अशाच प्रकारे रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे या बंदरावर कनकदुर्ग व फत्तेहदुर्ग असे दोन किल्ले विजापूरच्या आदिलशाहने बांधले. याचे मुख्य कारण म्हणजे हर्णे बंदर आणि सुवर्णदुर्ग हा किल्ला सुरक्षित करणे. यापैकी फत्तेहदुर्ग सध्या पूर्णपणे अतिक्रमणाच्या वेढ्यात गेला असून किल्ला असल्याचा कोणताही पुरावा आज तेथे दिसत नाही.

नाशिक जिल्ह्यात साल्हेर–सालोटा, मुल्हेर–मोरा, कोळदेहेर–राजदेहेर, अशा किल्ल्यांच्या अनेक जोड्या दिसतात. यापैकी मुल्हेर– मोरा यामधील अंतर जास्त नसून एका तटबंदीयुक्त भिंतीने हे दोन्ही किल्ले जोडलेले आहेत. वाघांबे गावासमोर एक खिंड असून त्याच्या एका बाजूला साल्हेर आणि दुसरीकडे सालोटा आहे. कोळदेहेर आणि राजदेहेर हे दोनही स्वतंत्र किल्ले चांदवडजवळ आहेत. या दोघांमध्ये अंतर जास्त नसले तरीही दोन्ही किल्ले वेगवेगळ्या डोंगरावर बांधले आहेत. सातारा जिल्ह्यात चंदन–वंदन हे दोन प्रसिद्ध गिरिदुर्ग किकली या गावाजवळ आहेत. यांचीदेखील बांधणी आदिलशाहने केली होती. यांचेदेखील वैशिष्ट्य हेच आहे की, खिंडीच्या एका बाजूला चंदन आणि दुसऱ्या बाजूला वंदन किल्ला आहे.

**(लेखक हे डेक्कन महाविद्यालयात पुरातत्व विभागात संशोधक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**

अंकाई–टंकाई मंदिर



मुल्हेर मोरा



साल्हेर सलोटा



# माहेरचा गोडवा 'भोंडला'

**घरोघरी असणारी गणेशोत्सवाची लगबग संपली की, महाराष्ट्राला वेध लागतात ते आश्विन महिन्याचे. दसरा दिवाळी घेऊन येणारा हा महिना. पावसाळ्याने नुकताच काढता पाय घेतलेला असला, तरीही वाऱ्यावर अजूनही ओला हिरवा सुगंध टिकून असतो. अशा या नवरात्रीबरोबरच गावोगावी रंगतात ती भुलाबाई, भोंडला किंवा हादग्याची गाणी.**

**कीर्ती पांडे**

भोंडला, हादगा, भुलाबाई ही नावे वेगवेगळी असली तरी साजरे होतात ते लेकीबाळींच्या आनंदासाठीच. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून कोजागिरी पोर्णिमेपर्यंत महाराष्ट्राच्या गावोगावी मुली भोंडला, हादगा किंवा भुलाबाईची गाणी म्हणतात. प्रांतपरत्वे नावे बदलत असली तरी मूळचा हा एकच सण किंवा व्रत असले पाहिजे, असे वाटते.



विदर्भ, खानदेशात या दिवसात शंकर पार्वतीची मातीची मूर्ती स्थापन करतात. या मूर्तीलाच भुलाबाई म्हणतात. मुली आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून कोजागिरीपर्यंत रोज संध्याकाळी एकमेकींच्या घरी जमून आळीपाळीने भुलाबाईची गाणी म्हणतात. गाणी संपली की, खिरापत आणा अशी तालासुरात मागणी करतात. जे भुलाबाई तेच भोंडला किंवा हादग्याचे. फरक एवढाच की यामध्ये मातीच्या मूर्ती नसतात. पाटावर रांगोळीने हत्ती काढतात आणि त्याची पूजा करून मुली गाणी म्हणत या हत्तीभोवती फेर धरतात. वाढत्या दिवसाबरोबर गाणी आणि खिरापतींची संख्या वाढत जाते. मला वाटते मूळचे हे एक व्रत असावे स्थानपरत्वे आणि कालपरत्वे त्यात बदल होत गेले. विदर्भात बोलीभाषेत कोजागिरी पोर्णिमेला भोडणी पोर्णिमा असेही नाव आहे. या भोडणीपासूनच भोंडला झाला असावा, असे म्हणण्याला वाव आहे. हादग्याचा संबंध हत्तीशी जोडला आहे. शेती हाच मुख्य व्यवसाय असलेल्या महाराष्ट्रात पावसाला सर्वाधिक महत्त्व आहे. पुरेसा पाऊस पडला तर शेती–भाती पिकून संपन्नता येते. त्यामुळेच पाऊस देणारी नक्षत्र त्याला जवळची वाटतात. हस्त नक्षत्रातला पाऊस शेतीला त्रासदायक समजला जातो, त्यामुळे त्याला प्रसन्न करण्यासाठी हत्तीप्रमाणे त्याची पूजा बांधली जात असावी. त्यालाच नाव मिळाले हादगा.

विश्वकोशातील उल्लेखानुसार काही ठिकाणी हादगा खेळताना मुली अगस्तीच्या झाडाची फांदी मध्ये ठेवून त्याभोवती फेर धरतात. अगस्तीच्या झाडाला दुसरे नाव हादगा आहे हे येथे उल्लेखनीय. अगस्ती ऋषींच्या स्मरणार्थ ही पूजा केली जात असावी असेही यामुळे वाटते. कारण अगस्ती ऋषींना एकूणच दक्षिणेमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. गावोगावी होणाऱ्या मुलींच्या व्रतांची गाणी सगळीकडे जवळपास सारखी आहेत. काही थोडी गाणी प्रांताप्रमाणे बदलताना दिसतात, ही गाणी म्हणजे खरंतर श्रुती लोकवाङ्‌मय म्हणायला पाहिजे. लिखित स्वरूपात आढळत नसली तरी आई–काकीकडून, लेकीकडे आणि लेकीकडून पुन्हा पुढच्या पिढीला अशी वारसारूपाने मिळत आली आहेत. सासरच्या व माहेरच्या आठवणींनी, दैनंदिन जीवनातील घटनांनी ओतप्रोत भरलेली ही गाणी स्त्रीजीवनाचे मार्मिक वर्णन करतात कदाचित यामुळेच ती प्रत्येक पिढीतील स्त्रीला आपलीशी वाटत आली आहेत. बोलीभाषेनुसार या गाण्यांमध्ये मूळ संकल्पना तीच ठेवून बदल करता येतात आणि ते बदल गाता गाता करता येतात हे या गाण्यांचे वेगळेपण म्हणता येईल.

माहेर–सासर हा फरक, सासरच्या जबाबदाऱ्या, वागण्याची पद्धत, रीतीभाती यांचे शिक्षण मुलींना सासरी जाण्यापूर्वी मिळावे यासाठी भोंडला या प्रकाराची योजना असावी असेही म्हणता येईल. कारण भोंडला सोळा वर्षांपर्यंत करावा अशी प्रथा असावी किंवा तसा तो मांडला जात असावा. असे वाटण्याला कारण आहे ते भोंडल्याच्याच एका गीताचे. या गाण्यात मुली म्हणतात..

***पड पड पावसा थेंबाथेंबी ।***
***थेंबोथेंबी अलव्या लोंबती ।।***
***अलव्या लोंबती अंकणा ।***
***अंकणा तुझी सात कणसं***
***भोंडल्या तुझी सोळा वर्ष ।।***

पूर्वी लग्न बालवयात होत असल्याने, लग्नापर्यंत मुली भोंडला, भुलाबाई खेळत असाव्यात. या गाण्यामधून सासरच्या एकूणच नात्यांना मनसोक्त नावे ठेवलेली आढळतात. भोंडला आणि भुलाबाईचे एक सर्वमान्य गाणं म्हणजे ..

***दारी उभं कोण गं,***
***दारी सासरे आले गं***
***सासऱ्यांनी काय***
***आणलं गं***
***सासऱ्यांनी आणला***
***बांगड्यांचा जोड***
***बांगड्यांचा जोड***
***मी घेत नाही***
***सांगा मी येत नाही***
***चारी दरवाजे***
***लावा गं बाई***
***झिपरं कुत्रं सोडा गं बाई***

या गाण्यात एकेक करून सासू–सासरे,



दीर, जावा, नणंद येतात. येताना वेगवेगळे दागिने सुनेला खूश करण्यासाठी आणतात पण ती 'मी येत नाही' म्हणून सांगते आणि वर झिपरं कुत्रही सोडायला सांगते. पण तेच नवरा आल्याबरोबर तो फक्त कुंकवाचा करंडा घेऊन आला तरी जायला तयार होते. खूप गाणी थोड्याफार फरकाने म्हटली जातात. पूर्वी माहेरी उठसूठ जाता यायचे नाही. माहेरून कुणी येईल तेव्हाच जायचे, किती राहायचे वगैरे खूप बंधने होती. त्यामुळे मग या स्त्रियांच्या कल्पनेच्या साम्राज्यात या सगळ्या नात्यांचा राग आणि 'मी पण येत नाही जा' म्हणण्याचा अधिकार ती गाजवू पाहते. असेच सर्वत्र म्हटले जाणारे गाणे म्हणजे 'कारल्याचे बी पेर गं सूनबाई' सुनेचे माहेरी जाणे किती म्हणून फालतू गोष्टींनी लांबवता येईल याचे हे उदाहरण आहे. शेवटी सांगायला काहीच कारण उरत नाही तेव्हा विदर्भातील थोडी उदार मनाची सासू नाइलाजाने म्हणते 'आणा फणगर, घाला वेणगर' जाऊ द्या सुनगर माहेरा, भोंडल्याच्या गाण्यात ती म्हणते 'आण काठी लाग पाठी' म्हणजे माहेरचा विषय संपला.

अशी कित्येक गाणी या खेळामध्ये म्हटली जातात. माहेरच्या सुबत्तेने ओतप्रोत भरलेली, सासरची उणीदुणी काढणारी, त्यासाठी अतिशयोक्त वर्णन करणारी ही गाणी मनोरंजक आहेत.

भोंडल्याच्या वेळी म्हटले जाणारे गाणे म्हणजे 'दमडीचं तेल आणलं' हे अतिशयोक्तीचे एक मोठे उदाहरण आहे. दमडीच्या तेलात सासुबाईचं न्हाणं, दिराची शेंडी वगैरे गोष्टी होऊन उरलेलं तेल सोडून त्याचा लोट वाहिला तोही पार वेशीपर्यंत.

माहेरचे कौतुक असावे म्हणजे किती. 'नदीच्या पलीकडे राजा पेरला बाई,' या गाण्यात तिला शेवटी विंचू चावतो तो उतरवायला आधी सासरचा वैद्य येतो, त्याचे वर्णन ती अगदी 'भिकाऱ्यावाणी' असे करते. त्याच्या औषधाने विंचू उतरण्याचा प्रश्नच नाही. त्यामुळे मग माहेरचा वैद्य बोलावतात. तो दिसतो ही 'राजावाणी' आणि विंचूही पटकन उतरवतो. विंचू चावण्याच्या भयंकर





वेदनांपलीकडेही ही सासर-माहेरची वेदना आहे हे येथे उल्लेखनीय.

ही गाणी खूप जुनी अगदी पुरातन म्हणता येतील अशी असली पाहिजेत असे वाटते. कारण या गाण्यांची भाषा, त्यांचे शब्द खूप जुने आहेत. कालौघात काही काही संकल्पनाच समाजातून नष्ट झाल्या आहेत, जसे 'मूळ येणे' या शब्दाचा अर्थ पटकन कळत नाही. मूळ येणे म्हणजे मूड येणे नाही तर बोलावणे येणे. मूळ आले म्हणजे माहेरून कुणीतरी बैलगाडी, पालखी वगैरे घेऊन घ्यायला येत असे आणि मग सुना सगळ्यांची परवानगी घेऊन माहेरी जात किंवा नाही म्हटले तर आतल्या आत मुसमुसत राहत अशा कित्येक संकल्पना आता नाहीत किंवा थोड्या प्रमाणात टिकून आहेत.

दुसरे म्हणजे ही गाणी एकूणच म्हटली जात असल्यामुळे काही विसरले गेले, काही शब्द वेगळेच घातले गेले यामुळे या गाण्यांचे मूळ स्वरूप बदलले असावे असे वाटते. याशिवाय काही तात्कालिक घटना प्रतीकात्मक रीतीने गुंफण्यात आल्या असाव्यात ज्यांचे आता संदर्भ लागत नाहीत याचे उदाहरण द्याचे तर भुलाबाई आणि भोंडल्याचे एक सर्वमान्य गाणे म्हणजे..

***एचढीशी गंगा झुळू झुळू वाहे***
***तांब्या पितळी झळकत जाय***
***तांब्या पितळी न्हाय गं, हिरवी टोपी ल्याय गं***
***हिरवी टोपी हरपली***
***सर्पाआड लपली***
***सरपदादा एकला, जाई आंबा पिकला***
***जाई नव्हे जुई नव्हे***
***चिंचा खालची राणूबाई***
***चिंचा तोडीत जाय गं, शंभर पाने खाय गं***
***खाता खाता रंगली***
***तळयात घागर बुडाली***

असं हे गाणं थोडाफार फरक असला तरी बरचसं साम्य या भुलाबाईच्या आणि भोंडल्याच्या गाण्यात आहे पण त्याचा अर्थ लागत नाही. हिरवी टोपी म्हणजे काय, सर्पाआड कोण किंवा काय लपलं किंवा लपवलं, राणूबाई कोण वगैरे गोष्टींचा थांग लागत नाही. या साऱ्यामुळे ही गाणी काहीशी दुर्बोध वाटतात. तरीही या गाण्यांची लय, नातेसंबंधातील वीण, त्यांचे सहजपण, यामुळे ही गाणी तोंडात सहज रुळतात, आपलीशी वाटतात. आता शहरात भुलाबाई, भोंडला प्रकार बराचसा बंद झाला आहे. गावखेड्यांमध्येही प्रमाण कमी झाले आहे. याचे कारण म्हणजे आपली बदललेली जीवनशैली हेही आहे. तरीही असं वाटतं की तो एक सांस्कृतिक वारसा आहे. त्याचे जतन आपल्याकडून झाले पाहिजे. याच गाण्यात कालानुरूप थोडे बदल करता येतील, याशिवाय आजचे प्रश्न आणि त्यावरची उत्तरंही गाण्यातून गुंफली तर ती गाणी आजच्या मुलींनाही आपलीशी वाटतील. आता काही महिला मंडळ एक दिवस भोंडला वगैरे खेळताना दिसतात. मनावरच्या ताणाचा निचरा करण्यासाठी गाणी म्हणणे फेर धरणे याचा चांगला उपयोग होतो असेही लक्षात आले आहे. आपले हे लोकवाङ्मय या आधुनिक काळातही जतन करू शकलो तर यासारखे उत्तम कार्य नाही.

**(लेखिका महाराष्ट्र अहेडच्या संपादिका आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९५९४९४४८००**

# यशाला गवसणी

संघ लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससीच्या) परीक्षेची तयारी करत असताना सर्वप्रथम तिची व्याप्ती लक्षात घेणे आवश्यक असते. अभ्यासक्रम समजून घेऊन तयारी केली तर चांगले गुण मिळवता येतात. शिवाय केवळ अभ्यास एके अभ्यास, घोकंपट्टी करण्यापेक्षा दर्जेदार अभ्यास करण्यावर भर द्यावा. १०-१५ तासांपेक्षा एकाग्रतेने केलेला ४-५ तास अभ्यासही पुरेसा ठरू शकतो. थोडक्यात सांगायचे झाले तर अभ्यासात एकाग्रता हवीच. काही विद्यार्थी वेळ अजिबात वाया घालवायचा नाही म्हणून मित्रांना भेटणे, कुटुंब-नातेवाइकांशी बोलणे आदी गोष्टी टाळतात व तासनतास वाचत बसतात. त्यात एकाग्रता असेल तर चांगलीच गोष्ट आहे. परंतु एकाग्रता नसेल तर मन प्रसन्न करण्यासाठी

**आयबीएम सारख्या बहुराष्ट्रीय कंपनीत गलेलठ्ठ पगाराची चांगली नोकरी आणि पुढे विदेशात काम करण्याची संधी असलेला एक अभियंता, आपल्या क्षमतांचा खासगी कंपनीपेक्षा जनसामान्यांना अधिक फायदा व्हावा या उद्देशाने यूपीएससीकडे वळला. या परीक्षेच्या माध्यमातून 'आरबीआय'मध्ये व्यवस्थापकही झाला. परंतु ध्येयावर ठाम राहत अभ्यासातील सातत्य व एकाग्रतेच्या जोरावर आयएएस होण्याचे स्वप्न त्याने या वर्षी पूर्ण केले. हा युवक म्हणजेच भंडारा जिल्ह्यातील तुषार गजानन निखारे. श्री. निखारे यांना ४२५ वी रँक मिळाली असून सिक्कीम केडर मिळाले आहे. त्यांच्या यशाचे गमक व यूपीएससी परीक्षेत यश मिळविण्याची सूत्रे त्यांच्याच शब्दांत...**



**तुषार निखारे**
भा.प्र.से., केडर - सिक्कीम

मित्रांसोबत जोडलेले राहणे, एखादा चित्रपट पाहावा वाटल्यास तो पाहणे आदी गोष्टी करायला हव्यात. मित्र-कुटुंबाला दूर ठेवून या परीक्षेची तयारी करणे माझ्या दृष्टीने तितकेसे योग्य नाही. कारण ते आहेत म्हणूनच आपल्या असण्याला अर्थ असतो. यश मिळाल्यानंतर आपल्या फेसबुकवर हजारो फ्रेण्ड रिक्वेस्ट येऊन धडकतात. त्यातील अनेकांना आपण ओळखतही नसतो. त्यामुळे या परीक्षेची तयार करत असताना आपल्या जगाशी नाते तोडू नका. कारण तेच वेळोवेळी आपले खरे मार्गदर्शक, मन खंबीर करणारे आणि प्रेरणा देणारे असतात.

### यूपीएससीकडे असा वळलो...

दहावीपर्यंतचे शिक्षण मूळ गावी भंडाऱ्यालाच झाले. वडील ज्युनियर लेक्चरर तर आईचे छत्र दहावीला असतानाच हरवले. मात्र मावशीने आम्हा दोन भावंडांना आई आठवू दिली नाही. आमच्या प्रत्येक अडचणीत ती खंबीरपणे आमच्या पाठीशी उभी राहिली. नागपूर येथे ११-१२ वीनंतर २००३-०७ दरम्यान पुणे येथून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून आयटीमध्ये इंजिनीअरिंग केले. आयबीएम या नामांकित कंपनीसाठी परिसर मुलाखतीत निवड झाली.

कंपनीत रुजू झालो. काही दिवसांनी कंपनीतर्फे नोकरीसाठी नेदरलँडमध्ये जाण्याची संधी समोर चालून आली. परंतु मन कोठेतरी अस्वस्थ होते. आपण देश, समाजाचे काही देणे लागतो परंतु खासगी कंपनीत राहून हे किती शक्य आहे? हा प्रश्न मनात घोळू लागला होता. शिवाय खासगी कंपनीत राहून जनसामान्यांचे प्रश्न सोडवता येणे शक्य नाही, मातीशी नाळ जोडलेली राहणे कठीण आहे याची जाणीव होती. दरम्यान मित्र स्वच्छंद चव्हाण याकडून मला यूपीएससी परीक्षेची माहिती मिळाली. याच काळात अभियांत्रिकीमधील सिनीअर मित्र उदय चौधरी याची आयएएससाठी निवड झाली. त्यामुळे आपणही या परीक्षेत यश मिळवू शकतो असा विश्वास निर्माण झाला. माझ्या आईचीदेखील मी अधिकारी बनण्याची, सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्याची इच्छा होती. त्यासाठी यूपीएससी हाच राजमार्ग असल्याचे पटले आणि तयारीला लागलो.

### अभ्यासातील सातत्य

फेब्रुवारी २००८ मध्ये मी पहिला अटेम्ट दिला. यश मिळाले नाही. परंतु यशाच्या बराच जवळ आलो होतो. या परीक्षेची व्याप्ती लक्षात घेतली. पर्यायी विशय समाजशास्त्रवर पकड होती परंतु लोकप्रशासनात थोडा अभ्यास कमी पडला. दुसऱ्या वेळी आपल्या तयारीत काही कमी राहायला नको म्हणून मार्गदर्शन घेण्यासाठी दिल्ली गाठली. परिपूर्ण तयारी केली. परंतु पुन्हा दोन वेळा यशाने हुलकाणी दिली. पहिल्या ते तिसऱ्या प्रयत्नात झालेल्या चुकांचा शोध घेतला. त्यावर काम केले. चौथ्या प्रयत्नात यश मिळाले. परंतु आयएएस सेवा मिळू शकली नाही. भारतीय रिझर्व्ह बँकेत मॅनेजर पदासाठी निवड झाली. बँकेत रुजू झालो. परंतु अभ्यासात सातत्य ठेवले. आता द्यायचा तो मास्टरस्ट्रोकच अशी खूणगाठ मनाशी बांधली. नोकरी करून सूत्रबद्ध अभ्यास केला. याचीच फलश्रुती म्हणजे २०१४ च्या परीक्षेत मी यशाची आणखी एक पायरी चढलो. मला ४२५ वी रँक मिळाली. जे ठरवले ते मिळाले. मी आयएएस झालो. दरम्यान मित्रांकडून वेळोवेळी मला बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले. भूषण पाटील, आयएएस ऋषीकेश सोणवणे, अभिजीत राऊत तसेच 'जीएस मिशन' प्रबोधिनी, दिल्ली येथील 'व्हिजन आयएएस' आदींचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

### प्लॅन बी तयार ठेवा

यूपीएससीची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी माझ्या मते दोन प्रयत्नांनंतर करिअरच्या दृष्टीने प्लॅन बी तयार ठेवावा. कारण या परीक्षेत यश मिळेलच याची शाश्वती नसते. आपल्यात आत्मविश्वास असला तरी तो दोन प्रयत्नानंतर कमी होण्याची शक्यता असते त्यामुळे निराशा, अपयशाची भीती या बाबी मनात डोकावू लागतात. शिवाय वयदेखील वाढत असते. त्यामुळे मीदेखील याच मार्गाचा अवलंब केला. नायब तहसीलदार, आरबीआयमध्ये मॅनेजर अशा पोस्ट हाताशी होत्या. हळूहळू यशाला गवसणी घालत गेलो. अनेक उमेदवार दोन-तीन वेळा

मुलाखतीपर्यंत जाऊन येतात मात्र यश मिळत नाही. यात लक फॅक्टरही असते. कधी मुलाखतीचा टोन बिघडू शकतो, कधी मनासारखे पॅनल येत नाही, एखादा प्रश्न–उत्तर मुलाखत नकारात्मकतेकडे घेऊन जाते, असे बरेच काही घडत असते. याचा अर्थ असा होत नाही की, आपण अपयशी झालो किंवा आपण पात्र नाही. परंतु सर्व प्रयत्न संपल्यानंतर आपल्या हातात काहीच राहिले नाही तर आपल्याला खूप मोठ्या मानसिक तणावाला सामोरे जावे लागू शकते. कारण अशा वेळी वयासोबतच कुटुंबीयांच्या अपेक्षाही वाढलेल्या असतात.

या परीक्षेच्या तयारीदरम्यान अनेकजण अगदी मित्रांशी संपर्क तोडतात, लग्नाला उशीर होत असताना लग्न टाळतात. परंतु मी म्हणेन दोन अटेम्टनंतर प्लॅन बी तयार ठेवावा आणि शक्य असेल तर लग्नही टाळू नये. मी तेच केले. मुलीचा पायगुण म्हणण्यास हरकत नाही. शेवटच्या प्रयत्नात आयएएस झालो. आपल्या हातात एखादी पोस्ट असेल तर नोकरी करत वेळात वेळ काढून आपण आत्मविश्वासाने उरलेले अटेम्ट देऊ शकतो. असे केल्यास तणावमुक्ततेमुळे अभ्यासात एकाग्रता येईल. जी आपल्याला यशाकडे घेऊन जाईल.





## यशाची सूत्रे

- **पूर्वपरीक्षेपर्यंत जनरल स्टडी पूर्ण करावा.**
- **पूर्वपरीक्षेनंतर लिखाणावर भर द्या. यामुळे लेखनशैली सुधारेल.**
- **एकाग्रता असेपर्यंतच अभ्यास करा. त्यानंतर गटचर्चा, माहितीपट, मनोरंजनासाठी वेळ देऊ शकता.**
- **मुलाखत इंग्रजीत देण्याचा प्रयत्न करा. पुढेही व्यवहारात इंग्रजीचा वापर होणार असल्याने ती विकसित करा.**
- **सर्वच पुस्तके वाचल्यापेक्षा त्यातील महत्त्वाचे टॉपिक वाचून स्वत:च्या नोट्स काढा, उजळणीसाठी अधिक वेळ जाणार नाही.**


## मुलाखतीची तयारी

बहुतेक उमेदवार मुख्य परीक्षेनंतर मिळालेल्या कालावधीत झपाटून मुलाखतीच्या तयारीला लागतात. परंतु मुलाखतीला एवढे गंभीर होण्यापेक्षा आपण जे आहोत त्याविषयी प्रामाणिक राहिलो तर मुलाखतीची अर्धी तयारी येथेचे होते. मुलाखत ही आपल्या व्यक्तिमत्त्वाची चाचणी असते. मुलाखतीमध्ये आपण आतापर्यंत ज्या वातावरणात वाढलो, जे शिकलो, जी कौशल्ये अवगत केली त्याविषयीचे आपले सामान्यज्ञान, जाणिवा तपासल्या जातात. थोडक्यात सांगायचे झाले तर बायोडाटा आणि थोड्याफार चालू घडामोडींच्या पलीकडे मुलाखतीत काही नसते. चालू घडामोडी वाचत असताना तुम्ही त्या ठिकाणी असता तर काय केले असते असा स्वत:ला प्रश्न करून आत्मचिंतन करावे. मुलाखत ही फक्त आपल्या व्यक्तीमत्त्वाची चाचणी असते. त्यामुळे आपला बायोडाटा आपल्याला अडचणीत आणणार नाही याची काळजी घ्यावी. जे आपल्याला येते, जे महत्त्वाचे आहे तेवढाच त्यात उल्लेख करावा. मुलाखतीत भंपकपणा मुळीच नसावा. जे आहे तेच असाचे. उत्तरे प्रामाणिक असावी म्हणजे झाले. शिवाय मुलाखत इंग्रजीमध्ये देता आली तर उत्तमच. कारण मराठीत मुलाखत द्यायची म्हटले तर आपली उत्तरे भाषांतरित करून सांगणारा योग्यप्रकारे सांगू शकेलच असे नसते. त्यामुळे डायरेक्ट कम्युनिकेशनसाठी इंग्रजीत मुलाखत देण्याचा निर्णय घेतला, तर स्वत:ला आणखी चांगल्या प्रकारे व्यक्त करू शकाल. यासाठी अस्खलित इंग्रजी यायला हवी असेही नाही. फक्त आपल्याला जे काही म्हणायचे आहे ते स्पष्टपणे सांगणे आवश्यक असते.

## लिखाणाचा सराव महत्त्वाचा

अभ्यासक्रम खूप मोठा असल्याने तो समजून अभ्यास करावा. पूर्वपरीक्षेनंतर लिखाणाचा अधिक सराव करावा. कारण मुद्देसूद आणि समर्पक लिहिणे मुख्य परीक्षेत खूप महत्त्वाचे असते. यासाठी जेवढा लिखाणाचा सराव करता येईल तेवढा तो करावा.

**शब्दांकन : राजाराम देवकर**




# बोल अनुभवाचे

**दिलखुलास कार्यक्रमात शेतकरी प्रभाकर सावे, (बोर्डी, जि. पालघर) यांनी कृषी पर्यटन, भक्ती आंब्रे आणि अंकिता मयेकर यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेत पॉवर लिफ्टिंग या क्रीडा प्रकारात रौप्य आणि कास्य पदक प्राप्त झाल्याबद्दल माहिती दिली. जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी रुबल अग्रवाल यांनी बेटी बचाओ बेटी पढाओ या डिजिटल गुड्डा-गुड्डी बोर्ड आणि जलयुक्त शिवार अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीची माहिती दिली. जळगाव जिल्ह्यातील पातोंडा येथील प्राथमिक केंद्राला आय.एस.ओ. मानांकन प्राप्त झाल्याबद्दल वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद सोनावणे यांनीही महत्त्वपूर्ण माहिती दिली.**

### श्रीमती रुबल अग्रवाल, जिल्हाधिकारी, जळगाव

'बेटी बचाओ बेटी पढाओ' या अभियानांतर्गत डिजिटल गुड्डा-गुड्डी बोर्डाची स्थापना केली. डिजिटल इंडिया वीक सुरू असताना या पर्यावरण पूरक उपक्रमाची अंमलबजावणी केली. यासाठी फेसबूक पेजही तयार केले. डिजिटल गुड्डा-गुड्डी बोर्डाची केंद्र सरकारने दखल घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच केंद्रीय महिला आणि बाल कल्याण मंत्री, मनेका गांधी यांनी या बोर्डाचा वापर देशातील मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठीच्या महत्त्वपूर्ण मोहिमेत केला.

याबरोबरच जळगाव जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नाला बांधणी, विहीर पुनर्भरण तसेच तलावातील गाळ काढून जलयुक्त शिवार अभियानाची यशस्वी अंमलबजावणी केली. या अभियानातून सूक्ष्म सिंचन पद्धती उपयोगात आणल्या आहेत. २३२ गावात सूक्ष्म सिंचन पद्धतीच्या उपकरणांचे वाटप होत आहेत. जळगाव जिल्ह्याला या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर यश लाभले आहे.

### भक्ती आंब्रे आणि अंकिता मयेकर, आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टर

आशियाई क्रीडा स्पर्धेत पॉवर लिफ्टिंग या क्रीडा प्रकारात रौप्य आणि कास्य पदक विजेत्या खेळाडू भक्ती आंब्रे आणि अंकिता मयेकर यांनी आपला संघर्ष उलगडला. भक्ती आंब्रे म्हणाल्या, घरसंसार सांभाळून मी या क्रीडा प्रकारासाठी वेळ दिला. नियमित व्यायाम, सराव केला आणि कुटुंबाचा आधार मिळाला. अंकिता मयेकर म्हणाल्या, माझ्या यशामध्ये आईचा तसेच प्रशिक्षकांचा मोठा वाटा आहे. याबरोबरच व्यायाम, ऑफिस, सराव, मानसिक आणि शारीरिक स्वास्थ टिकवून ठेवण्यासाठी योग साह्यभूत ठरले. पॉवर लिफ्टिंग या क्रीडा प्रकारात विविध संधी आहेत. याकडे लक्ष देऊन आवडीप्रमाणे आपल्या क्रीडाप्रकारात यश संपादन करता येते. युवकांनी कोणत्याही स्पर्धेत सहभाग घ्यावा. मेहनतीशिवाय काहीही मिळत नाही. ध्येय, जिद्द, चिकाटी आणि प्रशिक्षणाच्या आधारे हे यश मी संपादन करू शकले.

### प्रभाकर सावे, प्रयोगशील शेतकरी

शेतकऱ्यांना कृषी पर्यटन हा व्यवसाय समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या व्यवसायाबरोबरच शेतीला सन्मानाचे वलय प्राप्त करून देणारा आहे. पर्यटकांना आनंद देणे हे आमचे कर्तव्य. याबरोबरच शेतावर येण्याचा वेगळा अनुभव, शेतीवर राहण्यात सुरक्षिततेची हमी, आपुलकी, आरोग्यविषयक काळजी घेणे, वेळेवर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे आणि कोणत्याही वेळेला सहज उपलब्ध होणे या व्यवसायात आवश्यक आहे. शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कृषी संस्कृती जपणाऱ्या विविध वस्तू सावे यांच्या फार्मवर पाहायला मिळतात. सावे फार्म राज्यातील शेतकऱ्यांना नक्कीच मार्गदर्शक ठरणार आहे. शेतकऱ्यांचा, शेती पर्यटनात मानवी चेहरा असलेला हा व्यवसाय आहे. माणुसकीचा ओलावा कुटुंबीयांकडून देण्याचा प्रयत्न, ग्राहकाऐवजी पाहुण्यांसारखी वागणूक दिली जावी यासाठी आपला प्रयत्न आहे.

### डॉ. प्रमोद सोनावणे

राज्यातील जनतेला ग्रामीण भागापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा देण्याचे काम चाळीसगाव तालुक्यातील पातोंडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात केले जात आहे. या प्राथमिक आरोग्य केंद्रात दिल्या जाणाऱ्या दर्जेदार आरोग्य सेवांची गुणवत्ता पाहून पातोंडा प्राथमिक आरोग्य केंद्राला आयएसओ ९००१-२००८ हे मानांकनही नुकतेच प्राप्त झाले. या आरोग्य केंद्रात दिल्या जाणाऱ्या २४७ गुणवत्तापूर्ण सेवा, स्वच्छ परिसर, परिसरात केलेले वृक्ष संगोपन, अभिलेख्यांचे उत्तम जतन यासारख्या प्रभावी उपाययोजनांमुळे पातोंडा प्राथमिक आरोग्य केंद्राला हे मानांकन मिळाले आहे. याच प्राथमिक आरोग्य केंद्राला २०१३-१४ चा राज्य शासनाचा डॉ. आनंदीबाई जोशी आदर्श प्राथमिक आरोग्य केंद्र पुरस्कारही मिळाला आहे. ही माहिती प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रमोद सोनावणे यांनी दिलखुलास कार्यक्रमात दिली.

**– मीरा ढास**


**रुबल अग्रवाल**
(जिल्हाधिकारी, जळगाव)


**भक्ती आंब्रे**
(आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टर)


**अंकिता मयेकर**
(आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टर)


**प्रभाकर सावे**
(प्रयोगशील शेतकरी)


**डॉ. प्रमोद सोनावणे**
(वैद्यकीय अधिकारी)

सात शतके लोकप्रियतेची...

जय महाराष्ट्र

# सर्वांगीण आढावा

**सप्टेंबर महिन्यात शिक्षक दिन, सायबर गुन्हेगारी, पुरातत्त्व विभाग, मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्ष अशा सर्वांगीण विषयांचा आढावा जय महाराष्ट्र कार्यक्रमात घेण्यात आला. त्यात मुख्यमंत्री वैद्यकीय कक्ष प्रमुख ओमप्रकाश शेटे, शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षिका शोभा नाखरे, अतुलचंद्र कुलकर्णी, सहपोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांना आमंत्रित करण्यात आले होते. जय महाराष्ट्र कार्यक्रमाचा प्रत्येक भाग हा माहितीपूर्ण व प्रत्येकाने पाहावा असा ठरला.**

**ओमप्रकाश शेटे, मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्ष प्रमुख**

अनेक दुर्धर आजारांवरील रुग्णांना दिलासा मिळावा यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षामार्फत आर्थिक मदत करण्यात येते. मुख्यमंत्री सचिवालयात यासंदर्भात मदत मिळण्यासाठी असंख्य अर्ज प्राप्त होत असतात. तथापि, या आजारांव्यतिरिक्त जीवितास गंभीर धोका असलेले आजार/ गंभीर अपघातातील अनेक रुग्ण असतात. या अनुषंगाने अशा रुग्णांना जीव गमवावा लागू नये, म्हणून उपचाराकरिता त्यांना तत्काळ साह्य देण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्ष स्थापन केला आहे. या कक्षाची कार्यपद्धती राज्यातील जनतेला होणारा फायदा याविषयी मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाचे प्रमुख ओमप्रकाश शेटे यांनी माहिती दिली.

**अतुलचंद्र कुलकर्णी, सहपोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई**

माहिती तंत्रज्ञानाचा आपल्याला जसा फायदा होत आहे, तसे त्याचे दुष्परिणामही पाहायला मिळत आहेत. सायबर गुन्हेगारी हा त्यापैकीच एक प्रकार. आपल्याकडूनच सर्व माहिती विचारून आपल्या ऑनलाइन बँक खात्यातून नकळतपणे पैसे काढले जातात आणि आपल्याला त्याचा पत्ताच लागत नाही. या प्रकाराला सायबर गुन्हेगारी असे म्हणतात. सर्वसामान्य माणूस अलगदपणे या सायबर गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकतो. त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी तसेच सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस करीत असलेल्या प्रयत्नांविषयी जाणून घेण्यासाठी मुंबईच्या गुन्हे विभागाचे सहपोलीस आयुक्त अतुलचंद्र कुलकर्णी यांना आमंत्रित करण्यात आले होते. सायबर गुन्हेगारी म्हणजे काय यापासून ते फिशिंग या प्रकाराविषयीची सर्व माहिती त्यांनी दिली.

**संजीव गलांडे (ज्येष्ठ शास्त्रज्ञ, आयसर, पुणे)**

पर्यावरणाचा मोठा परिणाम मानवी जनुकांच्या कार्यावर होत असतो. हा परिणाम नेमका काय असतो हे अभ्यासण्याचे शास्त्र म्हणजे 'एपिजेनेटिक्स'. पुण्यातील 'आयसर' या संस्थेमध्ये कॅन्सर, मधुमेह या आजारांसाठी या शास्त्राच्या मदतीने पर्सनलाइज्ड मेडिसिन देण्यावर संशोधन सुरू आहे. त्यासाठी डॉ.संजीव गलांडे विशेष प्रयत्न करीत आहेत. नुकतेच त्यांना प्रतिष्ठित जी.डी. बिर्ला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. श्री. गलांडे यांनी सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत एपिजेनेटिक्स तसेच पुण्यातील आयसर या संस्थेची माहिती दिली.

**शोभा नाखरे, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षिका**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस सर्वत्र शिक्षक दिवस म्हणून उत्साहात साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून कर्णबधीर मुलांसाठी कार्य करणाऱ्या राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित शिक्षिका श्रीमती शोभा नाखरे यांना आमंत्रित करण्यात आले होते. एखादे व्यंग किंवा अपंगत्व आले की माणसे नाऊमेद होतात, खचून जातात. मात्र, त्यावर प्रचंड इच्छाशक्ती आणि जिद्दीच्या बळावर मात करता येते हा संदेश श्रीमती नाखरे आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी दर्शकांना दिला.

**भालचंद्र कुलकर्णी, साहाय्यक संचालक, पुरातत्त्व विभाग**

महाराष्ट्राला पुरातत्व वास्तूंची समृद्ध परंपरा लाभली आहे. या पुरातत्त्व वास्तूंचे जतन व संवर्धन करण्याचे काम पुरातत्त्व विभागाकडून केले जाते. विभागाची सर्वसामान्यांना माहिती व्हावी, त्यांचे कार्य समजून घेता यावे, यासाठी पुरातत्त्व विभागाचे साहाय्यक संचालक भालचंद्र कुलकर्णी यांना आमंत्रित करण्यात आले होते. शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे नेमके कार्य, गडकिल्ल्यांचे प्रकार व त्यांचे ऐतिहासिक महत्त्व, किल्ल्यांचे संवर्धन, जतन करताना येणाऱ्या अडचणी, पुरातत्त्व संकेत आदी विषयांची माहिती त्यांनी दिली.

**– अतुल पांडे**



**ओमप्रकाश शेटे**
(मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्ष प्रमुख)




**अतुलचंद्र कुलकर्णी**
(सहपोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई)



**संजीव गलांडे**
(ज्येष्ठ शास्त्रज्ञ, आयसर, पुणे)



**शोभा नाखरे**
(राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षिका)



**भालचंद्र कुलकर्णी**
(साहाय्यक संचालक, पुरातत्त्व विभाग)




# नोकरीशोधा ते करिअरनामा

सात वर्षांत 'महान्यूज' ने कालानुरूप काही बदल केले. 'नोकरी शोधा' या सदरातून विविध रोजगारांच्या संधींची माहिती देण्यात येते. याच्या जोडीला आता विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक-युवती आणि वेगवेगळ्या क्षेत्रात करिअर करणाऱ्या युवकांना समोर ठेऊन 'करिअरनामा' हे नवीन सदर चालू केले आहे. या सदरामध्ये विविध क्षेत्रातील करिअरची माहिती देण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये विविध क्षेत्रात करिअरच्या संधी कशा असतात, तसेच कोणते अभ्यासक्रम केल्यास कशी संधी मिळते याविषयी थोडक्यात माहिती देण्यात येते.

**'महान्यूज' या वेबपोर्टलची निर्मिती १९ सप्टेंबर २००८ ला झाली. महान्यूज ज्यांच्या कल्पनेतून साकारले त्या तत्कालीन माहिती महासंचालक व सध्याच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्या मार्गदर्शनाखाली या वेबपोर्टलने नुकताच आपला सात वर्षांचा प्रवास पूर्ण केला.**

या सदरात केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असणाऱ्या विविध क्षेत्रातील सार्वजनिक कंपन्या व त्यातील युवकांना करिअर करण्याची असलेली संधी याबद्दलची माहिती देण्यात येते. आतापर्यंत यामध्ये उज्ज्वल उद्याची संधी, समाज कार्यात करिअरची संधी, प्रकाशन व्यवसायात एक सुवर्णसंधी !, भारत पेट्रोलियम : करिअरची संधी, मुंबई विद्यापीठ : दूर शिक्षणाची संधी, एलआयसी : स्कॉलरशिपची संधी, एमडीएल : करिअरची संधी, विकलांग विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय विदेश शिष्यवृत्तीची संधी, भारतीय आरमार : करिअरच्या संधी,आता असणार एकच सीईटी !, अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना : शैक्षणिक कर्ज योजना, महाराष्ट्र लोकसेवा आयोग : प्रशासकीय सेवेत येण्याची संधी या लेखाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

महान्यूज या वेबपोर्टलच्या विविध सदरात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, लेखक, पत्रकार यांना लेखन करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या माध्यमातूनही त्या-त्या विषयांची माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नाशिक येथील कुंभमेळा याविषयी 'सिंहस्थ संवाद' या सदरामधून त्याचे महत्त्व, प्रशासनाने केलेली तयारी व अन्य माहिती देण्यात आली आहे. गेल्या सात वर्षांपासून या वेबपोर्टलच्या माध्यमातून जनतेला तत्काळ माहिती उपलब्ध करून देण्याचे कार्य चालू आहे. बातम्या तसेच विविध सदरांच्या बरोबरीनेच यातील 'नोकरी शोधा' या सदराला जास्तीत जास्त पसंती मिळते. याच पद्धतीने 'करिअरनामा' याही सदराला पसंती मिळत आहे. महान्यूजच्या स्थापनेपासूनचा सात वर्षांचा प्रवास हा अनेकांसाठी उपयुक्त ठरला आहे. शासनाची भूमिका मांडण्याची जबाबदारी पेलून अखंडपणे सेवा देणाऱ्या महान्यूज वेबपोर्टलचा हा आलेख प्रेरणादायी असाच आहे. महान्यूजच्या यशात सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, महासंचालक चंद्रशेखर ओक, संचालक (माहिती)(प्रशासन) देवेंद्र भुजबळ यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे.




महान्यूजच्या स्थापनेपासून विविध सदरांच्या माध्यमातून सातत्याने उपयुक्त माहिती देण्याचे कार्य या टीममध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाने केले आहे. काळानुसार बदल घडवत महान्यूज आपले हे कार्य असेच सुरू ठेवणार आहे.

**– गजानन पाटील**

# सातबारा वाचनालयात लोकराज्य





सांगली जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या जनतेसाठी आगळेवेगळे वाचनालय सुरू करण्यात आले आहे. या वाचनालयाचे नाव 'सातबारा' असे आहे. या वाचनालयात अनेक उपयुक्त मासिके व पुस्तके ठेवण्यात आली असली तरी येणाऱ्या नागरिकांसाठी खरे आकर्षण लोकराज्य ठरत आहे. या ठिकाणी लोकराज्य मासिक वाचनासाठी स्वतंत्र टेबल उपलब्ध करून देण्यात आले आहे. या टेबलावर लोकराज्यचे विविध अंक वाचनासाठी ठेवण्यात येतात.

या ठिकाणी लोकराज्य मासिकाचे वाचन झाल्यानंतर वाचकाला प्रतिक्रिया देण्यासाठी प्रतिक्रिया नोंदवही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या नोंदवहीमध्ये अनेक मान्यवर व्यक्तींनी या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या असून विशेषत: राज्य शासनाच्या मुखपत्र असलेल्या लोकराज्य मासिकाबद्दल वाचकांनी समाधान व्यक्त केले आहे. लोकराज्यमधून विविध उपयुक्त माहिती मिळते. शासनाने घेतलेले निर्णय कळतात. त्याशिवाय राज्यभर शासनामार्फत जे विविध उपक्रम राबवण्यात येतात त्याचीही माहिती मिळते. लोकराज्य हे सर्वांगसुंदर आणि उपयुक्त मासिक असल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांनी नोंदवल्या आहेत. लोकराज्य मासिक हे अतिशय माहितीपूर्ण असून त्याचा सर्वात जास्त फायदा स्पर्धा परीक्षार्थींना होत आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत सांगलीमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालविण्यात येते. या ठिकाणी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना लोकराज्य मासिक मिळावे, यासाठी या मासिकाचे वार्षिक वर्गणीदार करण्यात येणार आहेत.

## नियमित वाचक

**राज्य शासनाच्या कल्याणकारी योजना, शासन निर्णय याविषयीची सविस्तर व अचूक माहिती देणारे शासनाचे मुखपत्र 'लोकराज्य' हे सर्व घटकांना उपयुक्त आहे. लोकराज्यचे वेळोवेळी प्रसंगानुरूप काढण्यात आलेले विशेषांक दर्जेदार आहेत. 'लोकराज्य'चा मिही नियमित वाचक आहे, अशी प्रतिक्रिया सांगलीचे जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांनी दिली आहे.**




**संप्रदा बिडकर**

**(लेखिका या (प्र) जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९०११२६१९३९**




**टेकसेव्ही असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय गेल्या अकरा महिन्यात घेतले आहेत. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

मुख्यमंत्री सहायता निधीला मदत केल्याबाबत आभार मानताना...

Thank you Jankalyan Nagri Sahakari Patsanstha, Karad for the contribution of ₹10,00,000/- lakh to CM Relief Fund !

जलयुक्त शिवार योजनेला हातभार लावल्याबाबत आभार व्यक्त करताना...

Thank you 'Lalbagcha Raja Ganeshotsav Mandal' for donating ₹25 lakh for #JalyuktaShivar Abhiyan!

मायक्रोसॉफ्ट कमर्शियल क्लाउड सेवेचे उद्घाटन केल्यानंतर...

Very happy to launch @Microsoft commercial cloud services from Local Data Centres (Pune, Mumbai & Chennai)

When I visited @Microsoft I had informed Mr @satyanadella about Melghat challenges & I'm glad they are developing Harisal as a smart village

माजी खासदार राम कापसे यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना...

My deepest condolences to Ram Kapse ji's family

ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांच्या वाढदिवसानिमित्त...

Heartiest Birthday Greetings to Bharat Ratna Lata Mangeshkar ji. Wishing you a long life and good health.

हुतात्मा भगतसिंग जयंतीनिमित्त...

Salutations to the Great Son of Bharat Mata, an epitome of courage & patriotism Shaheed Bhagat Singh on His Birth Anniversary.

मराठवाड्यात दुष्काळग्रस्त भागांच्या दौऱ्याबाबत...

This tour is to understand the ground situation and take the appropriate decisions at the earliest.

मराठवाड्यावर पावसाने कृपा केल्याने मी निसर्गाचे आभार मानतो. असाच दिलासा संपूर्ण राज्याला मिळू दे, अशी परमेश्वराला प्रार्थना करतो.

पर्यूषण पर्वाच्या शुभेच्छा देताना...

Heartiest Greetings on Samvatsari! May this Paryushan Parv bring peace and harmony in our lives. Michhami Dukkadam!

बँक ऑफ चायनाची मुंबईत भारतातील पहिली शाखा उघडण्याबाबत झालेल्या बैठकीनंतर...

Had a very good meeting with Bank of China delegation. Looking forward to its 1st branch of India in Mumbai.

जलयुक्त शिवारचे साठे पावसाच्या पाण्याने भरले, ही समाधानाची बाब आहे. ही योजना शाश्वत सिंचनाचा मार्ग निश्चितपणे प्रशस्त करेल.

जपान दौऱ्याच्या यशस्वितेनंतर...

Thank you Japan for the support. The new initiatives for development of Maharashtra will set a new beginning in Indo-Japan relation

### स्वच्छ भारत अभियानाला हिरवा कंदील दाखवताना...

Flagged off Swachhta Abhiyan organised by BMC at Girgaum Chowpatty & felicitated sanitation workers.





सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता
यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप ४० लाख वाचक
ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in
रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२३९०
राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार,
सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम
لوک راجیہ
उर्दु लोकराज्य
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
जय महाराष्ट्र
नाबाद...७९० भाग
दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.१५ ते ८ या वेळेत
प्रसारित होणारा कार्यक्रम
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@ १ कोटी ६५ लाख
www.mahanews.gov.in
MAHARASHTRA
Ahead
English Magazine
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
http://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th October 2015
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य




**सर्वाधिक खपाचे मासिक**

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक